रविवार

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

रविवार, २८ मे २०२३



# इंडिया पी.एम. मोदी द बॉस !

**आधुनिक केसरी**


**'मोदी द बॉस' अशा शब्दात आस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अम्बानीज यांनी मोदींचा गौरव केला. तर अमिरेकीचे राष्ट्रपती जो. बायडन यांना तर मोदी यांचा ऑटोग्राफ घ्यावयाचा आहे. तर पापुआ न्यू गिनीचे पंतप्रधान जेम्स मारापे यांनी विमानस्थळावर मोदींना आपले गुरूजी मानतत्यांचे पायाला स्पर्श केला. मोदी हे विदेशात भारताच्या प्रगतीचा डंका वाजवित होते! भारताची प्रतिमा उंचावत आहेत! तर इकडे भारतात विरोधी पक्ष हा मात्र मोदी वैयक्तिक व्देषातून देशाची बदनामी करत आहेत. त्यांना सत्तेतून घालविण्यासाठी मनसूबे रचत जात आहे. देशाच्या नवीन संसद भवनाचे पंतप्रधान मोदी हे उदघाटन करत असल्याने काही विरोधी पक्षाने बहिष्कार टाकला, त्यांचा बहिष्कार फ्लॉप झाला आहे.**

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे जी- ७ क्वाड, अन्य शिखर संमेलनानित्ताने दि.१९ ते २४ मे या सहा दिवसांचा परदेश दौरा करून भारतात परतले. त्यांनी तेथील चाळीस कार्यक्रमात भाग घेतला व जागतिक राष्ट्रीय नेत्यांची भेट व चर्चा केली. भारत जगात नंबर एक' क्रमांकावर आहे. तेथे मोदींची लोकप्रियता पहावयाला मिळाली. जी- ७ संघटना स्थापना करण्यामागे कारण घडले, ते म्हणजे १९७३ मध्ये सौदी अरब व इजराईल यो दोन राष्ट्रात तणाव निर्माण झाला होता. तेंव्हा अमिरेकीने इजराईल आर्थिक मदत केली त्यामुळे सौदीअरबने पश्चिम राष्ट्रांना धडा शिकविण्यासाठी तेल निर्यातीत मोठ्या प्रमाणात कपात केली. त्याचा परिणाम अमेरिका व इतर मित्र राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर होणार होता. तसेच महागाई वाढण्याची भीती होती.त्यातून १९७५ मध्ये जी-७ म्हणजे सात बड्या प्रमुख राष्ट्र समुहाची स्थापना झालेली आहे. यात अमेरिका, जर्मनी,जपान, इटली, फान्स, ब्रिटन, कॅनडा हे राष्ट्र आहेत. भारत या समुहाचा सदस्य नाही, पण भारताला निमंत्रित म्हणून बोलविण्यात येते. भारताला पहिल्यांदा २००३ मध्ये फ्रान्सने निमंत्रित केले होते. तेंव्हा तत्कालिन पंतप्रधान वाजेपयी या संमेलनाला गेले होते. २००५ ते२००९ पासून भारताला सतत निमंत्रित केले जात आहे. तत्कालिन पंतप्रधान मनमोहनसिंघ परिषदेला गेले होते.यावर्षी २०२३ मध्ये जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा यांनी भारताचे पंतप्रधान मोदी यांना विशेष निमंत्रित केले. विदेशातील माजी राजदूत यांचे म्हणणे, यापूर्वी भारत संमेलनात सहभाग होत असे, परंतु भारताचे नेतृत्व मोदी यांचेकडे आल्यापासून विदेशात या संमेलनात राष्ट्रीय नेत्यात त्यांना भेटण्याची उत्सूकता तसेच भारतीयांकडून पंतप्रधानाचे मोठ्या स्वागत प्रथमच पहावयाला मिळाले. जी-७ च्या परिषदेत भविष्यात येणाऱ्या जागतिक महामारीचा सामना करण्यासाठी आरोग्य यंत्रणा मजबूत करणे, तसेच करोनाच्या व्हायरसशी संघर्ष करणे, तसेच मुक्त व निष्पक्ष व्यापार क्षेत्राचे समर्थन व चालना देणे, जल वायू परिवर्तनाला सामना करणे आदी बाबीवर चर्चा विनिमय करण्यात आली. या परिषदेत भारताला बाजू प्रखरपणे मांडता यावी, म्हणून पंतप्रधान मोदी सहभागी झाले होते. यात भारताचे तीन फायदे आहेत. यात चीनची परराष्ट्र नीती, विस्तारवादी भूमिकावरून चीनला अडचणीत आणणे होता. तसे भारताने परिषदेच्या निमित्ताने चीनला आरसा दाखविला. तसेच भारत आज विसनशील देश व आर्थिक प्रगती झपाट्याने होत आहे, याची बाजू यावेळी समर्थपणे मांडली गेली. तसेच भारताची परराष्ट्रनीती कोणाच्या दबाबाखाली येणारी नाही, त्यामुळे प्रगत राष्ट्रांचा भारतावरचा विश्वास वाढत चालेला आहे. विदेशातील राष्ट्रातील कंपन्या भारतात उत्सुक आहेत,त्यामुळे देशात गुंतवणूक वाढणार आहे! पंतप्रधान मोदी हे भारतातील १४० कोटी जनतेचे प्रतिनिधी म्हणून तेथे गेले होते!देशातील नेते इटलीला गूपचूप फिरायला जातात, तसे गेलेले नव्हते.जपानचे पंतप्रधान किशिदा यांचे बरोबर तेथील नागरिकांनी पंतप्रधान मोदींचे जोरदार स्वागत केले, तेंव्हा तर एका मुलाने तर हिंदीतून मोदीशी संवाद साधला. मोदी हरोशिमा येथे गेले होते.या शहराचे नाव आले की, अंगावर काटे उभे राहतात! कारण अमेरिकेने ६ ऑगस्ट १९४५ मध्ये याच शहरावर परमाणू बॉम्बने हल्ला केला होता. यात १ लाख ४० हजार लोक मृत्यू पावले! तितके कायमचे अपंग झाले,यात पूर्णपणे शहरच उध्दस्त झाले होते! यातूनही जपान पुन्हा उभा गेला.आज तो प्रगत राष्ट्र म्हणून पुढे आलेला आहे. हिरोशिमा येथे महात्मा गांधीर्जीच्या पुतळ्याचे बसविण्यात आला. या पुतळ्याचे अनावरण मोदी यांचे हस्ते करण्यात आले.त्यावेळी मोदी यांनी, म. गांधींनी जगाला शांतीचा देश दिला. त्यांच्या अहिंसेच्या मार्गाने चलणार्‍या राष्ट्राला निश्चित बळ मिळेल, असे ते म्हणाले ! जपानच्या प्रत्येक नागरिकाला स्वातंत्र्याचे चटके बसले! त्यामुळे राष्ट्रीयेतून हे राष्ट्र पुन्हा उभारले गेले. भारताला सहज स्वातंत्र्य मिळाले, यात काही कुटुंबांनी बलिदान दिले. त्याची झळ सर्वसामान्य माणसांना व राजकीय नेत्याना बसलेली नाही, त्यामुळे आपणाला स्वातंत्र्याची किंमत नाही.पण काही परिवारवादी नेते मात्र स्वांतत्र्याची फळे चाखत आहेत. असो! विदेश दौऱ्यात मोदींना भेटण्यास राष्ट्रांचे प्रमुख भेटण्यास उत्सुक होते, हे दिसून आले. यात काही राष्ट्राबरोरबर व्दिपक्षीय चर्चा झाली. या भेटीत सुमारे ६०० वर बड्या उद्योजकांच्या भेटी व चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी ब्रिटन, ऑस्ट्रेलिया पंतप्रधानाशी चर्चेच्यावेळी तेथे मंदिरावर होणारे हल्ले आणि खलिस्तानी चळवळीला प्रोत्साहन दिले जात आहे याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. तेंव्हा या राष्ट्रांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले. मोदींनी या दौऱ्यातून, भेटीतून आणि मैत्री संबंधातून हे साधलेले आहे. तकेच नव्हे,भारताचे रूसशी मैत्रीपूर्ण संबंध असताना मोदी हे युक्रेनचे राष्ट्रपती व्लोदोमीर जेलेस्वी यांची भेट घेतली. युध्दामुळे इतर राष्ट्रांवर त्याचा परिणाम होत आहे. हा मानवतेचा प्रश्न आहे.भारत यूक्रेनला जेवढे मदत करता येईल, तेवढे केली जाईल, असे आश्वासन दिले. मोदींनी ऑस्ट्रेलियातील सिडनी ओलॅंपिकपार्क येथे हजारो भारतीय नागरिकांशी संवाद साधला. या स्टेडियमची क्षमता २० हजार आहे, या सर्व जागांचे तिकीटे मोदी येण्यापूर्वी संपली होती. हे स्टेडियम खच्चाखच भरले होते! बाहेर तितकेच मोदीचें चाहते जमलेले होते. मोदींनी दीड तासाच्या भाषणात ऑस्ट्रेलिया व भारताच्या मैत्रीचा उल्लेख केला. भारत आज विविध क्षेत्रात झपाट्याने प्रगती करत असून तो जगात पहिल्या व दुसऱ्या क्रमांकावर असल्याचा उल्लेख केला. त्यांनी 'इंडिया जगात नंबर वन'चा उल्लेख केला, तेंव्हा भारतीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाला जपानचे पंतप्रधान व विरोधी पक्षातील नेते उपस्थिती होते. हे विशेष! भारतात लोकशाही असूनही सत्ताधारी व विरोधी पक्ष एकत्र आल्याचे चित्र पहावयाला मिळणार नाही. कारण गांधी परिवार मोदी यांना राजकीय शत्रू मानतो. मोदींच्या विदेश दौऱ्याची जगभरात चर्चा होत आहे. विदेशात मोदी यांचा सन्मान होत असला तरी तो १४० कोटी भारतीयांचा आहे, याचा अभिमान वाटला पाहिजे. मोदी हे विदेश दौरा यशस्वी करून, भारतात आले.तेंव्हा दिल्ली विमानतळावर त्यांचे स्वागतासाठी लोक मोठ्या प्रमाणात जमलेले होते. दुसरीकडे जी- २० या परिषदेचे अध्यक्षपद भारताकडे आहे. त्यामुळे या परिषदेचे बैठक भारतात होणार असल्याने भारतात मोठ्या प्रमाणात तयारी करण्यात आली. त्यामुळे श्रीनगर शहरात रस्ते तसेच सुशोभिकरण व विद्युत रोषणाईने शहर सजलेले होते! या शहराचे व्हिडिओ पाकच्या नागरिकांना तेथील पत्रकारांनी दाखविले! त्यांनी हा व्हिडीओ दुबई, लंडन, सिंगापूर येथील असल्याचे सांगितले, पण हे व्हिडीओ श्रीनगर काश्मिरचा आहे! हे सांगताच ते थक्कच झाले. या परिषदेचा उद्देश हा पर्यटन,व्यापार व सांस्कृतिक क्षेत्राला चालना देणे, हाच उद्देश आहे. शेर - ए काश्मीर' च्या श्रीनगर १७ देशाचे प्रतिनिधी दाखल झाले आले. पण भारत व पाकिस्तानात काश्मीर प्रश्नावरुन संघर्ष होत आलेला आहे. काश्मीरचा एक मोठा भाग पाकच्या ताब्यात आहे. भारताने तर जम्मू व काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, अनेकवेळा आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर स्पष्ट केले.तो भाग पाकिस्ताने सोडावा, अन्यथा भारत कधीही घेईल,असा इशारा दिलेला आहे. काश्मिरमध्ये होणारी जी- २० बैठक उधळून लावण्यासाठी पाकने अपप्रसार सुरू केला. इतके नव्हे, अतिरेक्यांची घुसखोरीकरुन हिंसा व दहशत निर्माण करण्याचा कट रचला होता. भारताने काश्मीरसाठी ३७० कलमाखाली विशेष अधिकार दिले होते. ते मोदी सरकारने कलम रद्दच केले व काश्मिरला राज्याचा दर्जा दिला. त्यामुळे आज काश्मिरी लोक, तरुण राष्ट्रीय प्रवाहात आले आहेत.या राज्यात शिक्षणिक विकास, उद्योग विविध क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास केला जात आहे. काश्मिरच्या सामान्य कुटुंबाला सर्व शासकीय योजनेचा लाभ दिला जात आहे. तेथे अतिरेकी कारवाया कमी झाल्या आहेत.काश्मिरमध्ये बदल झालेला आहे. श्रीनगला वीस राष्ट्राचे प्रतिनिधी तेथे येणार हेच पाकला रुचत नव्हते. पाकने भारताची कोंडी करण्याचा प्रयत्न केला. भारताने जमीन ते आकाशापर्यंत सुसज्ज अशी सुरक्षा यंत्रणा ठेवल्याने पाकचे मनसुबे धुळीला मिळाले.पण यातून चीनला थोबाडीत मारल्या गेले. पाकच्या मदतीला चीनबरोबर सौदी अरब, तूर्की हे राष्ट्रांनी जी- २० च्या बैठकीला येण्याचे टाळले आहे. पण १७ राष्ट्रांचे प्रतिनिधींनी श्रीनगरला आले होते.या राष्ट्राच्या प्रतिनिधी काश्मिरमधील अनेक भागांना भेटी दिल्या, त्यांनी बाजारपेठ व हॉटेल, पर्यटनस्थळी गेले होते तेंव्हाया राष्ट्राच्या प्रतिनिधींनी समाधान व्यक्त केले. यातून काश्भिरच्या पर्यटनक्षेत्रात मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. यातून व्यापार वाढेल, रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील! अशी आशा आहे. काश्मिरी लोकांनी यावर स्वागत करणाऱ्या प्रक्रिया होत्या. काश्मिर फुटरवादी व भारत विरोधी नेते हे मात्र बिळात लपून बसले. विदेशात जी -७ निमित्ताने भारताच्या पंतप्रधान मोदींचे स्वागत व गौरव पाहून भारतातील विरोधीपक्ष पोट दुः खी सुरू झाली. यातून विरोधी पक्षांनी परिषदेतील पंतप्रधानांच्या भेटीच्या काही भागाचे व्हिडिओ करून समाज माध्यमावर टाकून मोदींची टिंगल टवाळी केली. कॉंग्रेस पक्षाच्या नेत्यांनी पंतप्रधान या दौर्‍यावर प्रश्न उपस्थित केले होते. तसेच जी- २० लोगोवरून आरोप केला होता. या लोगोत कमळाचे फूल कसे ? यातून मोदी भाजपाचा प्रचार करत आहेत, असा आरोप केला. वास्तविक कमळाचे फूल हे राष्ट्रीय चिन्ह आहे. याला कॉंग्रेसने १९५० मान्यता दिली आहे, त्यात कमळ फूल असणे यात गैर काय ? परंतु मोदी द्वेषातून २०१४ पासून कॉंग्रेस पक्ष प्रत्येक धोरणाचा, निर्णयाला विरोध करत आला आहे. कॉंग्रेसचे नेते राहुल गांधी हे विदेशात जाऊन भारताची, लोकशाहीची व संवैधानिक संस्थाची बदनामी करतात, ते चालते! गांधी जेथे बोलले ते एका खालीत तेथे केवळ नव्वद लोकासमोर हे त्यांची लोकप्रियता आहे. त्यात कॉंग्रेसला कर्नाटक विधानसभेत निवडणुकीत यश मिळाल्याने आभाळ ठेंगणे झाले आहे! 'आज राज्य जिंकले! उद्या राष्ट्र जिंकू' असे त्यांना वाटते आहे! पण २०१४- २०१९ पर्यत कॉंग्रेसने किती निवडणूका हरल्या ? मग तेंव्हा कॉंग्रेस नेतृत्वाचे नाणे का चालले नाही ? कर्नाटक निवडणुकीमुळे विरोधी पक्ष एकत्र आला भाजपा व मोदीला सत्तेतून घालता येते! हा अजेंडा घेवून बिहारचे मुख्यमंत्री नीतीशकुमार भारत भ्रमण करत आहेत! २०१९ मध्ये विरोधी पक्ष संघटीत करण्याचे काम चंद्राबाबू नायडू, खडगे,शरद पवार यांना भेटले ! तेंव्हा जनतेने नायडू व खडगे यांना जनतेने घरी बसविले! दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल तर सेवा अधिकारावरुन केंद्र सरकारने काढलेल्या वटहुकूमाला राज्यसभेत सर्व विरोधी पक्षांनी विरोध करावा,यासाठी खटाटोप करत आहेत. ते पश्चिम बंगालला गेले व ममतादीदींना, उध्दव ठाकरे, शरद पवार यांना भेटले! हे नेते प्रतिक्षा करत बसलेले होते. याच राजकारणात येण्यापूर्वी केजरीवाल यांनी तर कॉंग्रस, राष्ट्रवादी कॉंग्रेस, जनता दल, समाजवादी पक्ष अनेक नेते भ्रष्ट असल्याची यादी जाहीर करून त्यांना जेलमध्ये टाका अशी मागणी केली होती. तसेच जनतेने या नेत्यांना मतदान करू नका ? असे आवाहन केले होते! आता तेच केजरीवाल सत्तेसाठी त्यांचे घरी जाऊन समर्थनाची भीक मागत आहेत! नेता राजकारणात आला की सड्याप्रमाणे रंग बदलतो! याचे उत्तम उदाहरण म्हणजे केजरीवाल! दरम्यान भारतात दिल्लीच्या नवीन संसद भवनाच्या उदघाटनावरुन राजकीय वाद सुरु झाला. इंग्रजांनी दिल्ली राजधानीत नवीन प्रशासकीय कामासाठी ही इमारत बांधली होती. या इमारतीचे उदघाटन व्हायसराय लॉर्ड इरविन यांनी १८ जानेवारी १९२७ रोजी केले होते.स्वातंत्र्यानंतर मात्र ही इमारत संसदीय कामकाजासाठी वापरली जात होती. त्याला 'संसद भवन' असे म्हंटले जाते. वास्तविक ही इमारत गुलामीचे प्रतिकच आहे.या इमारतीला ९६ वर्षे झाली आहेत. इमारतीत लोकसभेत ५५० व राज्यसभेत २५० सदस्य कसे -बसे बसतात! भविष्यात लोकसभा व राज्यसभेची संख्या वाढल्यास ही इमारत अपुरी पडेल! तसेच इमारत कमकुवत होत चालली आहे. त्यामुळे कॉंग्रेस सरकारने देशात नवीन संसदेची इमारत उभारणे गरजेचे आहे. असा नेते जयराम रमेश यांनीच ३५ वर्षापूवी प्रस्ताव होता. पण दळभद्री कॉंग्रेस सरकार नवीन संसद भवनाची इमारत ५५ वर्षा उभे करू शकले नाही. मग मोदी सरकारने अमृत महोत्सवी वर्षात संसदेची नवीन वास्तू उभारली. यात चूक काय ? पण आताच संसद भवनासाठी गरज काय ? त्यावर पैसा खर्च करण्याची काय ?असा प्रश्न कॉंग्रेसने केला होता ? म्हणजे गुलामीचे प्रतिक जतन करण्याची मानसिक कॉंग्रेस नेतृत्वाची होती. तेंव्हा शरद पवारांनी उगाच कॉंग्रेसच्या विदेशी नेतृत्वावर प्रश्न चिन्ह निर्माण केले नव्हते! आता संसद भवनाचे उद् घाटन पंतप्रधान मोदी यांचे हस्ते दि.२८ मे २३ रोजी होत आहे.हेच गांधी परिवाराला सहन होत नाही. कारण एक 'चहावाला' तो देशाचा पंतप्रधान होतो,तो नवीन संसद भवनाचे उभारतो, तोच उदघाटन करतो! उद्या इतिहासात त्याचे नाव कायमचे लिहिले जाईल! याव्देषातून गांधी परिवाराने विरोध सुरु केला.कारण देशात उदघाटनाचा ठेका हा नेहरू व गांधी परिवारालाच आहे.यातून नवीन संसद भवनाचे उद्घाटन राष्ट्रपतींच्या हस्ते का नाही ? अशी टूम शोधून काढली! मोदी सरकार हे आदिवासी व दलित समाजाचा अवमान करत आहेत! असे म्हणून या निमित्ताने मताचा डाव खेळला! कॉंग्रेसच्या या बहिष्कार नीतीला २० विरोधी पक्षाने पाठिंबा दिला व कॉंग्रेसच्या संकुचित वृत्ती,नीच नीतीत सहभागी झाले.हे विरोधी पक्षाला मुळीच शोभणारे नाही.कारण नवीन संसद हे भारतीय लोकशाहीचे मंदिर आहे. भारतीय घटनेनुसार लोकसभा व राज्यसभा मिळून संसद होते. संसदीय दलाचे प्रमुख हे पंतप्रधान असतात. संसदेत जनतेचे कायदे नियम केले जातात! यात राष्ट्रपती हे सर्वोच्च पद असले अधिकार मर्यादित आहेत! कॉंग्रेसने तर राष्ट्रपतींचा रबरी स्टॅंपप्रमाणे वापर केलेला आहे. नवीन संसद भवन हे भाजपा अथवा मोदीजींची वैयक्तीक मालकीची नाही. हा कार्यक्रम कोत्याही पक्षाचा नाही,तो भारत सरकारचा आहे! आज विरोधी पक्ष बहिष्कार टाकेल उद्या ते नवीन संसद भवनात जाणार नाहीत काय ? त्यांनी शपथ घेतली आहे काय ? पंतप्रधान देशाच्या १४० कोटी जनतेचे प्रतिनिधी आहेत!ते जनादेशामुळे संवैधानिक पंतप्रधान झाले मग विरोधी पक्ष जनतेच्या जनादेशाचा व संवैधानिकपदाचा अपमान करीत नाही काय ? यापूर्वी देशात तत्कालिन श्रीमती इंदिरा गांधी यांनी १९७५ मध्ये तर राजीव गांधी यांनी १९८७ मध्ये संसदेच्या इमारतीच्या वास्तूंचे उदघाटन केले आहे! मग आताच राष्ट्रपती श्रीमती द्रोपती मुर्मू यांचे उद्घाटन यांचे हस्ते करण्यात यावे, अशी विरोध मागणी का करत आहेत. यामागे मोदींचा विरोध आहे, हे मुख्य कारण आहे. वास्तविक भाजपा सरकारने तर मुस्लिम, दलित आदिवासी समाजाच्या व्यक्तीला सर्वोच्च राष्ट्रपतीचा सन्मान दिलेला आहे राष्ट्रपती- पदाच्या निवडणुकीच्यावेळी कॉंग्रेसने श्रीमती मुर्मू यांचा विरोध केला होता.या विसर पडला आहे. यात कॉंग्रेसचे नेते अजयकुमार, आधीर रंजन चौधरी व उदित राज, तेजस्वी यादव, अखिल गिरी या नेत्यानी राष्ट्रपती श्रीमती मूर्मू यांचेबद्दल अपशब्द वापरले. या पक्षांनी त्यांचेवर कोणतेही कारवाई केली नाही. राष्ट्रपती मुर्मू यांनी स्वतः संसदेचे उदघाटन पंतप्रधान मोदी यांचे हस्ते करावे, हे मत स्पष्ट केले आहे. विरोधी पक्षांनी राष्ट्रपती यांची भेट घेतली काय ? भारतात राष्ट्रपती आणि पंतप्रधान हे दोन्ही सवैधानिकपद तितकेच महत्वाचे आहेत.पण विरोधी पक्ष मात्र राष्ट्रपतीबद्दल सहानुभूतीचे नाटक केवळ करत आहे ? राष्ट्रपतींच्या नावाने विरोधी राजकारण करत आहे. ज त्यांना या पदाचा सन्मान आठवतोय! देशात नेहरू, इंदिरा गांधीनी राजीव गांधी परिवाराच्या नावाने हजारो योजना, शासकीय, शैक्षणिक संस्था आहेत. २००९ मध्ये श्रीमती सोनिया गांधी कोणत्याही पदावर नसताना अनेक शासकीय प्रकल्पाचे उदघाटन केले. हे महाराष्ट्रातही घडले आहे. तेंव्हा महाराष्ट्राचा स्वाभिमान गहाण ठेवला गेला! छत्तीसगड विधानसभेच्या वास्तूचे भूमिपूजन २९ऑगस्ट २०२० रोजी श्रीमती सोनिया व राहुल गांधी यांनी कसे काय करतात ?ते कोणत्या संवैधानिक पदावर होते ? तेंव्हा राज्यपाल या संवैधानिकपदाचा सन्मान गेला नाही!पुरोगामी महाराष्ट्रात राज्यपाल या संवैधानिकपदाचे धिंडवडे उडविले गेले होते. गांधी परिवार जे करतो तो म्हणजे देशाचा सन्मान, लोकशाही, घटनेचा आदर. पण मोदीने केले जर मात्र देशाचा अपमान व लोकशाही, घटना विरोधी, हेच कॉंग्रेसचे राजकारण आहे. तेंव्हा छत्तीसगड राज्याचे मुख्यमंत्री याचे नाव खालच्या बाजूस टाकले गेले होते. दुसऱ्याला उपदेश करणे सोपे आहे, कॉंग्रेसने तर आजपर्यत कधी घटनेचे, लोकशाही मूल्यांचे पालन केलेले नाही. कॉंग्रस अश्या विषयावरून राजकारण करुन स्वतः च्या पापाचे मुडदे उकरण्याची भाजपाला संधी का देतेय ? कॉंग्रेस राजवटीत तत्कालीन राष्ट्रपतीना कशी वागणूक दिली ,याची अनेक उदाहरणे इतिहासात वाचावयाला मिळतील! तेलंगणा राज्यातील सचिवालयाचे उदघाटन २०२३ मध्ये मुख्यमंत्र्यांनी केले ? मुख्यमंत्री नीतशकुमार, ममता बॅनर्जी व केजरीवाल यांनी विधानसभा इमारतीच्या लालफित कापण्यात अग्रेसर होते! तेव्हा या नेत्यांना संवैधानिकपदाचे स्मरण झालेले नाही. या नेत्यांना हा शहाणपणा सूचलेला नाही. माजी पंतप्रधानमन मोहनसिंघ गांधी यांचे आधी गांधी परिवाराला खूर्चीचा मान दिला असे! तेंव्हा मात्र गांधी परिवाराला याची कधी खंत वाटलेली नाही. कॉंग्रेसच्या या नीच राजकारणाच्या पंगतीत इतर विरोधी पक्ष बसलेला आहे. मग मोदी हे कोणत्या समाजातून येतात ? यात नवीन संसदेत राजदंड आणण्यावरुन प्रश्न निर्माण केला गेला. हा राजदंड ( सेंगोल ) चोल साम्राज्यापासून चालत आलेला आहे. तो राजधर्म, न्याय, शासनाचे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. लार्ड माउंटबेटनकडून पहिले पंतप्रधान नेहरुंना दि.१४ ऑगस्ट १९४७ रोजी रात्री ११.४५ वाजता सत्ता हस्तांतर म्हणून स्विकारला होता.हा राजदंड प्रयागराजच्या वास्तू संग्रालयात ठेवला गेला होता.तो तेथे कोणी व का ठेवला ?पण आता तो संसदेत व लोकसभा अध्यक्ष आसनाच्या बाजूस सन्मानाने विराजमान होणार आहे.भारतीय संस्कृतीचे जतन करण्यालाही काही राजकीय नेते तसेच चाटूगार पत्रकारांचा विरोध आहे! म्हणे! पंतप्रधान मोदी हे इतिहास बदलत आहेत!खर तर! ते नवीन इतिहास रचत आहेत. मोदी उदघाटन करत असले,तरी ६० हजार श्रमिकांचा सन्मान केला जाणार आहे. मग याकडे विरोधी पक्ष व चाटूगारांना दिसत नाही! लोकशाहीत विरोधी पक्षाला सरकारचा विरोध करण्याचा पूर्ण अधिकार आहे. विरोधी पक्ष नवीन संसद भवनाच्या उदघाटनावर कार्यक्रमावर बहिष्कार टाकून काय साधणार आहे ? यामागे आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची छबी मलिन कारस्थान तर नाही ना ? कॉंग्रेस बहिष्कार नाटकबाजीतून २०२४ च्या निवडणुकीच्या विरोधी पक्षाला एकत्र करण्याचा तसेच आदिवासी व दलित मताचा डाव खेळला!पण विरोधी पक्षात दोन गट पडले आहेत. यात सरकारचे समर्थन करणारे २५ पक्ष आहेत.त्यांची संख्या ३७६ इतकी असून ते प्रमाण ६८ टक्के आहे.बहिष्कार टाकणार्‍या पक्षाची संख्या २१ आहे,तर लोकसभा सदस्य संख्या १६८ असून प्रमाण केवळ ३१ टक्के आहे.राज्यसभेत समर्थन संख्या १३१ तर प्रमाण ५५ टक्के आहे. तर बहिष्कार पक्ष सदस्य संख्या१०४ तर प्रमाण ४५टक्के इतके आहे. यावरुन विरोधी पक्षाचा बहिष्काराचा डाव पूर्णपणे फसला आहे. यात उदघाटनावरुन सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यात न्यायालयाने ही याचिका दखल घेण्याचा लायकीची नाही. न्यायालय यात हस्तक्षेप करणार नाही,असे सुनावले व याचिका खारिज केली. जर पंतप्रधाननांनी उदघाटन करणे, हे काही असंवैधानिक नाही,असे स्पष्ट झाले. तेव्हा विरोधी पक्षाची थोडी फार लाज उरली असेल तर त्यांनी बहिष्कार मागे घ्यावा व देशाच्या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी व्हावे. मोदी व्देषातून देशाची व पंतप्रधानपदाची बदनामी करण्यापर्यंत. कॉंग्रेस पक्षाची मजल गेली आहे. यावरुन केंद्रात पुन्हा सत्तेत येणार नाही,असेच मत झाले दिसतेय! पंतप्रधान मोदी हे विदेशात भारताची प्रतिमा उंचावत आहेत. यात मोदी सारख्या नेतृत्वाची जगाला गरज वाटते. पण दुर्देवाने देशातील विरोधी पक्षाला मात्र मोदीसारखे नेतृत्व नकोसे आहे.



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

# उगवतीचे रंग




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

सकाळी उठून बाहेर आलो आणि बागेत एक फेरफटका मारला. सूर्याची सोनेरी कोवळी किरणं सगळ्या सृष्टीला न्हाऊ घालत होती. झाडं, पानं, फुलं जणू चातक होऊन त्या सूर्यप्रकाशाचं रसपान करीत होती. पक्ष्यांची किलबिल सुरु होती. रात्री मिटलेली कमळाची कळी आपले डोळे अर्धवट उघडून साऱ्या परिस्थितीचा अंदाज घेत होती. हळूहळू तिला उमलून यायचंच होतं. गुलाबाच्या कळ्यांनाही आता जाग आली होती. जाई, जुई तर सूर्यदेवांचं स्वागत करण्यासाठी कधीच्या तयार होत्या. झेंडूची फुलं उमलली होती. सोनेरी, पिवळसर झेंडूच्या फुलांवर सोनेरी सूर्यकिरणे पडल्यामुळे त्यांचं सौंदर्य काही आगळंच भासत होतं. मोगरा, जाई, जुई आपल्या अत्तराच्या कुपीतून सुगंधी शिडकावा करून वातावरण सुगंधित करीत होते. वाऱ्याच्या शीतल लहरी हा सुगंध अलगद वाहून नेत होत्या. रंगीबेरंगी फुलपाखरं फुलांवर अलगद नर्तन करून आपला आनंद व्यक्त करीत होती. सृष्टीच्या अंगणात हा प्रभातोत्सव रंगला होता. विविधरंगी पानं, फुलं, पक्षी यांनी हा रंगसोहळा साकार केला होता. सृष्टीमध्ये अव्यक्त असलेल्या निर्गुण निराकाराची पूजा निसर्गानं आपल्या परीनं मोठी सुरेख मांडली होती. या पूजेसाठी फुलं आपल्या पूर्ण शक्तीनिशी पूर्णपणे उमलून आली होती. त्यांच्या अंतरंगातून सुगंधाच्या भक्तीलहरी बाहेर पडत होत्या. पक्षी आपल्या सुरात त्याची आरती गात होते. सूर्यदेवांच्या सोनेरी प्रकाशात सृष्टीचा गाभारा उजळून निघाला होता. कुठूनतरी भूपाळीचे सूर अलगद कानी आले. मलयगिरीचा चंदनगंधीत धूप तुला दाविलास्वीकारा ही पूजा आता उठी उठी गोपाळा. माझ्या तोंडून आपोआप उद्गार बाहेर पडले. 'वा, किती सुंदर !' मनात एक प्रश्न आला. हे सगळं कशासाठी ? काही विशेष कारण आहे का ? इतका सुंदर असलेलाहा सोहळा, हा उत्सव रोज कशासाठी ? माझ्या मनातल्या प्रश्नाला सगळ्यांनी आपापल्या परीनं उत्तर दिलं. सूर्यकिरणं म्हणाली, ' कालची रात्र अंधारात गेली ना ! तुला उद्याची चिंता होती. मावळलेल्या दिवसाबरोबर तुझ्या कोमेजलेल्या आशा अपेक्षांना पुन्हा नवसंजीवनी देण्यासाठी आम्ही आलो आहोत. या प्रकाशाप्रमाणेच तुझा आजचा दिवसही प्रकाशमान होवो.' फुलं म्हणाली, ' अरे रोजचा दिवस नवा. रोज आपल्या आयुष्याच्या पुस्तकाचे एक नवीन पान आपण उघडतो. मग तो रोजचा दिवस हा आपल्या जीवनातील एक सोहळाच नाही का ? म्हणून त्याची सुरुवात आम्ही पूर्णपणे फुलून करतो. उमलता उमलता सौंदर्याची बरसातही करतो. आम्ही कसे टवटवीत असतो !




# आनंदी पहाट



## चिंताग्रस्त जीवनात बदल घडवावा

आधुनिक केसरी

सकारात्मक विचार आपल्या कल्याणासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी खरोखर महत्त्वपूर्ण असतात. मानवी अनुभवातील राग आणि दुःख यासारख्या भावनांची भूमिका स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे. जर तुम्हाला चिंता किंवा फोबियासारखा प्रकार असेल तर, एकांत, मनःशांती, ध्यानाभ्यास तुम्हाला शांत वाटण्यास तसेच इतर समस्यांना तोंड देण्यास, अधिक सक्षम होण्यास मदत करू शकतात. रात्रीच्या वेळी तुमची चिंता वाढण्याची अनेक कारणे असू शकतात. दैनंदिन ताणतणाव, झोपेच्या खराब सवयी आणि आरोग्याच्या इतर परिस्थितींमुळे रात्रीच्या वेळी चिंता आणि पॅनीक अटॅक वाढू शकतात. अर्थात, त्यावर अनेक उपचार उपलब्ध आहेत जे तुमची चिंता कमी करण्यात आणि तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकतात. चिंता विविध गोष्टींमुळे होऊ शकते जसे कि, तणाव, अनुवांशिकता, मेंदूचे रसायनशास्त्र, क्लेशकारक घटना किंवा पर्यावरणीय घटक ही होत. चिंताविरोधी औषधाने लक्षणे कमी करता येतात, परंतु औषधोपचार करूनही, काही जणांना अजूनही काही चिंता किंवा पॅनीक अटॅकचा अनुभव येऊ शकतो. चिंताग्रस्त विकारांमुळे जलद हृदय

गती, धडधडणे आणि छातीत दुखणे अशा प्रकारच्या विपरीत परिणामांना सामोरे जावे लागते, काहीजणांना उच्च रक्तदाब आणि हृदयविकाराचा धोका देखील असू शकतो. अगोदरच हृदयविकार असल्यास, चिंताग्रस्त विकारांमुळे कोरोनरी इव्हेंट्सचा धोका वाढू शकतो. निदान न झालेल्या किंवा उपचार न केलेल्या चिंता विकार असलेल्या बहुसंख्य लोकांसाठी, व्यक्ती आणि समाज या दोघांसाठी अनेक नकारात्मक परिणाम निर्माण करणारे ठरू शकतात. यामध्ये अपंगत्व, काम करण्याची क्षमता कमी झाल्याने उत्पादकता कमी होणे आणि आत्महत्येचा उच्च धोका निर्माण होणे, यांचा समावेश असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# आनंदी जीवन.....

आधुनिक केसरी

आपण आनंदी तर जग आनंदी .असं नसतं कधी. कोणी एकाच क्षणाला खूप आनंदी असतो तर त्याच क्षणी दुसरा कोणीतरी खूप दुःखी असतो. पण एवढा विचार करून आपला आहे तो क्षण दुःखात घालवायचा नाही. जो क्षण जसा येईल तसा त्याला आनंदात घालवायचा आहे. प्रत्येक वेळ सारखी नसते. सुखदुःख आनंद हे सगळ्यांनाच थोडं थोडं मिळत असतं.तेच तेच जर एकालाच खूप मिळालं तर त्याचाही वीट येतो. म्हणून दोन्ही पाहिजे. जेवणात जसं गोड, तिखट, कडू, आंबट, तुरट सगळंच हवं असतं, तसं जीवनात सुख, दुःख, आनंद ,समाधान सारंच असावं . कधी कधी अगदी छोट्या गोष्टीचे शहाण्या माणसाला दुःख होत असते. माझ्या कडे चारचाकी आहे पण ती साधीच आहे. बीएमडब्ल्यू नाही. किंवा मर्सिडीज नाही. अरे बाबा कोणती का असेना ?? आहे ना पण !! तिचा आनंद घे ना. त्यापेक्षा त्या रखरखत्या उन्हात अनवाणी चालणाऱ्या कडे बघा. पायात नाही, डोक्यावर नाही तरीही आनंदाने चालत आहे.लहान लहान गोष्टीचा आनंद घ्या. आणि तो मुलांनाही घ्यायला शिकवा. त्यांचं प्रमोशन झालं. माझं नाही. आमक्याला एवढा पगार! मला कमीच आहे. ज्यादा असतो तेव्हा म्हणता का असं ?? मग आता का रडता ? आहे त्यात आनंद घ्या ना. पुलाखाली रात्री झोपणारे लोक बघा. फक्त रात्रीचा निवारा मिळतो म्हणून सुखी आहे .आनंदी आहे. सकाळ होताच तिथून निघून जातात. उद्याची भ्रांत नाही. दगड फोडणाऱ्याला देखील कशाचा हव्यास नसतो. आज जे कमावलं ते खूप आहे. त्याच्यासाठी दिवसभर काम करायचे. सायंकाळी आवडेल ते खायचे. सुखाची झोप घ्यायची. उद्याची,भविष्याची त्याला चिंता नाही. विमा नाही. घर, गाडी ,बंगला काहीच नाही. पैठणी, सूट हे तर काय आहे हे त्याच्या गावीही नसते. कुठला आजार होईल आणि कुठल्या दवाखान्यात जायचे ? किती पैसे लागतील ? लग्न ,मुंज, वाढदिवस कशाचाच खर्च नसतो .हे फक्त पैसा असणाऱ्यांना याची चिंता असते. नसणाऱ्यांना काहीच नसतं .ते खूप आनंदात असतात .अज्ञानातला आनंद कधी कधी खूप मोठा असतो. तो घेता आला पाहिजे. आपल्याला आपल्या मुलांना हेच शिकवायचं आहे .स्वतःच्या कृतीतून. संधीचं सोनं करा. आहे त्यात आनंद माना. मीच दुःखी का ?? मलाच हे सर्व का ?? अशी भावना नको .जगात सगळ्यात सुखी मीच आहे, असं समजा." हरणं म्हणजेच जिंकणं आहे". असं समजून आयुष्य आनंदाने जगा. जगाला जगू द्या आनंदाच्या डोही आनंद तरंग.

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-75

# हे तुझेच डोके ना?

कासम नावाचा एक नवीनच नोकर दरबारात नोकरीवर लागला होता. अकबरने कासमच्या बुध्दीची परीक्षा घेण्याचे ठरविले. एके दिवशी सकाळी झोपेतून उठल्याबरोबर अकबर कासमकडे बघून ओरडला, 'जल्दी बुलाव!' जल्दी बुलाव म्हणजे ताबोडतोब बोलावून आण एवढाच अर्थ कासमला समजला. परंतु कोणाला बोलवायचे आहे ? हा प्रश्न त्याला पडला. परंतु महाराजांना प्रतिप्रश्न कसा करायचा त्यामुळे कासम सर्वात आधी धावतच बिरबलकडे गेला व त्याला अकबरच्या आज्ञेचा अर्थ विचारला. बिरबल म्हणाला, 'तुला महाराजांनी जल्दी बुलाव असा आदेश दिला तेव्हा महाराज काय करत होते ? ते उभे होते की बसलेले होते ? त्यांच्या हातांच्या काही हालचाली झाल्या का ?' कासम बिरबलला बोलला, 'जेव्हा महाराजांनी मला आज्ञा दिली तेव्हा ते झोपेतून उठून बसले होते व ते आपला हात वाढलेल्या दाढी मिशांवरून फिरवत होते.'


बिरबल बोलला, 'याचा अर्थ असा होतो की त्याला दाढी करून व मिशा कोरून महत्वाच्या कामानिमित्त तातडीने कुठेतरी बाहेर जायचे आहे. त्यामुळे तू केस कापणाऱ्याला त्यांच्याकडे घेऊन जा.'

कासम केस कापणाऱ्याला आपल्या बरोबर महाराजांकडे घेऊन गेला. त्याला बघताच अकबर त्याला म्हणाला, 'मी तर तुला फक्त जल्दी बुलाव! असे सांगितले होते तरी तू नेमका या केस कापणाऱ्याला कसे बरे घेऊन आलास ? हे तुझेच डोके ना ?' कासम म्हणाला, 'महाराज खरे तर हे माझेच डोके आहे परंतु, त्यात अकलेचा पुरवठा बिरबलजींच्या मेंदुने केला आहे.' बिरबलचे हे चातुर्य बघून बादशाह अकबर खुश झाला.

# सत्संगतीत राहावे

आधुनिक केसरी

नेहमी संतांची संगत करावी. परमार्थाला संतांचे अधिष्ठान आवश्यक आहे. संत आपल्याजवळच असतात, त्यांना पाहायला कुठे जावे लागत नाही. चित्त शुद्ध नसेल तर संतांच्या जवळ जाऊन तरी काय उपयोग होणार ? त्यांना आपण देहात पाहू नये. संत हे काही देहात नसतात, ते जे काही सांगतात त्या साधनात ते असतात. आपली विषयलालसा सोडल्याशिवाय त्यांची भेट होणे शक्य नाही. संताकडे एखादा चोर गेला तर त्याला त्याची खरी भेट होईल का ? तो ज्या हेतूने जातो त्या हेतूने त्याला फार तर तिथे चोरी करता येईल, परंतु संतांपासून जे खरे मिळवायचे ते साधेल का ? आपण जर चित्त शुद्ध करून गेलो तर आपल्याला त्यांची भेट होते; आणि भेट झाल्यावर, जे त्रिभुवनातही मिळणार नाही ते ते देतात. एकजण एका संताकडे नेहमी दर्शनाला येत असे. तिथे इतर मंडळीही पुष्कळ असत, पण तो कुणाशीही बोलत नसे, कुणी काही विचारले तर उत्तर देत नसे, सदा मुद्रा खिन्न असे. कुणालाही त्याच्याशी बोलावे असे वाटत नसे. असे काही दिवस गेले. पुढे एके दिवशी ते



सद्गुरु म्हणाले, "माझा तो वेडा कुठे आहे ? तो आज का आला नाही ?" हे त्याने ऐकताच तो आनंदाने उड्या मारू लागला, आणि जो तिथून निघाला तो पुनः आलाच नाही ! तो कशाला येईल ? गुरूने एकदा आपल्याला 'आपले' म्हणावे हेच शिष्याला मिळवायचे असते. ते त्या गृहस्थाने ओळखले, आणि म्हणून त्याचे काम झाले. गुरू तुम्हाला 'तुम्ही माझे झाला' असे म्हणत असतानासुद्धा तुम्ही ते ओळखत नाही, कारण तुम्ही विषय बरोबर घेऊन आलेले असता, आणि विषयाची प्राप्ती व्हावी असा हेतू मनात असतो. याउलट, गुरू तुम्हाला निवृत्ती देतात. निवृत्ती दिल्यावर विषयाची प्राप्ती व्हावी ही आठवणच जाते. जसे तहान लागल्यावर पाणी हवेसे वाटते, पण तेच पाणी पोटभर प्यायल्यावर नकोसे वाटते, म्हणजे त्याची निवृत्ती होते. आपला यावर आज विश्वास बसायचा नाही; पण हा विश्वास बसायला भगवंताचे नामस्मरण केले पाहिजे. नामाने ते कार्य होते, म्हणून नामस्मरण करीत जावे. नामाने काळजी वाटणे नाहीसे होते आणि मग तळमळही आपोआप जाते. मन आपल्याला विषयाचा आहेर करीत असताना आपण त्याला नामाचा आहेर करावा. आपण आपल्या अंतःकरणाला नामाची धग लावावी; त्याने अंतःकरण उकळले की दोष वर येतील; ते काढून टाकले की अंतःकरण शुद्ध होईल. शुद्ध अंतःकरण ठेवून नाम घेतले, तर भगवंताच्या कृपेचा अनुभव येईल. नामानेच अंतरंग शुद्ध बनते. नामानेच मन अंतरात प्रवेश करून स्थिर बनते. संत सांगतील तेच करणे हीच त्यांची खरी सेवा होते .

# निरुपण

आधुनिक केसरी

विशालनेत्रसम्राज्ञीं धनुर्भ्रुवौसुशोभिताम्|
तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्||
११|| विशाल नेत्रांनी जिचे सम्राज्ञीपण प्रकट होते, धनुष्याकार भुवयांनी जी सुशोभित आहे, सुंदर दिसते, अशा दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी मी नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

कर्म से आयु जाति है, कर्म से भोगत भोग । कर्म विपाक न छूटई, कर्मन संसृत रोग ।।१०।। (स्वर्वेद द्वितीय मण्डल सप्तम अध्याय) ०२/०७/१०

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

जीव आपल्या शुभाशुभ कर्मांनुसार आयुष्य, जात (जात म्हणजे मनुष्य जात, पशू जात असं) आणि भोगांना प्राप्त करतो. कर्म फल भोगल्याशिवाय सुटू शकत नाही. संसारातील जन्म-मृत्यूचे कारण कर्म आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

हरिहरां भेद । नाहीं करूं नये वाद ॥१॥
एक एकाचे हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥ध्रु.॥
भेदकासी नाड । एक वेलांटी च आड ॥२॥
उजवें वामांग । तुका म्हणे एक चि अंग ॥३॥
वक्त्या आधीं मान । गंध अक्षता पूजन ।
श्रोता यति जाला जाण । तरी त्या नाहीं उचित ॥१॥
शीर सर्वांगा प्रमाण । यथाविधि कर चरण । धर्माचें पाळण ।
सकळीं सत्य करावें ॥ध्रु.॥ पट्ट पुत्र सांभाळी । पिता त्याची आज्ञा
पाळी । प्रमाण सकळीं । ते मर्यादा करावी ॥२॥
वरासनीं पाषाण । तो न मानावा सामान्य । येर उपकरणें ।
सोनियाचीं परी तीं नीच ॥३॥ सोनियाचा पैंजण । मुगुटमणि
केला हीण । जयाचें कारण । तया ठायीं अळंकार ॥४॥ सेवका
स्वामीसाठीं मान । त्याचें नाम त्याचें धन । तुका म्हणे जाण
। तुम्ही संत तदर्थी ॥५॥ घरीं रांडा पोरें मरती उपवासीं । सांगे
लोकांपासीं थोरपण ॥१॥ नेऊनियां घरा दाखवावें काय ।
काळतोंडा जाय चुकावूनि ॥२॥
तुका म्हणे आम्ही जाणों त्या प्रमाण ।
ठकावे हे जन तैसे नहों ॥३॥ मायबाप जोहार । सारा साधावया
आलों वेसकर ॥१॥ मागील पुढील करा झाडा । नाहीं तरी खोडा
घालिती जी ॥ध्रु.॥ फांकुं नका रुजू जालिया वांचून । सांगा जी
कोण घरीं तीं धण्या ॥२॥ आजि मायबाप करा तडामोडी । उद्यां
कोणी घडी राहेना हो ॥३॥ तुका म्हणे कांहीं न चले ते बोली ।
अखरते सालीं झाडा घेती ॥४॥

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

पुस्तकस्था तु या विद्या परहस्तगतं धनम् ।
कार्यकाले समुत्पन्ने न सा विद्या न तद्धनम् ॥

स्पष्टीकरण : विद्या केवळ पुस्तकात असून चालत नाही. तिच्यातला काही - महत्त्वाचा भाग तरी आपल्या स्मरणात असला पाहिजे. काही काही भाग तर तोंडपाठच असला पाहिजे. तरच ती विद्या प्रसंगी आपल्या उपयोगी पडते. धनाचेही तसेच. ते एकदा परक्याच्या हाती गेले, की आपल्या गरजेच्या वेळी आपल्या हाती येईलच असे सांगता येत नाही. तेव्हा शहाण्या माणसाने कोणत्याही प्रसंगी आपली नड भागवील इतके तरी धन संग्रही ठेवावे.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, २८ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२५९
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●SUNDAY 28 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-259 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-16 ●PRICE-5

# गांधी कुटुंबाला दिलासा नाही

## प्राप्तीकर मूल्यांकनप्रकरणी उच्च न्यायालयाने याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** आयकरप्रकरणी गांधी कुटुंबाच्या याचिका दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी फेटाळल्या. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वढेरा यांच्या २०१८-१९ या आर्थिक वर्षांच्या आयकराचे मूल्यांकन सेंट्रल सर्कलमार्फत करण्याचा निर्णय आयकर खात्याने मध्ये घेतला होता. हे प्रकरण शस्त्रास्त्रांचा फरारी दलाल संजय भंडारी याच्याशी संबंधित आहे. गांधी कुटुंबीयांनी आयकर खात्याच्या निर्णयाला जानेवारी २०२१ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान दिले होते.



याव्यतिरिक्त संजय गांधी स्मृती विश्वस्त, जवाहर भवन विश्वस्त, राजीव गांधी फाउंडेशन, राजीव गांधी धर्मादाय विश्वस्त, यंग इंडियन आणि आम आदमी पक्ष यांनी स्वतंत्रपणे दाखल केलेल्या याचिकाही दिल्ली उच्च न्यायालयाने फेटाळल्या. याचिकाकर्त्यांचे मूल्यांकन कायद्यानुसारच होत आहे, हे हस्तांतरण केवळ तपासाचा समन्वय आणि अर्थपूर्ण मूल्यांकनासाठीच करण्यात आल्याचे न्यायालयाचे मत आहे, असे न्या. मनमोहन आणि न्या. दिनेश कुमार शर्मा यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले. त्याच वेळी, या प्रकरणाच्या सत्यतेचा किंवा असत्यतेचा न्यायालयाने तपास केलेला नाही असेही खंडपीठाने मान्य केले. कोणाशी तरी संबंध असल्यामुळे किंवा कोणाशी तरी असलेल्या नात्यामुळे कोणी दोषी असू शकत नाही, असे न्यायालयाने नमूद केले. लंडनमधील एका सदनिकेच्या संदर्भात संजय भंडारी आणि प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वढेरा यांचा संबंध असल्याचा आयकर खात्याचा दावा आहे.

सेंट्रल सर्कल हे आयकर खात्याच्या महासंचालकांच्या थेट अखत्यारीत येते. त्यांच्याकडे मूल्यांकनासाठी पाठवलेल्या प्रकरणांमध्ये करचुकवेगिरी झाली आहे का याचा तपास केला जातो. त्यासाठी आयकर खात्याने शोधमोहिमांमध्ये संकलित केलेल्या पुराव्यांचा आधार घेतला जातो. काँग्रेस नेते राहुल गांधी यांना सामान्य पारपत्र मिळवण्यासाठी दिल्ली न्यायालयाने शुक्रवारी ‘ना हरकत’ प्रमाणपत्र मंजूर केले. मात्र, पारपत्राची मुदत १० वर्षांऐवजी फक्त तीन वर्षांसाठी मंजूर केली जात असल्याचे अतिरिक्त मुख्य महानगर न्यायदंडाधिकारी वैभव मेहता यांनी राहुल गांधी यांच्या वकिलांना सांगितले.



# कर्नाटकात सिद्धरामय्या मंत्रिमंडळाचा विस्तार

आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरू :** कर्नाटकात सिद्धरामय्या यांच्या सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळाचा विस्तार आज करण्यात आला. सिद्धरामय्या यांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर कर्नाटकात आता नवे मंत्री तयार करण्यात आले आहेत. सिद्धरामय्या आणि डी.के. शिवकुमार यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून 26 मे रोजी संभाव्य मंत्रिमंडळाच्या यादीवर शिक्कामोर्तब करुन घेतलं. तसेच आज अनेक मंत्र्यांनी शपथ घेत कर्नाटकात आज शपथविधीचा सोहळा पार पडला. काँग्रेसचे नेते एचके पाटील, कृष्णा बायरे गौडा यांनी मंत्रीपदाची तसेच गोपनीयतेची शपथ घेतली. तसेच त्यांच्या सोबत इतर 22 जणांनी देखील मंत्रीपदाची शपथ घेतली. कर्नाटकात काँग्रेसच्या 24 आमदारांनी मंत्रीपदाची शपथ घेतली. यामध्ये दिनेश गुंडुराव, शरणबसप्पा दर्शनापुर, एचके पाटील, कृष्णा बायरे गौडा, एन. चेलुवरायस्वामी, के. वेंकटेश, शिवानंद पाटील, तिम्मापुर रामप्पा बलप्पा, एसएस मल्लिकार्जुन, तंगदगी शिवराज संगप्पा, डॉक्टर एचसी महादेवप्पा, ईश्वर खांद्रे, क्याथासंद्रा एन. राजन्ना, डॉक्टर शरणप्रकाश रुद्रप्पा पाटील, संतोष एस लाड, एनएस बोस राजू, सुरेश बीएस, मधु बंगारप्पा, डॉक्टर एमसी सुधाकर, मंकल वैद्य, लक्ष्मी आर. हेब्बाळकर, रहीम खान, डी सुधाकर और बी नागेंद्र यांचा समावेश आहे. काँग्रेसने जातीय समीरकरण करुन कर्नाटकात 2024 च्या निवडणुकांची तयारी केली असल्याचे आता म्हटले जात आहे. जातीयवादाचा मुद्दा लक्षात घेऊन काँग्रेसने प्रत्येक समाजाचा किमान एक मंत्री करण्यावर भर दिल्याचे चित्र कर्नाटकात पाहायला मिळत आहे. यामध्ये अनुसुचित जाती, लिंगायत समाज, ब्राह्मण समाज आणि इतर जातींच्या समाजातील प्रत्येकी एक असे मंत्री काँग्रेसकडून निवडण्यात आले आहेत. परंतु पहिल्या मंत्रिमंडळाच्या यादीमध्ये उत्तरेपेक्षा दक्षिण कर्नाटकाला जास्त महत्त्व देण्यात आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# आम्ही ‘डायरी ऑफ महाराष्ट्र खोका’ चित्रपट काढणार: राऊत

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** देशात ‘द केरला स्टोरी’वरून राजकारण तापले आहे. त्यातच शिवसेना ( ठाकरे गट ) खासदार संजय राऊत यांनी मोठी घोषणा केली. देशात केरला स्टोरीसारखे चित्रपट येत असतील, तर आम्हीही ‘डायरी ऑफ महाराष्ट्र खोका’ असा चित्रपट काढणार आहे, असे संजय राऊतांनी म्हटले होते. याला आता खासदार श्रीकांत शिंदे यांनी प्रत्युत्तर दिले आहे. “देशात ‘केरला स्टोरी’सारखे चित्रपट येत असतील, तर आम्हीही ‘डायरी ऑफ महाराष्ट्र खोका’ असा चित्रपट काढणार आहे. दिग्दर्शक विवेक अग्नीहोत्रींना याची स्टोरी देणार आहे. हा एक ऐतिहासिक चित्रपट असेल. त्यात माणसे कमी आणि खोके जास्त असतील, असा टोलाही राऊतांनी शिंदे गटाला लगावला आहे. याबद्दल नांदेड येथे प्रसारमाध्यमांनी श्रीकांत शिंदेंना प्रश्न विचारण्यात आला. त्यावर श्रीकांत शिंदे म्हणाले, गेली अनेक वर्ष खोके कोणी घेतले हे पूर्ण महाराष्ट्राला माहिती आहे. आम्ही महाराष्ट्राची संस्कृती अबाधित ठेवण्याचं काम करतोय. चिखलात दगड मारल्यावर चिखल आपल्यावरच उडतो. आम्हाला काम करत राहायचे आहे, असे श्रीकांत शिंदेंनी म्हटले आहे.

संजय राऊतांच्या वक्तव्यावर आमदार शहाजीबापू पाटील यांनीही टीकास्र डागलं आहे. “खोके-खोके म्हणत संजय राऊत दगड मारत फिरणार आहेत. राऊतांना कावीळ झाली आहे. उद्धव ठाकरेंनी संजय राऊतांसारख्या माणसाच्या हातात कोलीत दिलं आहे. ते महाराष्ट्रात भांडण लावत हिंडत आहेत. त्यामुळे ‘माकडाच्या हातात कोलीत-संजय राऊत’ असा चित्रपट तुम्हाला दिसेन,” असं शहाजीबापू पाटलांनी सांगितलं.

# यंदा ९४ ते १०४ टक्के पाऊस पडण्याची शक्यता

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतीय हवामान खात्याने नुकताच मान्सूनचा दीर्घकालीन अंदाज जाहीर केला आहे. देशात नैऋत्य मोसमी पाऊस सामान्य राहणार असून ९४ ते १०४ टक्के पाऊस पडण्याची शक्यता आहे. मात्र, तो उशिराने दाखल होणार आहे. भारतातील शेती ही पावसावर अवलंबून आहे आणि या अंदाजाने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. यंदाच्या मान्सूनवर अल निनोचादेखील प्रभाव राहील अशी शक्यता भारतीय हवामान खात्याने व्यक्त केली होती. एल निनो म्हणजे कमी पाऊस असे असले तरीही एल निनो असताना अनेकदा चांगला पाऊसही झाला आहे. मान्सून सध्या बंगालच्या उपसागराकडे सरकत असून केरळमध्ये तो चार जून रोजी दाखल होण्याची शक्यता आहे. देशातील काही भागांत सामान्यापेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.

# नोटा बदलण्यासाठी आलेल्या दोन नक्षल्यांना अटक

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** छत्तीसगढमध्ये दोन हजाराच्या नोटा जमा करण्यासाठी आलेल्या दोन नक्षल्यांना अटक करण्यास यश मिळाले आहे. बीजापूर पोलिसांनी ही कारवाई केली आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाकडून देशात पुन्हा एकदा नोटबंदी जाहीर करण्यात आली. पण यावेळी केवळ 2 हजार रुपयांच्या नोटा चलनातून मागे घेण्यात आल्या आहेत. आरबीआयच्या या निर्णयानंतर लोकांमध्ये खळबळ उडाली आहे. 23 मे पासून नोटा बँकेच्या कोणत्याही शाखेत मिळत आहे. छत्तीसगढच्या बीजापूर पोलिसांच्या नाकाबंदी दरम्यान अटक करण्यात आली आहे. या अटकेत बीजापूरच्या मूलवासी बचाव नेत्याचा ही सहभाग आहे. पोलिसांनी दोन हजाराच्या 6 लाख रुपयासह अटक केली आहे. बीजापूरचे एसपी अंजनेय वार्ष्णेय यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली आहे. अटक करण्यात आलेल्या नक्षल्यांकडून सहा लाखांची रोकड, 11 बँक पासबुक आणि सरकारविरोधी नक्षल पत्रकांसह एक दुचाकी वाहन जप्त करण्यात आली आहे पोलिसांनी केलेल्या चौकशीत गजेंद्र मडवी याने कबुल केले आहे की, नक्षल्यांच्या प्लाटून 10 चा कमांडर मल्लेशने दोन हजारांच्या नोटा बदलून आणण्यासाठी आठ लाख रुपये होते. विविध बँकेतून नोटा बदलून आणण्यास सांगितले होते. लक्ष्मण कुंजमच्या पंजाब नॅशनल बँकेच्या खात्यात 50,000 आणि युनियन बँकेच्या खात्यात 48000 रुपये जमा करण्यात आले होते. तर मडवीच्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या खात्यात 38,000 आणि सेंट्रल बँकेच्या खात्यात 50,000 रुपये जमा करण्यात आल्याची माहिती बीजापूरचे एसपी अंजनेय वार्ष्णेय यांनी दिली.

### नाकाबंदी दरम्यान केली कारवाई

नक्षल्यांच्या प्लाटून 10 चा कमांडर मल्लेशकडून दोन हजारांच्या नोटा घेऊन बँकेत 8 लाख रुपये जमा करण्यासाठी दोन नक्षलवादी आले होते. बीजापूर पोलिस आणि DRGने नाकाबंदी दरम्यान ही कारवाई केली आहे. अटक करण्यात आलेल्या लोकांमध्ये गजेंद्र मडवी हा सिल्गार आंदोलन आणि मूलवासी बचाव मंचचा नेता आहे तर दुसरा आरोपी लक्ष्मण कुंजम हा नरसापूरचा रहिवासी आहे.

# जन्मभूमी आपेगावातून ज्ञानोबाच्या पालखीचे १२ जूनला प्रस्थान

## माऊलींच्या वारीची ८४५ वर्षाची परंपरा : पायी प्रवासाचा मार्ग आहे आजही खडतर

आधुनिक केसरी न्यूज

**दादासाहेब घोडके**

**पैठण :** पंढरीची ही वारी तेराव्या शतकातील



संत नामदेव, संत ज्ञानेश्वरांच्या अगोदरही होत असल्याचे दाखले मिळतात. मूळचे मराठवाड्यातील असलेल्या संत नामदेवांच्या घराण्यातही अनेक पिढ्यांची पंढरीची वारी होती. तर संत ज्ञानदेवांचे आजोबा त्र्यंबकपंतही आपेगाहुन पंढरीची वारी करत होते. पंढरीच्या या वारीला प्राचीन इतिहास आणि परंपरा आहे. वारीचा उल्लेख असलेले संत ज्ञानदेवकृत अभंगातून कागदोपत्री ठोस आधार मिळतो. संत ज्ञानदेवांच्या घरामध्ये पंढरीची वारी होती. या सर्व ठोस पुराव्यावरून आपेगाव ते पंढरीची वारी गेली हजार-बाराशे वर्षे अखंड सुरू असल्याचे स्पष्ट होते. उन्हाळा संपतो आण वारकर्यांना पंढरीची आस लागते, अभंग गात गात, खेळीमेळीने, आनंदाने, नाचत, गर्जत विठ्ठल नामाचा जयघोष करीत वारकरी ही पायी वाटचाल करतात. भजन गात, नाचत पंढरीकडे जाणाऱ्या वारकऱ्यांच्या या दिंड्या म्हणजे चैतन्याचा प्रवाह या दिंड्याचे दृश्यही चित्त प्रसन्न करणारे असते.

आपेगाव ते पंढरपूर अशा पायी वारीला ८३५ वर्षांची अखंड परंपरा आहे . संत ज्ञानेश्वर महराजांचे पणजोबा विठ्ठलभक्त त्र्यंबकपंत यांनी ती सुरू केली होती . त्र्यंबकपंतांना हरिहरपंत व गोविंदपंत अशी दोन मुले होती . त्यापैकी हरिहरपंतांनी राजनैतिक परंपरा जोपासत देवगिरीचे यादव राजेसिंघल यांच्या दरबारी सरसेनापती पद भूषविले, तर गोविंदपंत यांनी वडिलांच्या भक्ती - ज्ञानमार्ग उपासनेची परंपरा जोपासत ही पंढरपूरची वारी सुरू ठेवली. गोविंदपंत यांना ते वृद्धापकाळी वारीला गेले असताना सोलापूर येथील सिद्धरामेश्वराच्या मंदिरात पांडुरंगाने साक्षात दर्शन दिले . आजही सोलापूर येथे सिद्धरामेश्वराच्या मंदिरालगत गोविंदपंतांचे मंदिर आहे.

गोविंदपंतांच्या नंतर विठ्ठलपंतांनी ही वारी पुढे सुरू ठेवली. संत ज्ञानेश्वर व त्यांच्या भावंडांनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून तळागाळातील समाजाला एकत्र करून याच वारीचे दिंडीत रूपांतर केले . त्यामुळे पांडुरंगाची खरी वारी आपेगावहूनच सुरू झाली , असे मानले जाते . कालांतराने आनेक वर्षे आपेगावातुन वारकरी पाई वारी करु लागले तदनंतर १९६५ ला गुरुअज्ञा पाळत कै.विष्णु महाराज कोल्हापूर हे आपेगावी आले १९६७ पासुन त्याकाळी गावकरी डोक्यावर माऊलींच्या पादुका घेत दर कोस दर मुक्काम करत पाई वारी करत कालांतराने या पाई वारीचे दिंडीत रुपांतर झाले, पंचक्रोशीतील विठ्ठल भक्त ज्ञानबाच्या भक्ती रसात पंढरीला जायचे. हिच परंपरा सुरु ठेवत संत ज्ञानेश्वर महाराज जन्मभुमीतून भक्त त्रिंबकपंतानी सुरु केलेली आपेगावहून पंढरपूर पाई वारीला जवळपास ८४६ वर्षाची पंरपरा मानली जाते,हिच परंपरा जोपासत संत ज्ञानेश्वर जन्मभुमीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर विष्णु महाराज कोल्हापूर हे या वारीत आता गुरूच्या अज्ञा पालन करत परंपरेने माता पित्याचा पालखी रथ सोहळा पंढरपूरला मोठ्या संख्येने घेऊन जातात.



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# गरिबी निर्मूलन आणि समृद्धीची पावले

आधुनिक केसरी

**गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती एक बहुआयामी समस्या आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये असे नमूद केले आहे की लोकांना गरिबीत राहण्यास भाग पाडले जाते ते कोणत्याही एका विशिष्ट कारणामुळे नाही तर वेगवेगळ्या कारणांमुळे. अन्न, घर, जमीन, आरोग्य असे गरिबीचे अनेक पैलू आहेत. संयुक्त राष्ट्राचा असा विश्वास आहे की शाश्वत भविष्य निर्माण करण्यासाठी, आपण गरिबी आणि भेदभाव समाप्त करण्यासाठी आपले प्रयत्न अधिक तीव्र केले पाहिजेत आणि सर्व लोकांना त्यांच्या मानवी हक्कांचा पूर्णपणे आनंद घेता येईल याची खात्री दिली पाहिजे.**

जागतिक असमानता लॅबने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या जागतिक विषमता अहवाल 2022 नुसार, भारत जगातील सर्वात असमान वेतन, मिळकत असलेल्या देशांपैकी एक आहे.त्यात असे म्हटले आहे की जगातील सर्वात गरीब लोकसंख्येकडे एकूण संपत्तीच्या फक्त दोन टक्के मालकी आहे, तर जगातील सर्वात श्रीमंत दहा टक्के लोकसंख्येकडे एकूण संपत्तीच्या 76 टक्के आहे. मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका हे जगातील सर्वात असमान प्रदेश आहेत, तर युरोपमध्ये असमानतेची पातळी सर्वात कमी आहे.

कामातून मिळणाऱ्या एकूण उत्पन्नात महिलांचा वाटा 1990 मध्ये सुमारे 30 टक्के होता जो आजही 35 टक्क्यांहून कमी आहे. देशातील सर्वाधिक उत्पन्न असलेल्या 10 टक्के आणि सर्वात कमी उत्पन्न असलेल्या 50 टक्के लोकांच्या सरासरी उत्पन्नातील अंतर जवळपास दुप्पट झाले आहे. अभ्यासात असेही आढळून आले आहे की गेल्या चाळीस वर्षांत देश अधिक श्रीमंत झाले आहेत, परंतु त्यांची सरकारे अधिक गरीब झाली आहेत. कोविड महामारीनंतर आलेल्या आर्थिक संकटामुळे गरिबी आणि विषमताही वाढली आहे. 2022-23 या वर्षासाठी गरिबी निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय दिवसाची थीम होती सर्वांसाठी सन्मान किंवा आदर. किंबहुना, प्रत्येक माणसाची प्रतिष्ठा किंवा आदर हा त्याचा स्वतःचा मूलभूत अधिकार आहे आणि त्याचे संरक्षण करणे आवश्यक आहे. पण गरिबीत जगणाऱ्या लोकांना स्वतःला उपेक्षित आणि तुच्छ असल्याची भावना वाटते. त्यांना असे वाटते की त्यांना नाकारले जात आहे आणि त्यांचा अनादर केला जात आहे.गरिबीचे निर्मूलन करणे आणि सर्वत्र शांतता आणि समृद्धी प्रस्थापित करणे हे मानवी हक्कांचे रक्षण करण्याचे प्राथमिक ध्येय असले पाहिजे. परंतु सध्याच्या परिस्थितीत, 1.3 अब्ज लोक अजूनही गरिबीत जगत आहेत, त्यापैकी जवळजवळ निम्मे मुले आणि तरुण आहेत. अलीकडच्या काळात, लोकांमधील उत्पन्न आणि संधींच्या असमानतेची पातळी झपाट्याने वाढली आहे. दरवर्षी गरीब-श्रीमंत यांच्यातील दरी रुंदावत चालली आहे. गरीब अधिक गरीब होत असताना अब्जाधीश वर्गाची संपत्ती झपाट्याने वाढत आहे.

खरं तर, गरिबी आणि विषमता हे चुकीचे निर्णय आणि निष्क्रियतेचे परिणाम आहेत. आपल्या समाजातील श्रीमंत गरीब आणि उपेक्षितांना अधिक असुरक्षित बनवतात आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करतात. सामाजिक बहिष्कार, संरचनात्मक भेदभाव आणि अशक्तपणा यासारख्या घटकांमुळे गरिबीत अडकलेल्यांचे जीवन अधिक कठीण होत चालले आहे. याशिवाय, दुष्काळ, पूर इत्यादी हवामान बदलाच्या आपत्तींचा परिणामही मुख्यतः गरिबांवरच अधिक होतो. आज जगात आर्थिक विकास, तंत्रज्ञानाची साधने आणि आर्थिक संसाधने वाढल्याचा दावा केला जात असताना, जगातील करोडो लोकांनी गरिबीत जीवन जगावे, असे अजिबात अपेक्षित नाही. कोणत्याही देशातील गरिबांची असहाय स्थिती त्या देशाच्या आर्थिक विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण करते. गरिबी म्हणजे सन्मानाने जगण्याच्या मूलभूत क्षमतेचा अभाव, त्यामुळे गरिबी हा केवळ आर्थिक मुद्दा म्हणून विचारात घेऊ नये.गोरगरिबांना अनेकदा त्यांच्या उदरनिर्वाहासाठी अशी काही कामे करावी लागतात, की जी त्यांच्या आरोग्यासाठी आणि त्यांच्या जीवासाठी धोकादायक असतात. त्यांना असुरक्षित घरात राहावे लागते. त्यांना पोषक आहार मिळत नाही. त्यांना न्याय मिळत नाही. त्यांच्याकडे आरोग्य सुविधादेखील मर्यादित आहेत किंवा मर्यादित स्वरूपात पोहचतात. अत्यंत गरिबीच्या परिस्थितींमध्ये भूक आणि कुपोषण, शिक्षण आणि इतर मूलभूत सेवा त्यांच्यापर्यंत मर्यादित स्वरूपातच पोहचतात., सामाजिक भेदभाव, सामाजिक बहिष्कार आणि निर्णय घेण्यात सहभागाचा अभाव यांचा समावेश होतो.झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, निरक्षरता आणि कमी मानवी विकास, सतत वाढत जाणारी बेरोजगारी, देशांमधील



भांडवलाचा अभाव, अविकसित अर्थव्यवस्था, किमतीत वाढ, अर्थव्यवस्थेचे पारंपारिक स्वरूप, पुरेशा कौशल्य विकासाचा अभाव, उद्योजकतेच्या विकासाचा अभाव, योग्य औद्योगिकीकरणाचा अभाव, गरिबी, मागासलेल्या सामाजिक संस्था, भ्रष्टाचार, पायाभूत सुविधांचा अभाव, जमीन आणि इतर मालमत्तेचे असमान वितरण आणि गरिबीचे दुष्ट वर्तुळ ही गरिबीची प्रमुख कारणे आहेत. गरिबीत जगणारे लोक आपल्या मुलांना श्रमिक बाजारात ढकलतात. जगातील 60 टक्के बालमजुरी कृषी क्षेत्रात आढळतात. या मुलांना अनेकदा धोकादायक परिस्थितीत काम करण्यास भाग पाडले जाते, ज्यामुळे त्यांच्या आरोग्यावर, शिक्षणावर आणि जीवनावर गंभीर परिणाम होतो. गरिबांमधील महिला आणि पुरुषांच्या शालेय शिक्षणातील अंतर सामान्य लोकसंख्येच्या दुप्पट आहे. वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमने जारी केलेल्या अहवालानुसार, 2030 पर्यंत भारत सुमारे 25 दशलक्ष कुटुंबांना दारिद्र्यरेषेच्या वर आणण्यात यशस्वी होईल आणि दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांचा वाटा 15 टक्क्यांवरून केवळ 5 टक्क्यांवर येईल. भारत सरकारच्या अधिकृत आकडेवारीनुसार 2011 च्या जनगणनेत देशातील सुमारे 22 टक्के लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली होती. कालांतराने देशातील गरिबी कमी झाली आहे, परंतु शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात अजूनही गरिबी कमी होण्याचा वेग कमी आहे. गरिबी निर्मूलनासाठी सरकारने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमासारख्या अनेक योजना आणि कार्यक्रम सुरू केले आहेत. पण तरीही भारतातील दारिद्र्यरेषा निश्चित करणे हे मोठे आव्हान आहे. आजही असे कोणतेही वैध निकष नाहीत ज्याद्वारे गरिबीची वास्तविक स्थिती परिभाषित केली जाऊ शकते. यासोबतच गरिबी निर्मूलनासाठी संसाधने पुरेशा प्रमाणात उपलब्ध नाहीत. दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रमातील भ्रष्टाचारामुळे योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. कार्यक्रम व योजनांची योग्य अंमलबजावणी होत नाही. देशाच्या संसाधनांचा विकास सतत वाढणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणापेक्षा कमी आहे, त्यामुळे गरिबी निर्मूलन कार्यक्रम देखील अपेक्षित परिणाम देत नाहीत. दारिद्र्यरेषा निश्चित करण्यासाठी शास्त्रीय पद्धतीचा अवलंब करावा, जेणेकरून खऱ्या गरीबांची ओळख होऊन त्यांना सरकारी योजनांचा लाभ देता येईल. ग्रामीण भागातील गरीबांमध्ये मुख्यतः लहान शेतकरी असतात. त्यांची गरिबी दूर करण्यासाठी आणि अन्न सुरक्षा वाढवण्यासाठी कृषी उत्पादकता सुधारणे, संसाधने आणि तंत्रज्ञान आणि बाजारपेठेपर्यंत त्यांचा पोहोच वाढवणे आवश्यक आहे. स्थानिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देऊन ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागातील गरिबी कमी करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. गरीब महिलांना शैक्षणिक क्षेत्रात पुढे करून त्यांच्या उत्पन्नाचा स्तर सुधारता येईल. सामाजिक सुरक्षा सुधारण्याबरोबरच गरीबांचे जीवनमान सुधारण्यास, जोखीम चांगल्या प्रकारे व्यवस्थापित करण्यास आणि त्यांच्या मुलांचे आरोग्य आणि शिक्षण वाढविण्यात मदत केली जाऊ शकते. यामुळे लोकांमधील असमानताही कमी होईल. गरिबांना सकस आणि संतुलित आहार देणे अत्यंत आवश्यक आहे, ज्यामुळे त्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास तर होईलच, पण श्रमाची उत्पादकताही वाढेल.



दिलीप नामदेव धायगुडे
संपर्क क्र. : ७७३८०३११९५

# ई-लर्निंग आणि पोलीस ड्युटी

आधुनिक केसरी

**ज्या सुरक्षेच्या भरवशावर एखाद्या काचेच्या बंगल्यात राहणाऱ्या व्यक्तींपासून ते झोपडपट्टी, फूटपाथवर राहणाऱ्या सर्वसामान्य माणसांपर्यंत सुरक्षेची हमी असणाऱ्या आणि मग त्यासाठी रात्रंदिवस आपल्या कुटुंबाचा विचार न करता ड्युटी बजावून एवढेच नव्हे तर ज्यांना कायद्याचे रक्षक म्हणजेच सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचा नाश करणारे "सद्रक्षणाय खलनिग्रहणाय" या ब्रीदवाक्याशी एकनिष्ठ राहून सचोटी, संयम आणि शिस्तीने आपली ड्युटी सांभाळणारा खाकी वर्दीतला एक माणूस म्हणजेच पोलीस. कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन, मालमत्तेचे संरक्षण एवढेच नव्हे तर बेकायदेशीर मार्गाने नसेली पदार्थांचे सेवन, विक्री यांना शोधून त्यांचेवर कारवाई करणे लहानातल्या लहान गुन्ह्यांपासून ते प्रशस्त गुन्ह्यांपर्यंत तपास करून मग त्या तपासा अंतर्गत सीसीटीव्ही, वॉचमन यांच्या ड्युटीचे रजिस्टर पासून ते हॉटेल, लॉज याची तपासणी करून परदेशी नागरिकांच्या कायदेशीर, बेकायदेशीर वास्तव्याचा सुगावा घेऊन त्यांचेवर उचित कारवाई करणे हे महत्त्वाचे कर्तव्यही पोलिसांना करावी लागतात.**

पूर्वीच्या काळी पोलीस घरी किंवा गावात वाडी, वस्त्यांवर एखाद्या मोहल्ला मीटिंगसाठी किंवा एखाद्या प्रकरणांसंबंधी जरी आला तरी लहानांपासून ते थोरांपर्यंत दमछाक मात्र नक्की होते. आजही या स्पर्धात्मक युगात हीच परिस्थिती आहे. एखाद्या सत्य घटनेबाबत पोलिसांना माहिती द्यावी की नाही हा ही यक्ष प्रश्न पडतो, कारण आपणासही कोर्टाच्या आणि पोलीस स्टेशनच्या पायऱ्या चढाव्या लागतील ही धास्ती आजही जिवंत असल्याचे चित्र निदर्शनास येते, म्हणून ऊन, वारा, पाऊस असो किंवा स्वतःच्या घरात एखादा लग्न समारंभ, उत्सव, वाढदिवस जर असला तरी काही ठराविक मर्यादेपर्यंत थांबून ड्युटी निभवावी लागते. कारण ज्या गोष्टींसाठी जीवाचं रान करून कितीतरी भरती करून नोकरी मिळवलेली असते, मग ती सचोटी, संयम आणि जिद्दीने ती नोकरी टिकवण्याचा प्रयत्न करीत असतो. "फर्स्ट ड्युटी नंतर सुट्टी" याचा सन्मान जपत आज प्रत्येक खाकी वर्दीतला पोलीस स्वाभिमानाने ड्युटी निभावताना दिसून येतो.

आज पोलिसांना सुद्धा संसार आहे. मुलांचे शिक्षण, घरातील सर्वांचे आजारीपण या सगळ्यांचा समतोल सांभाळत नोकरीला वेळेवर हजर राहणे, नेमून दिलेले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडणे, विनाकारण रजा किंवा आजारीपणाचा रिपोर्ट करून गैरहजर पडणे या नकारार्थी गोष्टी शक्यतो पाळल्या जाता; परंतु ज्यांना खरोखरच उपजत म्हणा किंवा ड्युटी लागल्यानंतर कामाच्या किंवा घरच्या अतिताण तणावामुळे, शारीरिक व्याधींना सामोरे जावे लागते, हा एक काहींना अपवाद ठरविता येईल. आजही समाजात कित्येक लोक आहेत की पोलिसांनी एखादे चांगले काम केले की त्यांना मनापासून त्यांची कणव येते. त्यांची आपुलकी वाटते, पण काही दुष्ट बुद्धीचेही लोक आहेत की थोडे जरी एखादी नकळत चूक घडली तर त्या चुकीचा गवगवा करायचा आणि त्यांचे मानसिक खच्चीकरण करायचं. सर्व पोलीस वर्ग लाचखोर नसतात. काही दिलेले कर्तव्य प्रामाणिकपणे करून मिळणाऱ्या पगारात समाधानी असतात, कारण त्यांना जाणीव असते आपल्या गरिबीची, भरती होताना घाम गाळून केलेल्या कष्टाची! तसं पाहिलं तर वेगवेगळ्या शाखांचे मंडळ असते कोण खाकी, कोण सफेद, कोण साध्या तर कोणी वेगवेगळ्या ड्रेस



कोड मध्ये आपले कर्तव्य पार पाडत असतात. आज मुंबई पोलीस दलामध्ये अधिकारी आणि अंमलदार यांना कितीतरी अडचणींना सामोरे जावे लागते. दररोज व्हीआयपी, व्हीव्हीआयपी यांचे आगमन, निर्गमन, मोर्चा, आंदोलन, संप, मिरवणुका, बंदोबस्त हे सर्व कर्तव्य बघत बघत कायद्याच्या अभ्यासाशी संलग्न राहावे लागते. म्हणजेच पोलीस ठाण्यामध्ये किंवा इतर सामान्यांचे प्रश्न मिटवण्याकरिता आणि स्वतःलाही ज्ञानवृद्धी व्हावी, त्यांना योग्य सल्ला मिळावा याकरिता वेगवेगळ्या गुन्ह्यांचा अभ्यास, जबाब, पंचनामा यांसारख्या इतर लहान मोठ्या गुन्ह्यातील कलमांचा परिपूर्ण अभ्यास होण्याकरिता" ई लर्निंग एम पी ए नाशिक" यांचा अभ्यास करण्याचे धोरण सध्या सुरू आहे. आपली ड्युटी आणि इतर सर्व कामे पहात मोकळ्या वेळेमध्ये वेगवेगळे कायदे तज्ञ व वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्वतःच्या ज्ञानाचा इतरांनाही उपयोग व्हावा म्हणून हा 42 कोर्सेस चा ऑनलाईन अभ्यास सुरू करण्यात आलेला आहे.

आज अधिकारी आणि अंमलदार यांना अभ्यासक्रमाबाबत एक आवड निर्माण झाली. शालेय जीवनात अभ्यासाचा कंटाळा आल्यावर जेव्हा मुलगा अभ्यासाकडे दुर्लक्ष करून नाना तऱ्हेची कारणे सांगून पटकन मित्रांच्यात खेळायला जातो, मग जेव्हा आई-वडिलांनी अभ्यास कर परीक्षा आली बसं झालं आता खेळायचं. त्याच्यासमोर बसून अभ्यास करून घ्यायला लागायचा किंवा काही अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही मुलं स्वतःच अभ्यास करीत असत, ना आई-वडिलांना वाचता येत ना लिहिता येत! तशाच प्रकारे जेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितल्यावर सर्वांनी रजिस्ट्रेशन करून अभ्यास सुरू केला, एवढेच नाही तर एखाद्या केस स्टडीचा अभ्यास किंवा एखादा कोर्स पूर्ण झाल्यावर जेव्हा ऑनलाईन परीक्षेची वेळ येते आणि अभ्यास केलेल्या एखाद्या प्रकरणात जर पास झाले तर मनापासून त्यांना खूप आनंद होतो. मग तुला किती प्रमाणपत्र झाली? किती मार्क मिळाले? माझी एवढी झाली. आता प्रत्येकांमध्ये कायद्याच्या अभ्यासाकरिता चुरस पाहायला मिळते. हा अभ्यासक्रम तसा बऱ्याच वर्षांपासून आहे; परंतु वेगवेगळ्या संकल्पना, नियम राबवण्यासाठीही तसे नियोजन लागतं ते आज पोलीस बांधवांमध्ये दिसून येते. तत बंदोबस्त, मनुष्यबळाची कमतरता, आरोग्य स्वास्थ्य, कौटुंबिक कारणे यामुळे कित्येक पोलीस बांधव ताणतणावाखाली जीवन जगतात. आपल्या कर्तव्याच्या सतत बारा-पंधरा तर कधी 24 तास ड्युटीमुळे कितीतरी पोलिसांचे आरोग्याच्या तक्रारी व अटॅकमुळे पोलीस बांधवांना हे जग सोडावे लागले. आठ तास कर्तव्य किंवा डे नाईट ऑफ या तंत्रशैलीचा वापर जर केला तर खऱ्या अर्थाने नक्कीच पोलीस दलामध्ये आनंदाचे वातावरण असेल आणि ते कुटुंबासमवेत जास्त वेळ देऊ शकतील, हा प्रश्न झाला प्रशासकीय बाबींचा. परंतु तरीही अशा ई- लर्निंग कायद्याच्या अभ्यासामध्ये जर पोलीस बांधव सतत रमत गेला तर कायद्या विषयी ज्ञानवृद्धी तर होईलच, पण इतर रिकामे विचार मनात येतात त्यांना नक्कीच आळा बसू शकतो. दररोज सकाळी स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देऊन व्यायामाचे, योग, प्रणायम आणि अध्यात्म विषयी गोडी लावली तर मनामध्ये सकारात्मकतेचा विचार येईल. "ई-लर्निंग आणि पोलीस ड्युटी" यांचा जर सहसंबंध जुळला तर हा पोलीस बांधव विश्वासाने, खात्रीलायक एखाद्या गंभीर प्रश्नांची उकलही सहज सोडवू शकतो. मिळेल त्या वेळेमध्ये ऑनलाईन अभ्यासक्रम पूर्ण करून ही एक पनिशमेंट नसून, स्वतःच्या ज्ञानात भर पाडून संकटकालीन व्यक्तीला म्हणा किंवा न्यायदानाच्या क्षेत्रातही पोलिसांची कामगिरी मात्र उल्लेखनीय आणि वाखाण्या सारखी असेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



# स्कायमेट कंपनीचे पर्जन्यमापन यंत्र चुकीच्या जागेवर बसविल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** स्कायमेट कंपनी ही प्रजन्यमापन, हवेचा वेग, तापमान इत्यादीचे मोजमाप करते. तर ते चुकीच्या जागेवर बसवलेले असल्याकारणाने याचा सर्व फटका माझ्या शेतकरी बांधवांना बसत आहे. कारण की, हे यंत्र चुकीची माहिती देत असल्यामुळे शेतकऱ्यांना याचे मोठे नुकसान होत आहे जसे की, अतिवृष्टीचे अनुदान, दुष्काळी अनुदान, पिक विमा इत्यादी नुकसान झालेले असताना देखील या कंपनीने चुकीच्या जागेवर यंत्र बसवल्यामुळे ते योग्य माहिती न देत असल्यामुळे शेतकऱ्यांना अतोनात नुकसान ही कंपनी व शासन करीत आहे. या कंपनीवर शेतकऱ्यांची फसवणूक केल्या कारणाने व चुकीची माहिती दिल्याने या कंपनीवर गुन्हे दाखल करण्यात यावेत. पीक विमा कंपनी व स्कायमेट कंपनी शासन व प्रशासन शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक करत आहेत प्रजन्यमापन यंत्र हे मोकळ्या जागेवर बसवणे आवश्यक आहे. त्या यंत्राजवळ १०० मीटरपर्यंत एखादी इमारत, एखादे झाड, विजेचा खांब, विजेची तार, डीपी यापैकी काहीही नसायला हवे परंतु शासन प्रशासन जाणून बुजून या मशीन चुकीच्या जागेवर बसले आहेत तात्काळ त्या मशीन योग्य त्या ठिकाणी हलवण्यात याव्यात व स्कायमेट कंपनीने शेतकऱ्यांची व शासकीय दिशाभूल केली व चुकीची माहिती दिल्या कारणाने कंपनीवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावे. नसता स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा त्यांनी तहसिलदारांना एका निवेदणाद्वारे दिला आहे. निवेदनावर शिवाजी भोसले, सुरेश गवळी, अरुणराव अंभोरे, प्राध्यापक पांडुरंग नवल, रामेश्वर शेळके, कैलासराव बिडवे, तात्याराव गोरे, रुस्तुमराव राजबिंडे, सुरेश राजबिंडे, सुखदेव राजबिंडे, मोहनराव राजबिंडे, गणेश पानगे, बाळासाहेब बिडवे, मारुती राजबिंडे आदींच्या स्वाक्षऱ्या होत्या.

पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर
शहरवासियांकरिता अभिनव योजना
One Unit, One Officer, One Mobile Number
9226514001 to 9226544050
-: आपत्कालीन संपर्क क्रमांक :-
0240-2240500, Dial 112 +91 83900 22222

मा. पोलिस आयुक्त सो.
मो.क्र. 92265 14001

वरीष्ठ पोलिस अधिकारी यांचे मोबाईल क्रमांक
मा. पोलिस उप आयुक्त (मुख्यालय) मो.क्र. 92265 14002
मा. पोलिस उप आयुक्त (परिमंडळ 1) मो.क्र. 92265 14003
मा. पोलिस उप आयुक्त (परिमंडळ 2) मो.क्र. 92265 14004
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा मो.क्र. 92265 14005
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, प्रशासन मो.क्र. 92265 14006
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, विशेष शाखा मो.क्र. 92265 14007
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर विभाग मो.क्र. 92265 14008
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, छावणी शाखा मो.क्र. 92265 14009
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, सिडको विभाग मो.क्र. 92265 14010
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, उस्मानपूरा विभाग मो.क्र. 92265 14011
मा. सहाय्यक पोलिस आयुक्त, वाहतुक शाखा मो.क्र. 92265 14012

नागरिकांसाठी पोलिस अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक

| | | | |
|---|---|---|---|
| पोलिस निरीक्षक, नियंत्रण कक्ष | 92265 14013 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. सिडको | 92265 14032 |
| पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा | 92265 14014 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. जिन्सी | 92265 14033 |
| पोलिस निरीक्षक, विशेष शाखा | 92265 14015 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. जवाहरनगर | 92265 14034 |
| पोलिस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा | 92265 14016 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. एम सिडको | 92265 14035 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. सायबर | 92265 14017 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. मुकुंदवाडी | 92265 14036 |
| पोलिस निरीक्षक, सुरक्षा विभाग | 92265 14018 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. उस्मानपूरा | 92265 14037 |
| पोलिस निरीक्षक, बॉम्ब शोधक व नाशक पथक | 92265 14019 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. सातारा | 92265 14038 |
| पोलिस निरीक्षक, पोलिस कल्याण विभाग | 92265 14020 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. हर्सुल | 92265 14039 |
| पोलिस निरीक्षक, हायकोर्ट सुरक्षा | 92265 14021 | पोलिस निरीक्षक, पो. स्टे. पुंडलिकनगर | 92265 14040 |
| पोलिस निरीक्षक, वाचक शाखा | 92265 14022 | पोलिस निरीक्षक, वाहतुक शाखा, शहर विभाग 1 | 92265 14041 |
| पोलिस निरीक्षक, भरोसा सेल(महिला सहाय्यता कक्ष) | 92265 14023 | पोलिस निरीक्षक, वाहतुक शाखा, शहर विभाग 2 | 92265 14042 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. सिटी चौक | 92265 14024 | पोलिस निरीक्षक, वाहतुक शाखा, सिडको विभाग | 92265 14043 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. क्रांती चौक | 92265 14025 | पोलिस निरीक्षक, वाहतुक शाखा, छावणी विभाग | 92265 14044 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. छावणी | 92265 14026 | पोलिस निरीक्षक, वाहतुक शाखा,वाळुंज विभाग | 92265 14045 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. वाळुंज | 92265 14027 | पोलिस निरीक्षक, दंगा काबू पथक | 92265 14046 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. एम. वाळुंज | 92265 14028 | पोलिस निरीक्षक, (पैरवी अधिकारी) | 92265 14047 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. बेगमपूरा | 92265 14029 | पोलिस निरीक्षक, मनपा अतिक्रमण हटाव पथक | 92265 14048 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. दौलताबाद | 92265 14030 | पोलिस निरीक्षक, मोटार परिवहन विभाग | 92265 14049 |
| पोलिस निरीक्षक, पो. स्टे. वेदांतनगर | 92265 14031 | पोलिस निरीक्षक, वायरलेस | 92265 14050 |


# शिवसेना जिल्हाप्रमुख अग्रवाल यांच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**परतूर :** गेल्या अनेक वर्षांपासून कावजवळा ते पारडगाव हा रस्ता विखुरलेला होता. या संदर्भात संबंधीत गावकऱ्यांनी अनेकवेळा सा . बां विभागाकडे तक्रारीही केल्या होत्या मात्र आधिकार्यांनी दुर्लक्ष केले. त्यात शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाअध्यक्ष मोहन अग्रवाल यांच्या पाठपुराव्या मुळे अग्रवाल यांच्या प्रयत्नाने अनेक वर्षे प्रलंबित असलेला कावजवळा ते पारडगाव २ की. मंजूर झाला. याप्रसंगी मोहन अग्रवाल यांचे स्वागत हरिभाऊ नाना माने यांच्या हस्ते करण्यात आले. शिवाजी तरवटे शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष परतूर, मंठा शेख खाजा शेख चांद , कावजवळा येथील ग्रामस्थ अरुण भांडवलकर सर,अमोल धुमाळ ,दत्ता धुमाळ, शेख नसीर शेख, अनिल पवार,राम मगर, गणपतराव ढेरे, गणेश तरसे,बालू आव्हाड, काशिनाथराव भांडवलकर ,भगवान वाघमारे , भगवानराव घोडके, भगवान पाटोळे यांच्या सह आदी कार्यकर्ते उपस्थित होते .

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी २४ तासांत जेरबंद; मानसिक त्रास दिल्याने खून

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** यशवंत सुरेश बागुल आणि पंकज राजेंद्र मोहिते असे पिंपरखेडा येथून उभंडनांद्रा गावी मजूर शोधून परत येत असताना पिपरखेड गावापासून काही अंतरावर असलेल्या घाटात रोडावर एका मोटर सायकलवरील दोन इसमांनी आण्णा भाई असा आवाज देवून बोलत असताना त्यावेळी सदर इसमांपैकी एकाने गावठी कट्यातून यशवंत बागुल यांना जिवे मारण्याचे उददेशाने त्यांचेवर गोळी झाडून त्यांचे पाठीवर गंभीर दुखापत करून सदर इसमासोबत असलेल्या त्याचे साथीदाराने त्याचे पॅन्टचे खिशातून एक धारदार चाकू काढून यशवंत सुरेश बागुल यांचे मानेवर छातीवर जिवे मारण्याचे उददेशाने वार करुन त्यांना गंभीर दुखापत केली. या खुणा संदर्भात दोन आरोपी निष्पन्न झाले आहेत १ ) पंकज राजेंद्र मोहिते २ )आनंद मोहिते व यात अजून काही आरोपी असल्याच्या संशयाने इतरांचा शोध सुरू आहे. आरोपीने यशवंत बागुल यांच्या हत्या केल्याची कबुली दिली आहे. परंतु बागुल हे वारंवार आम्हाला मानसिक त्रास देत असे म्हणून त्याचा राग मनात ठेवून त्याचा बदला घेतला असे आरोपींनी सांगितले. मा.पोलीस अधीक्षक सो, धुळे यांचे



आदेशाने व मार्गदर्शनाने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा , धुळे आणि धुळे तालुका पोलीस स्टेशन यांचे संयुक्त पथक तयार करण्यात आले होते . स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा थळे यांचे पथकातील पोनि हेमंत पाटील, योगेश राऊत, प्रकाश पाटील, संजय पाटील दिलीप खोडे, श्रीकांत पाटील, प्रभाकर बैसाणे, योगेश चव्हाण, पंकज खैरमोडे, किशोर पाटील , पोकॉ . महेंद्र सपकाळ, अमोल जाधव , सुनिल पाटील चालक राजू गिते , कैलास महाजन आणि धुळे तालुका पोलीस स्टेशनचे दत्तात्रय शिंदे यांचे पथकातील अनिल सुभाष महाजन ,सुनिल वितुरकर , प्रविण सदाशिव पाटील , किशोर खैरनार , मुकश पवार , सनी सांगळे, कुणाल शिंगाणे,अमोल कापसे , राकेश मोरे , प्रमोद पाटील , नितीन दिवस , कांतिलाल शिरसाठ यांचे संयुक्त पथकाने गुप्त बातमीदारा मार्फत यातील अज्ञात आरोपीतांचा कौशल्यपुर्ण तपास करन शोध घेतला असता संशयात आरोपीत नाम १ ) पंकज राजेंद्र मोहिते, २ ) आनंद मोहिते दोन्ही रा. उभंडनांद्रा, ता. जि.धुळे असे ताब्यात घेण्यात आले.

मारुन त्याचा काटा काढल्याचे कबुली दिल्याने सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे . तरी धुळे तालुका पोलीस स्टेशन आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा यांचे संयुक्त तपास पथकाने सदर गुन्हयाचा तपास संजयजी बारकुंड साहेद मा . पोलीस अधीक्षक सो . धुळे , किशोरज काळे , सो मा अपर पोलीस अधीक्षक सो बुळे , राम सोमवंशी सो मा उपविभागीय पोलीस अधिकारी सो, धुळे ग्रामिण विभाग साक्री यांचे मार्गदर्शनाखाली केला असुन सदरचा गुन्हा दाखल झालेनंतर सुमारे २४ तासांचे आत आरोपीतांबाबत कोणतीही माहिती नसतांना गुन्हे तपासाचे शास्त्रोक्त तंत्र आणि कौशल्यपूर्व तपासाचे जोरावर सदरचा गुन्हा उघडकी आणल्याने वरीष्ठांनी दोन्ही संयुक्त पथकांच कौतुक केले आहे.

महाराष्ट्र Business Katta












# नागरिकत्व




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**आपण आपल्या राज्यघटनेच्या भाग-दोन मध्ये असलेल्या नागरिकत्वाबाबतच्या तरतुदींविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. आजच्या भागात आपण अनुच्छेद-६ विषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. अनुच्छेद-६:- पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क. या अनुच्छेद-६ ची पार्श्वभूमी व कायदेशीर वाक्य आपण या अगोदरच्या भागात बघितलेले आहे. या अनुच्छेद-६ च्या सुरवातीलाच पाकिस्तानातून स्थलांतर करून भारतात आलेल्या व्यक्तींना अनुच्छेद-५ मध्ये असलेल्या नागरिकत्वाबाबतच्या तरतुदी लागू होणार नसल्याचा उल्लेख आहे.**

आपण आपल्या राज्यघटनेच्या भाग-दोन मध्ये असलेल्या नागरिकत्वाबाबतच्या तरतुदींविषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. आजच्या भागात आपण अनुच्छेद-७ विषयी जाणून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. अनुच्छेद-६ प्रमाणेच अनुच्छेद-७ ची देखील पार्श्वभूमी ही १९४७ ला आपल्या देशाची झालेली फाळणीच आहे. देशाच्या फाळणीची चिन्हे दिसू लागतात खूप मोठ्या प्रमाणावर देशातील जनतेचे स्थलांतर सुरू झालेले होते. यादरम्यान भारताच्या राज्यक्षेत्रातून काही लोकं पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रात स्थलांतर करून गेले तर खरे, पण तेथील एकंदरीत वागणूक व परिस्थिती पाहता, त्यांचा मोठ्या प्रमाणावर अपेक्षाभंग झाला. झालेल्या भ्रमनिराशेमुळे त्यांनी परत भारतात येण्याचा मार्ग स्वीकारला. आता ही लोकं पहिल्यांदा भारतातून पाकिस्तानात गेली आणि काही कालावधी तिथे राहून झालेल्या अपेक्षाभंगामुळे तिथे रमु न शकल्याने परत भारतात परतली. अशावेळी या व्यक्तींना भारतीय नागरिकत्व द्यायचे की नाही? आणि द्यायचे असेल, तर त्यासाठी कोणत्या अटी आणि शर्ती असाव्यात, हे ठरवणे अत्यंत गरजेचे झालेले होते. आणि म्हणूनच आपल्या घटनाकारांनी अनुच्छेद-७ चा समावेश आपल्या राज्यघटनेत करून त्यात अशा प्रकारे भारतात परतलेल्या नागरिकांना भारतीय नागरिकत्व देण्यासंदर्भात तरतुदी केल्या. आणि म्हणूनच अनुच्छेद-७ हा देखील अनुच्छेद-६ प्रमाणेच केवळ पाकिस्तानशी संबंधित नागरिकांविषयी भाष्य करतो. या व्यतिरिक्त अन्य दुसऱ्या कोणत्याही देशाविषयी नाही. अनुच्छेद-७ चे शीर्षकच मुळात 'स्थलांतर करून पाकिस्तानात गेलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क' असे असून, यात स्पष्टपणे भारताच्या राज्यक्षेत्रातून पाकिस्तानच्या राज्यक्षेत्रात स्थलांतर करून गेलेल्या व्यक्तींविषयी भाष्य करण्यात आलेले आहे. आता या अनुच्छेद-७ मध्ये नेमकी काय तरतूद करण्यात



भाग -१९

आलेली आहे, ते आपण त्याच्या कायदेशीर वाक्यातून जसेच्या तसे पाहूया... अनुच्छेद-७:- स्थलांतर करून पाकिस्तानात गेलेल्या विवक्षित व्यक्तींचे नागरिकत्वाचे हक्क:- अनुच्छेद ५ व ६ मध्ये काहीही असले तरी, जी व्यक्ती, १ मार्च १९४७ या दिवसानंतर भारताच्या राज्य क्षेत्रातून स्थलांतर करून पाकिस्तानात सामाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रात गेलेली आहे, ती व्यक्ती भारताची नागरिक आहे, असे मानले जाणार नाही: परंतू, जी व्यक्ती, आता पाकिस्तानात सामाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रात याप्रमाणे स्थलांतर केल्यानंतर, पुन्हा स्थायिक होण्यासाठी किंवा कायमचे परत येण्यासाठी, कोणत्याही कायद्याच्या प्राधिकाराद्वारे किंवा तद्न्वये दिलेल्या परवान्याखाली भारताच्या राज्यक्षेत्रात परतली आहे, तिला या अनुच्छेदातील कोणतीही गोष्ट लागू असणार नाही व अनुच्छेद-६ खंड (ख) च्या प्रयोजनाकरिता, अशी प्रत्येक व्यक्ती १९ जुलै १९४८ या दिवसानंतर स्थलांतर करून भारताच्या राज्यक्षेत्रात आलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल. अनुच्छेद-७ मध्ये करण्यात आलेली तरतूद मुळातच भारतातून पाकिस्तानात स्थलांतर करून गेलेल्या व्यक्तीसंदर्भात आहे. म्हणूनच या अनुच्छेदाची सुरुवात 'अनुच्छेद-५ व ६ यामध्ये काहीही असले तरी....' अशी करण्यात आलेली आहे. अनुच्छेद-५ व ६ मध्ये संविधानाच्या प्रारंभी भारतीय नागरिकत्व देण्यासंदर्भातल्या तरतुदींचा समावेश आहे. आपण त्या तरतुदींविषयी 'आपले संविधान... राज्यपद्धतीच नव्हे, तर जीवनपद्धती', या आपल्या लेखमालेच्या या अगोदरच्या भागांमध्ये सविस्तरपणे बघितलेली आहे. आता या अनुच्छेद-५ व ६ मध्ये नागरिकत्व संदर्भात काही जरी तरतूद असली, तरी ती इथे अनुच्छेद-७ मध्ये ज्या व्यक्तींचा उल्लेख आहे, त्यांना ती लागू होणार नाही, असा ह्या अनुच्छेद-७ च्या सुरुवातीचा स्पष्टपणे अर्थ आहे. जर अनुच्छेद-५ व ६ मधील अटी या व्यक्तीला लागू होणार नसतील, तर मग अशा व्यक्ती जेव्हा कायमस्वरूपीसाठी भारतात परतल्या, मग त्यांना भारताची नागरिकता कोणत्या अटींवर देण्यात येईल? या प्रश्नाचे उत्तर, म्हणजेच या अनुच्छेद-७ चे विश्लेषण जागेअभावी आपण आपल्या ह्या लेखमालेच्या पुढील भागात पाहूया....

# स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर

आधुनिक केसरी

**२८ मे याच दिवशी नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म १८८३ साली झाला . त्यांचे वडील दामोदर सावरकर हे होते . त्यांना तीन अपत्ये झाली . सावरकर हे दुसरे अपत्य होते . सावरकरांना बालपणी आईवडिलांचा सहवास फार मिळाला नाही त्यांची आई त्यांच्या वयाच्या नवव्या तर वडील १६ व्या वर्षी प्लेग ने वारले . त्यांच्या थोरल्या वहिनी येसूवहिनींनी त्यांचा सांभाळ केला त्यांचे प्राथमिक शिक्षण नाशिक येथील शिवाजी विद्यालयात झाले. शालेय जीवनात ते अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी म्हणून प्रसिद्ध होते . काव्यरचना सुद्धा ते करीत असत. या शिवाय वक्तृत्व कलेत सुद्धा त्याची गती होती वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी स्वदेशीचा फटका व स्वतंत्रतेचे स्तोत्र ही काव्यरचना केली होती .**

लहानपणी च त्यांनी भगूर येथील भगवती देवीसमोर " सक्षम क्रांतीचा सेतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन " अशी प्रतिज्ञा घेतली होती . त्या वेळच्या प्रथेप्रमाणे त्यांचा विवाह १९०१ साली यमुनाबाई यांच्याशी झाला . सावरकर कॉलेज शिक्षणासाठी पुणे येथे राहिले . त्यांनी प्रसिद्ध फर्ग्युसन महाविद्यालयात प्रवेश १९०२ साली घेतला शामजी कृष्ण वर्मा यांनी ठेवलेली शिष्यवृत्ती मिळवून ते लंडन ला १९०६ साली रवाना झाले . लोकमान्य टिळकांनी ही शिष्यवृत्ती देण्याची शिफारस केली होती . लंडन मध्ये त्यांनी राष्ट्रभक्त समूह ही संस्था स्थापना केली . त्यावेळी त्यांचे सहकारी पागे व म्हसकर हे होते . मित्रमेळा ही संघटना ह्या गुप्त संघटनेची शाखा होती . पुढे या शाखांचे अभिनव भारत या शाखेत रूपांतर झाले . पुण्यामध्ये त्यांनी १९०५ साली विदेशी कापडाची होळी केली . लंडन मध्ये असताना इंडिया हाऊस मधून त्यांनी क्रांतिकारक कारवाया चालू ठेवल्या . जोशेफ मॅझिनी यांच्या आत्मचरित्राचे त्यांनी मराठी भाषेत भाषांतर केले त्यांनी बॉम्ब तसेच पिस्तुले तयार करण्याचे शिक्षण घेतले . अनेक पिस्तुले त्यांनी भारतात पाठविली . मदनलाल धिंग्रा हा त्यांचा पहिला क्रांतिकारक शिष्य. त्यांनी बंगालच्या फाळणीला जबाबदार असलेल्या कर्झन वायलीचा पिस्तुलाने खून केला . याबद्दल धिंग्रा यांना फाशीची शिक्षा झाली . नाशिक येथे एक १६ वर्षाचा युवक अनंत कान्हेरे यांने पिस्तुलाने कलेक्टर जॅक्सन याचा सिनेमा गृहात खून केला . याबद्दल कान्हेरे यांना फाशीची शिक्षा झाली . त्यांचे साथीदार कृष्णाजी व विनायक देशपांडे हे सुद्धा फाशी गेले . अनेक इंग्रज इतिहासकारांनी १८५७ शाळांचे स्वातंत्र्यसमर हे बंड होते असे प्रतिपादन केले होते . सावरकरांनी त्यांचे म्हणणे खोडून काढत हे बंड नसून तो एक स्वातंत्र्य लढा होता असे प्रतिपादन केले . १९१० साली त्यांना अटक करण्यात आली . त्यावेळी सावरकरांनी फ्रान्स चे मार्सेलिस येथे बोटीतून समुदात उडी मारली अखेर त्यांना पकडण्यात आले . क्रांतिकारक कारवायांबद्दल त्यांना ५० वर्षाची काळ्या पाण्याची शिक्षा झाली . तुरुंगात असताना त्यांना अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागले . त्यांनी तुरुंगातच कमला हे काव्य रचले . तुरुंगावरील भिंतीवर हे काव्य लिहून त्यांनी ते पूर्ण केले . या दरम्यान त्यांनी Essntialas of Hindutva हा ग्रंथ लिहला . ६ जानेवारी १९२४ रोजी त्यांची सुटका होऊन रत्नागिरी येथे त्यांना स्थानबद्ध करण्यात आले . १३ वर्षे त्यांनी रत्नागिरी येथे काढली . तिथे त्यांनी पतित पावन


शांताराम वाघ, पुणे

मंदिराची स्थापना केली . अंधश्रद्धा यावर आवाज उठविला . आंतर जातीय विवाहांना प्रोत्साहन दिले . त्यांनी असे १५ विवाह लावून दिले . १९३७ साली त्यांची मुंबई येथे भरलेल्या साहित्य संमेलनात अध्यक्ष म्हणून निवड झाली . १९३७ साली ते हिंदुमहासभेकचे अध्यक्ष झाले . त्यांनी देशभर दौरे काढले व व हिंदूसंघटन बळकट करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले . सुमारे दहा वर्षे ते हिंदू महासभेचे अध्यक्ष होते . लेखक, कवी, विज्ञाननिष्ठ, हिंदुसंघटक अमोघ वक्तृत्वाची देणगी लाभलेला प्रतिभावान वक्ता, भाषाशुद्धी व लिपी शुद्धी या चळवळीचा प्रणेता स्वातंत्र्य पूर्व व स्वातंत्र्यानंतरच्या काळातील राजकारणातील एका धुरीण व लोकनेता अशा अनेक रूपांनी सावरकरांनी अलौकिक व्यक्तिमत्वाची छाप जनमानसावर ठेवली होती १९६५ सालच्या भारत पाकिस्तान युद्धात भारताची सेना लाहोर नजीक पोहोचली होती . त्यावेळी त्यांनी आनंद व्यक्त केला होता १ फेब्रु १९६६ रोजी यांनी अन्न व औषधे यांचा त्याग केला व प्रायोपवेशन सुरू केले . अखेर २६ फेब्रु १९६६ रोजी ते अनंतात विलीन झाले , प्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके यांनी सावरकरांच्या जीवनावर चित्रपट काढला होता . सागरा प्राण तळमळला , जयोस्तुते तू महन्मंगले तसेच मर्मबंधांतली ठेव ही अशी त्यांची काव्ये जनमानसात अमर आहेत त्यांनी एकूण ३८ मराठी व इंग्रजी पुस्तके लिहली . त्यामध्ये आत्मचरित्र. नाटक, इतिहास वैचारिक लिखाण इत्यादींचा समावेश आहे अलीकडेच महाराष्ट्र सरकारने त्यांचे जन्मगाव भगूर तसेच रत्नागिरी सांगली व मुंबई येथील स्मारकांचे सुंदर करण्याचे काम हाती घेतले आहे. सावरकरांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी स्वातंत्र्य वीर सावरकर या पुस्तकात म्हटले आहे " टिळकांच्या नंतर भारताचं इतिहासात ज्याने कीर्तीची हाव ठेवली नाही, लक्ष्मीची आराधना केली नाही , आणि वैयक्तिक मोठेपणाची हाव बाळगली नाही ज्याने राष्ट्रीय हिताचीच सदैव चिंता वाहिली राष्ट्रीय एकतेसाठी सर्व जीवन वेचले मायभूमीचे विच्छेदन टाळण्यासाठी अखंड झगडा केला आणि राष्टीय प्रतिष्टेसाटी कार्य केले असा जर कोणता नेता असेल तो म्हणजे वीर सावरकर हे होय.

# आदर्श संसार पण कष्ट अपार!



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**भारतरत्न डॉ.बाबासाहेब तहानभूक विसरून पुस्तक वाचनात दंग असत. एकदा जेवणाची वेळ झाली असता रमाईंनी त्यांच्यापुढे जेवणाचे ताट ठेवले. साहेबांचे जेवण आटोपले असेल वाटून ताट उचलण्यासाठी त्या खोलीत जरा वेळानेच गेल्या, मात्र ताट तसेच उघडे. न राहून माईंनी त्यातल्या एका पुस्तकाचे पान उघडले आणि म्हणाल्या- या पुस्तकात नवऱ्याने आपल्या बायकोशी कसे वागावे, कुटुंबाशी कसे वागावे हे लिहिले असेल तेवढेच मला वाचून दाखवा. डॉ.बाबासाहेब म्हणतात- अगं वेडे, नवऱ्यानं संसार कसा करायचा, हे काही पुस्तकात लिहिलेल नसतं. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील प्रत्येक संकटात रमाई संघर्षरत राहिल्या, हे सर्वश्रुत आहे.**

आपल्या वैवाहिक जीवनात अत्यंत हालअपेष्टा, दुःख, गरिबी सोसत त्यांवर मात केली. बाबासाहेबांपर्यंत दुःखाची झळ पोहचू दिली नाही.

आपल्या संसारात आदर्श पत्नी, सून, माता या भूमिका त्यांनी अपार कष्टाने पार पाडल्या. कधी तक्रार नाही की कुठे त्याची वाच्यता नाही. अथांग दुःखाचे कधी भांडवल केले नाही. घरातील आर्थिक संकटाचा कोणासही थांगपत्ता लागू दिला नाही. एका मातेसाठी तिचा मुलगा मृत्यू पावणे यासारखे जगात दुसरे दुःख नाही. त्यांचे तर एकापाठोपाठ तीन मुलगे आणि एक मुलगी औषधपाण्याविना तडफडून दगावले. म्हणूनच माईंच्या त्यागाची थोरवी गाताना कवी यशवंत मनोहर म्हणतात- रमाई मातृत्वाचे महाकाव्यच होय, जीवनाचा तो एक संपूर्ण दुःखाशय होता. माता रमाई भीमराव आंबेडकर या विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी होत. डॉ.आंबेडकर अनुयायी त्यांना आईची उपमा देत रमाई संबोधतात. माता रमाई आंबेडकर यांचा जन्म दि.७ फेब्रुवारी १८९८ रोजी एका गरीब कुटुंबात झाला होता. त्यांचे वडील भिकूजी धुत्रे- वलंगकर व आई रुक्मिणी यांच्यासह रमाई दाभोळजवळील वणदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये राहत. त्यांना ३ बहिणी व एक भाऊ- शंकर अशी चार भावंडे होती. मोठी बहीण दापोलीत दिली होती. भिकूजी दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या बाजारापर्यं पोहचवत असत. त्यांना छातीचा त्रास होता. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे आजारपणाने निधन झाले. आईच्या जाण्याने कोवळ्या रमाईच्या मनावर आघात झाला. धाकटी बहीण गौरा व भाऊ शंकर अजाण होते. काही दिवसात वडील भिकूजी यांचेही निधन झाले. पुढे वलंगकर काका व गोविंदपुरकर मामा मुलांना घेऊन मुंबईला भायखळा मार्केटच्या चाळीत रहायला गेले. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन घडविण्यात रमाईंचा सिंहाचा वाटा आहे. रमाई म्हणजे बाबासाहेबांची सावलीच होती. त्यांनी आपले जीवन बाबासाहेबांच्या कार्यांप्रती समर्पित केले नसते तर बाबासाहेबांना शून्यातून जग निर्माण करता आले नसते, हे नाकारता येत नाही.

मुंबईतील भायखळा मार्केटमधील मासळी बाजार येथे बुधवार दि.४ एप्रिल १९०६ रोजी त्यांचे भीमरावांसोबत लग्न झाले. त्यांच्या जीवनाच्या अनेक हृदयदायक घटना सांगता येतील. एका प्रसंगी बाबासाहेबांच्या सत्कार समारंभात माईंना नेसायला लुगडे नव्हते. तेव्हा त्यांनी बाबासाहेबांचा फेटा लुगडे म्हणून घातला. गरिबीची केवढी मोठी शोकांतिका! पण रमाईंच्या त्यागामुळे आज देशातील लाखो महिलांचे जीवनच बदलून गेले आहे. माई संसारात रमल्या, परंतु भीमराव पुस्तकांत रमले. डॉ.बाबासाहेब व माता रमाई राजगृहात राहत असताना बाबासाहेबांना अचानक विदेशात जावे लागत होते. बाबासाहेबांनी धारवाडच्या वराळे या आपल्या मित्राकडे काही दिवसासाठी माईंना पाठविले. वराळे काका लहान मुलांचे वसतिगृह चालवित होते. त्यांच्या आवारात लहान मुले नेहमी खेळायला येत असत. दोन-चार दिवसांत माईंना त्या लहान मुलांचा लळा लागला. दोन दिवस झाले मुले आवारात दिसली नाहीत, म्हणून माईंनी काकांना विचारले. काका म्हणाले की मुले तीन दिवसांपासून उपाशी आहेत. वसतिगृहाला अन्नधान्यासाठी मिळणारे अनुदान अजून मिळालेले नाही. हे सांगताना वराळे काकाचा कंठ दाटून आला. तत्क्षणी रमाईने कपाटातील डब्यातील सोन्याच्या बांगड्या वराळे काकांना दिल्या आणि म्हणाल्या, या बांगड्या विका किंवा गहाण ठेवा, पण मुलांच्या जेवणाची त्वरित सोय करा. यावर बाबासाहेब काय म्हणतील याचा त्यांनी क्षणभरही विचार केला नाही. सोन्याच्या मूल्यापेक्षा त्यांच्या मनातील मुलांप्रती करुणा मौल्यवान ठरली. अशिक्षित असूनही बाबासाहेबांच्या कर्तृत्वाला साजेशी व स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची क्षमता माईंत होती. कष्ट, त्याग, संघर्ष, मातृत्व, प्रेम हे सर्व गुण त्यांच्यात असल्यामुळे बाबासाहेबांचे त्यांच्यावर निस्सीम प्रेम होते. माईंच्या त्यागाविषयी डॉ.बाबासाहेब बहिष्कृत भारतमध्ये लिहितात- आपण परदेशी असताना रात्रंदिवस जिने प्रपंचाची काळजी वाहिली व जिला ती अजूनही करावी लागत आहे. मी स्वदेशी परत आल्यावर माझ्या विपन्नावस्थेत गवताचे भारे स्वतःच्या डोक्यावर वाहण्यातही जिने मागेपुढे पाहिले नाही, अशा अत्यंत ममताळू, सुशील व पूज्य स्त्रीच्या सहवासात दिवसाच्या चोवीस तासातून अर्धा तासही मला घालविता येत नाही. बाबासाहेबांनी व्यक्त केलेली ही खंत मन हेलावून टाकते. सन १९४०मध्ये लिहिलेला थॉट्स ऑन पाकिस्तान हा ग्रंथ बाबासाहेबांनी माईंना अर्पण केला आहे. अर्पणपत्रिकेत ते लिहितात- हृदयाचा चांगुलपणा, मनाचा मोठेपणा, चारित्र्याचे शुद्धत्व आणि याशिवाय त्याकाळी कोणी मित्र नसलेल्या दिवसात आमच्या वाट्यास आलेले दारिद्र्य आणि विवंचना मनोधैर्याने व तत्परतेने सहन करण्याची जिने तयारी दर्शाविली त्या रामूबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा ग्रंथ मी तिला अर्पण केला आहे. विश्वरत्न डॉ.बाबासाहेबांच्या जीवनात अत्यंत कठीण काळात रमाईने त्यांना खंबीरपणे साथ दिल्यामुळेच अस्पृश्यांचे कैवारी डॉ.बाबासाहेबांना आपल्या कोट्यवधी अस्पृश्य बांधवांचे जीवन फुलविता आले. दि.२७ मे १९३५ रोजी जगन्माता रमाईंचे मुंबई येथे निर्वाण झाले.

# विकास पुरूष नितीन गडकरी




रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**आजच्या आधुनिक युगात देशात जे काही रस्त्यांचे जाळे व उड्डाणपूल दिसत आहे त्याचे संपूर्ण श्रेय केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनाच जाते.कारण रस्त्यामुळेच विकासाची दिशा ठरत असते.नितीनजी गडकरी यांच्या बुध्दीमत्तेचा व दुरदृष्टीतेचा वापर अनेक देश करीत आहे.त्यामुळे विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने व आदरतीथ्याने भारतासह संपूर्ण जगात घेतले जाते.गडकरींनी जेव्हा राजकारणात पाऊल टाकले तेव्हा पाहूनच त्यांच्या मनात विकासाचे कालचक्र फिरत असावे. जनुकाय महाभारतातील संजयच म्हणावे लागेल. गडकरींनी विकासाची सुरूवात महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री असतांना पासून सुरू केली.**

यानंतर विकासाच्या बाबतीत मागे वळून कधीच पहाले नाही. 2014 मध्ये नितीनजी गडकरी केंद्रीय मंत्री बनले तेव्हा पासून आजपर्यंत देशात हजारो किलोमीटरचे अत्याधुनिक पध्दतीने महामार्ग बनवून 135 कोटी जनतेला होणारा त्रास दुर झाला, त्याचबरोबर दळणवळण, आरोग्य सेवा,व्यापारी वाहतूकीला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली सोबतच गावागावात रोड बनवून गावतीथे सिमेंट रोड हि संकल्पना साकार होतांना दिसत आहे. त्याच पध्दतीने 701 किलोमीटरचा नागपूर- मुंबई समृद्धी महामार्ग बनवून विकासाचा नवीन इतिहास घडविला.यामुळे हजारो लोकांना रोजगार सुध्दा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.देशातील नवीन महामार्गामुळे हजारो किलोमीटरची वाहातुक सर्वांसाठी सुलभ झाल्याचे दिसून येते.यामुळे अनेक बाजारपेठांशी ताबडतोब संपर्क साधता येतो.गडकरींची कला अवगत करण्यासाठी विदेशातील अनेक एक्स्पर्ट त्यांच्याशी सल्ला-मसलत करतात.त्यामुळेच आज जगात विकासाच्या बाबतीत गडकरींचे नाव मोठ्या सन्मानाने घेतले जाते.महाराष्ट्राच्या बाबतीत विचार केला तर महाराष्ट्राचा विकास सुवर्ण अक्षरांनी लिहावा या पध्दतीने गडकरींनी कार्य केल्याचे दिसून येते.आज नागपूरात आपल्याला मेट्रो धावतांना दिसत आहे. त्याचे संपूर्ण श्रेय माननीय गडकरींना जाते.मेट्रोमुळे लोकांपुढील वाहतुकीची कोंडी तुटली व मोठी सुविधा झाली. त्याचबरोबर अनेक बेरोजगारांना रोजगार देण्याचा मार्ग सुलभ केला.संपुर्ण महाराष्ट्रात उड्डानपुल व सिमेंट रोडमुळे महाराष्ट्राची संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.जी-20 च्या अनुषंगाने भारताचे केंद्रबिंदु असलेले नागपूर झगमगत होते यात गडकरींचा सिंहांचा वाटा आहे. यावरून स्पष्ट होते की महाराष्ट्रासह देशाला खरा विकासाचा मार्ग दाखविला असेल तर नितीनजी गडकरी यांनी त्यामुळेच त्यांना आज संपूर्ण देश सन्मानाने व आदराने सलाम करतो.राज्याच्या विकासासोबत देशाचा विकास सुरू असतांनाच राज्याची व देशाच्या संस्कृतीचे जतन करण्याची धुरा सांभाळण्याचे काम गडकरींनी केले. नागपूरमध्ये खासदार महोत्सवाची सुरुवात 2018 पासून झाली. त्यानिमित्याने दरवर्षी नागपूरात खासदार महोत्सव साजरा केल्या जातो.यात विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.यात खास करून महाराष्ट्रासह भारतीय संस्कृतीचा वारसा पथनाट्याच्या व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवील्या जाते.या कार्यक्रमात मुख्यत्वेकरून संपूर्ण धर्माची जोपासना आपण कशी टीकवायची याचेही हुबेहूब चित्रिकरण पहायला मिळते. यामुळे महाराष्ट्राचा वारसा दिसून येतो.नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची चालना देण्याचे काम माननीय श्री नितीनजी गडकरी यांनी खासदार महोत्सवाच्या निमित्ताने आतापर्यंत दाखविले आहे. पुढेही आपली संस्कृती टिकून राहावी या उद्देशाने दरवर्षी आपल्याला खासदार महोत्सवात पहायला मिळतो आणि खेळाडूंमध्ये नवीन ऊर्जा निर्माण व्हावी या उद्देशाने खासदार क्रीडा महोत्सव दरवर्षी घेण्यात येतो.याचे संपूर्ण श्रेय गडकरींना जाते. सध्याच्या परिस्थितीत भारतातील अनेक राज्यांमध्ये सांस्कृतिक वारसा लुप्त होतांना दिसत आहे.परंतु विदर्भासह महाराष्ट्राला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा सारखा पूत्र मिळाल्याने खासदार महोत्सवाच्या निमित्ताने सांस्कृतिक वारसा जिवित झाल्याचे दिसून येते. आज गडकरींच्या पुण्याईने नागपूरसह संपूर्ण भारतात उड्डाण पुले पहायला मिळते. त्यामुळेच त्यांना उडानपुलाचे प्रनेते सुध्दा म्हणतात.नागपूरच्या विकासाची गोष्ट केली तर आज नागपुरचा संपूर्ण कायापालट झाल्याचे दिसून येते.हीबाब संपूर्ण देश अनुभवत आहे. नागपूर हे भारताचे मध्यवर्ती ठिकाण व केंद्रबिंदू आहे. आपातकालीन परिस्थितीत सुरक्षेच्या दृष्टिकोनातून नागपूरची निवड केली जाते.त्या अनुषंगानेच नागपूरचा विकास होत असावा.विदर्भाला संतांची भूमी म्हणून सुद्धा ओळखले जाते.संत, थोर महात्म्यांच्या आचार विचारांची जपणूक हीच खरी संस्कृती होय.आज आपली संस्कृती काय आहे हे सर्वांनाच माहीत आहे.परंतु गडकरींच्या अनेक कार्यक्रमाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सांस्कृती जोपासण्याचे कार्य होत असल्याचे दिसून येते.आजच्या पिढीला आपल्या संस्कृतीचा विसर पडत असल्याचे दिसून येते.खासदार महोत्सवाच्या माध्यमातून आपल्या संस्कृतीला जिथे-कुठे खिंडार पडले असेल.त्याला दुरुस्त करण्याचा विडा गडकरींनी घेतल्याचे दिसून येते.1947 नंतर नागपूरमध्ये अनेक खासदार होवून गेले.परंतु गडकरींचा काळ हा वाखाणण्याजोगा आहे.कमी कालावधीत महाराष्ट्रासह संपूर्ण भारताचा विकास रोडच्या व उड्डाणपूलाच्या माध्यमातून करून देशाला विकासाची नवीन दिशा दिली आहे.याचाच गाजावाजा आज आपल्याला जगात पहायला मिळतो.त्यामुळे गडकरी भारताचेच नाही तर जगाचे विकास पुरूष आहेत असे मी समजतो.खरोखरच महाराष्ट्राचा व देशाचा विकासाचा मार्ग मोकळा करणारा आणि सांस्कृतिक वारसा टिकविणारा पुत्र नागपूर भुमित जन्माला आला ही देशासाठी गौरवाची बाब आहे.ज्या दिवसापासुन खासदार झाले तेव्हा पासून त्यांचा कामाचा सपाटा जोरदार सुरू आहे.त्याचप्रमाणे त्यांच्या कामाची चर्चा भारतातच नाही तर जगभरात प्रसिद्ध आहे ही नागपूरकरांसाठी व महाराष्ट्रासाठी मोठी अभिमानाची गोष्ट आहे.गडकरींनी विकासाची सुरूवात उड्डाण पूलापासुन केली ती आज विकासाच्या शिखरापर्यंत जाणवु ठेपली आहे आणि आता विकासासोबतच सांस्कृतीची व क्रीडा क्षेत्राची जोपासना करण्याचे दायित्व त्यांनी स्वीकारल्याचे दिसून येते.यासाठी त्यांनी आपली संपूर्ण ताकद पुर्णपणाला लावली आहे. भारतात अनेक ठिकाणी आपल्याला जातीय दंगली दिसून येतात. परंतु नागपूरमध्ये कोणतीच जातीय दंगल अथवा टोकाचे मतभेद व वाद झाल्याचे दिसून येत नाही.नागपूरमध्ये संघ कार्यालय, दीक्षाभूमी,ताजबाग,गणेश टेकडी,चर्च इत्यादी अनेक धर्मांची पुरातन स्थळे आहेत.त्याचे जतन सर्वधर्मीय करतात.गडकरी यांचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व धर्मांच्या लोकांना घेऊन चालने व समाजामध्ये सर्वच धर्माविषयी आदराची भावना निर्माण करून सर्वांना एकसुत्रीत बांधून ठेवण्याचे महत्वाचे काम गडकरींनी केले आणि करीत आहेत. खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून समाज कार्यासह लोकांनी आपल्या संस्कृतीचे जतन कसे करता येईल याची जाणीव करून देण्याचे कार्य गडकरी करीत आहे.नागपुरला राजकीय दृष्ट्या संघभुमि म्हणून भारतासह जगभर ओळखले जाते.परंतु आजही नागपूरमधील हिंदू-मुस्लिम-शिख-ईसाइ-बौध्द एकोप्याने राहतात. ही नागपूरसाठी व नागपूरकरांसाठी सन्मानाची बाब आहे.गडकरी नागपूरचे खासदार झाले म्हणूनच विकास झाला आणि त्यांच्यामुळेच संस्कृतीचे जतन कसे करावे याची शिकवण खासदार महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना मिळत असते.आज गडकरींच्या कामाची शैली व एकाग्रता लक्षात घेता ते भारतासाठी "विकासपुरुष"आहे.खासदार सांस्कृतिक महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव पुनर्जीवीत करण्याचे काम करीत आहे.खासदार महोत्सवामध्ये कला, संस्कृती, साहित्य यासोबतच मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे दर्शन सुध्दा होते.1997 मध्ये असाच सांस्कृतिक कार्यक्रम गडकरी यांनी स्वातंत्र्याला 50 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने यशवंत स्टेडियम येथे आयोजित केला होता.त्यातही आपल्याला कला, साहित्य व सांस्कृतिची जडन-घडन दिसून आली.असे विकास पुरूष केंद्रीय मंत्री सन्माननीय नितीनजी गडकरी यांची विकासाची गती उच्च शिखरावर जावो आणि महाराष्ट्रासह भारताचा विकास आणखी गतीशील होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



# महान देशभक्त स्वातंत्र्यवीर सावरकर



दिलीप देशपांडे
मो.नं. ८९९९५६६९१७

आधुनिक केसरी

**संपूर्ण भारत जोडो यात्रेत राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरां विषयी अपनास्पद वक्तव्य केले. परंतु त्याआधी त्यांनी माहिती करून घ्यायला हवी होती. त्यांची आजी स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी सावरकरांबद्दल काय उद्गार काढले आहेत त्या म्हणतात... "सावरकर हा साहस आणि राष्ट्रभक्तीचा दुसरा प्रतिशब्द होता. त्यांचा पिंड अभिजात क्रांतीकारकांचा होता. असंख्य लोकांना त्यांच्यापासून स्फूर्ती मिळाली. साहस आणि देशभक्तीच दुसर नाव म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर." पंतप्रधान असताना इंदिरा गांधी यांनी सावरकरांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट प्रसिद्ध केले होते.**

मातृभूमीच्या प्रेमापोटी सावरकरांनी 28 वर्ष तुरुंगवास आणि त्यात अत्याचार सहन केले. त्यांनी संघर्ष केला. काळाराम मंदिराच्या आंदोलनात पाठिंबा दिला. मराठीला नवा शब्दसंग्रह दिला. भाषा शुद्धी लिपी शुद्धी चळवळ सुरू केली. हिंदुत्वाची व्यापक व्याख्या केली. रोटी बेटी बंदी उठवण्यासाठी त्यांनी संघर्ष केला.

भारताच्या स्वातंत्र्य युध्दात ज्यांची महत्वाची भुमिका होती त्यात विनायक दामोदर सावरकर यांचे नाव प्रामुख्याने येते. त्यांनाच स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणून आपण सगळे ओळखतो. तसेच महान क्रांतिकारक आणि देशभक्त प्रतिभा संपन्न व्यक्तिमत्व. यांचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. 28 मे 1983 हा सावरकरांचा जन्मदिवस. नाशिक जिल्ह्यातील भगूर येथे त्यांचा जन्म झाला. 9 जून 1906 ला ते लोकमान्य टिळकांचा आशीर्वाद घेऊन लंडनला गेले. शिष्यवृत्ती मिळवून ते लंडनला बॅरिस्टर बनण्यासाठी गेले होते. परंतु तेथे त्यांनी इंग्रज प्रशासनाविरुद्ध बंड पुकारले. लंडनहून त्यांनी पाठवलेल्या एका पिस्तुलाने अनंत कान्हेरे या क्रांतिकारी आणि देशभक्ताने नाशिकचे कलेक्टर जँक्सन यांची हत्या केली. या हत्या प्रकरणात ब्रिटिशांनी सावरकरांना लंडनमध्ये अटक केली आणि खटला भरण्यासाठी त्यांना भारतात आणले जात होते, परंतु येत असतानाच त्यांनी पहारेकऱ्यांना चुकून समुद्रात उडी मारली आणि फ्रेंच हद्दीतून तेथून परत त्यांना नौकेवर आणले. भारतात आल्यावर त्यांना न्यायालयाने पन्नास वर्ष काळ्या पाण्याची शिक्षा सुनावली. त्यांना येथून अंदमान बेटावरील सेल्युलर जेलमध्ये आणण्यात आले. त्यांना अतिशय कष्टाची कामे करावी लागत होती आणि तिथल्या हाल-अपेष्टा मुळे त्यांचे शरीर खंगत गेले. तेथे त्यांनी कमला हे महाकाव्य लिहिले. अनेक पुस्तके वाचली. त्यांनी अंदमानच्या कारागृहात भिंतीवर कोळशाने कविता लिहिल्यात त्यानंतर त्यांना रत्नागिरीच्या तुरुंगात आणले गेले. तेथे त्यांनी हिंदुत्व, आणि माझी जन्मठेप, हे ग्रंथ लिहिले . जवळपास 14 वर्ष काळ्यापाण्याची शिक्षा आणि दोन वर्ष रत्नागिरीतील तुरुंगवास भोगल्या नंतर त्यांना 1924 साली काही अटीवर मुक्त केले. सुटकेनंतर त्यांनी 23 जानेवारी 1924 ला रत्नागिरी हिंदू सभेची स्थापना केली. त्याचे अध्यक्ष झाले. नथुराम गोडसे याने 1948 मध्ये गोळी मारून गांधींची हत्या केली. या प्रकरणात सावरकरांना अटक करण्यात आली. या प्रकरणात सरकारने अटक केली परंतु त्यांच्याविरुद्ध पुरावे न मिळाल्याने सर्वोच्च न्यायालयाने त्यांना निर्दोष मुक्त केले. स्वातंत्र्यवीर सावरकर हे प्रकार देशाभिमानी नेते होते. भारताला स्वतंत्र करण्यासाठी झुंजणाऱ्या क्रांतीकारांचे ते प्रेरणास्थान होते. काळ्यापाण्याची शिक्षा भोगत असताना त्यांचे खूप





हाल करण्यात आले तरीपण देशभक्तीच्या भावाने ते जराही हरले नाही .त्यांचे कार्य सगळ्यांसाठी आदर्श असे आहे. सावरकरांनी केलेले मराठी भाषेत शब्दाचे कार्य अतुलनीय आहे त्यांच्या वकृत्वाने लाखोंचा जनसमुदाय स्तब्ध होऊन जात असे. अशा आठवणी अनेकांकडून ऐकायला मिळतात. 1938 साली मुंबई येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान सावरकर यांना मिळाला होता. "तरुणांनी लेखण्या मोडून बंदुका हाती घ्याव्यात' या हलकल्लोळ माजवणारे वक्तव्यामुळे संमेलन प्रचंड गाजले. कोणाला पटो वा न पटो मी माझे भाषा विषयक विचार मांडणार आहे, हे त्यांनी स्पष्ट केले होते. आपल्या भाषेत शब्द उपलब्ध असताना आपण दुसऱ्या भाषेचा आधार का घ्यावा ? असे ते म्हणत. दिनांक, क्रमांक, बोलपट, वेशभूषा, दिग्दर्शक, चित्रपट, मध्यंतर ,उपस्थित ,नगरपालिका, महापालिका, महापौर, पर्यवेक्षक, विश्वस्त, स्तंभ, मूल्य, हुतात्मा ,विशेषांक, नभोवाणी, दूरदर्शन ,अर्थसंकल्प, सेवानिवृत्त, वेतन ,असे इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून असे शेकडो शब्द सावरकरांनी मराठी भाषेला दिले. भाषाशुद्धी विषयी ते आग्रही होते. परभाषेबद्दल त्यांच्या मनात द्वेष नव्हता.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे असे एक व्यक्तिमत्त्व होते की त्यात अनेक गुण सामावले होते. महान देशभक्त, जहाल क्रांतिकारक, प्रतिभासंपन्न कवी, सिद्धहस्त लेखक, नाटककार, प्रखर बुद्धिवादी विज्ञानवादी ,हिंदुत्ववादी ,वक्ते समाज सुधारक ,भाषाशुद्धीचे प्रवर्तक ,यंत्रयुगाचे समर्थक, अशा अनेक गोष्टी त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सामावल्या होत्या.

समाजसुधारणेला ते अतिशय महत्त्वाचे स्थान देत. "माझी समुद्रात टाकलेली उडी लोक विसरले तरी चालेल ,पण माझा सामाजिक विचार कधीही विसरू नये" असे ते सांगत.

ते हिंदू समाजाच्या पुरते बोलत असत,. आणि लिहीत असत.

त्यांना विज्ञाननिष्ठ,पोथीमुक्त आणि ऐहिकतेचे भान असलेला भारतीय समाज घडवायचा होता .ते मनुस्म्रुती, आणि वेदांना अभ्यासनीय आदरणीय ग्रंथ मानत. पण ते अनुकरणीय नाहीत हे सुद्धा परखडपणे सांगत. सर्व हिंदूंना यात प्रवेश मिळेल असे एखादे मंदिर बांधावे अशी कल्पना सावरकरांच्या डोक्यात आली आणि रत्नागिरीतील दानशूर ग्रहस्थ भागो शेठ कीर यांना मंदिर बांधून देण्याविषयी विचारले आणि त्यांनी मान्य केले. या मंदिरात श्रीविष्णू लक्ष्मीच्या मूर्तीची स्थापना केली. आज हेच मंदिर रत्नागिरीत पतीत पावन मंदिर म्हणून ओळखले जाते. रत्नागिरीतील वास्तव्यात त्यांनी जवळपास 500 मंदिरे अस्पृश्यांसाठी खुले केले ,सहभोजने आयोजित केलीत. साहित्य क्षेत्रात सावरकरांनी फार मोठे योगदान दिले आहे. त्यांनी दहा हजारापेक्षा जास्त पाने मराठीत तर पंधराशेच्या जास्त पाने इंग्रजी भाषेत लिहीलेले आहेत. त्यांच्या

ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा प्राण तळमळला....

हे हिंदू नरसिंह प्रभो शिवाजी राजा.... या गाण्यातून प्रत्येक शब्दात शिवाजी महाराजांच्या कार्याची महती कळते.

युक्तीच्या, प्रसंगी शक्तीच्या जोरावर महाराजांनी यवनां कडून स्वराज्य परत मिळवले.त्यांच्यासारखीच बुद्धी शक्ती आणि युक्ती आम्हालाही लाभू दे असे सावरकर या कवितेतून मागत आहेत.

जयस्तुते.. जयस्तुते.... श्री महन्मगले शिवास्पदे शुभदे....

स्वतंत्रते भगवती त्वांमहं यशोयुतां वंदे... ही सावरकरांनी लिहिलेली स्वतंत्र देवीची आरती आहे .तू राष्ट्राचे चैतन्य आहे. देशाचा प्राण आणि तुझ्यामुळेच उत्तम आचार विचारांची संपन्नता लाभते. म्हणून तू चैतन्यदायी आहेस. परवशतेच्या पारतंत्र्याच्या दाटलेल्या अंधारात स्वतंत्र देवी तू आकाशात लखलखती चांदणी असतेस. असे ते वर्णन करतात. तसेच तानाजीचा पोवाडा हे अतिशय लोकप्रिय आहेत. याशिवाय त्यांनी काळे पाणी, माझी जन्मठेप, शत्रूच्या शिबिरात, मोपल्यांचे बंड,कमला हे अंदमानला रचलेले महाकाव्य, संन्यस्त खडग्, उःशाप, उत्तरक्रिया ही संगीत नाटके लिहिलीत.अजूनही बरेच साहित्य आहे. अशीही त्यांची साहित्यसंपदा आहे. 10 डिसेंबर एकोणविसशे नऊ साली स्वातंत्र्यवीर सावरकरांनी ब्रिटनच्या समुद्र किनाऱ्यावर ने मजसी ने परत मातृभूमीला... सागरा प्राण तळमळला .... ही रचना त्यांना स्फुरली. मातृभूमीला हरवलेले आणि कायमचा दुरावला जाईल का ? या वेदनेतून हे अप्रतिम काव्य निर्माण झाले आहे. सावरकरांचे मातृभूमी वरचे प्रेम आणि त्या आड येणाऱ्या सागरा वरचा रोष यात प्रकट झाला आहे.या कवितेची रचना, सावरकरांचे काव्य, म्हणजे अति उत्कट आणि प्रखर राष्ट्रभक्तीचे द्योतक आहे. सावरकरांची अस्पृश्यता निवारणाची आणि जातिभेदाच्या निर्मूलनाचे कार्य पाहून विठ्ठल रामजी शिंदे यांनी सावरकर यांचे कौतुक केले होते, व माझे उर्वरित आयुष्य सावरकरांना द्यावे अशी प्रार्थना केली होती आणि हाच वीर ते पूर्ण करेल अशी अपेक्षा व्यक्त केली होती. आता सावरकरांची ने मजसी ने परत मातृभूमीला.... आणि जयोस्तुते श्री महान मंगले शिवास्पदे शुभदे... या दोन कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट कराव्यात व तसेच भगूर येथील सावरकरांचे जन्मस्थानी भव्य स्मारक व्हावे अशी सूचना राज्यपालांनी केलेली आहे. या सूचनांची अंमलबजावणी लवकर होईल अशी अपेक्षा करूया

# उपयुक्त उद्योग कोकणात येणे गरजेचे

आधुनिक केसरी

**राजापुर तालुक्यातील बारसु परिसरात १४ गावांमध्ये जगातील सर्वात मोठी सहा कोटी टनांची रिफायनरी आणि पेट्रोकेमिकल प्रकल्प उभारण्याचा घाट घातला जातोय. ' रिफायनरी ' म्हणजे शुद्ध मराठी भाषेत सांगायचे तर 'खनिज तेल शुद्धीकरण प्रकल्प'...! प्रदुषणविरहित रिफायनरी' कशी काय सापडणार...? ' रिफायनरी म्हणजे प्रदूषण आणि प्रदूषण म्हणजे रिफायनरी ' हे साधे सरळ समीकरण आहे. तीच गत ग्रीन रिफायनरीची आहे. महाराष्ट्र शासन अनेक उद्योग महाराष्ट्रात आणते आहे किंवा पुढील कांही दिवसात आणतीलही. आणल्या जाणाऱ्या उद्योगांची परिपूर्ण माहिती शासनाच्या उद्योग विभागाने घेणे गरजेचे आहे. त्यासाठी येणाऱ्या उद्योगाची A To Z बारीक सारीक माहिती घेऊन त्याचा फायदा किती आणि तोटा किती हे ही जाणून घेणे आवश्यक आहे. केवळ उद्योग आणून उपयोग नाही.**

असे कुठेही उद्योग आणण्यापूर्वी स्थानिक राहिवाशी, शेतकरी, मच्छीमार, शेतकऱ्यांच्या जाणाऱ्या जमिनीचा योग्य मोबदला देणे, तेथील स्थानिक समाजिक नेते, स्थानिक पोलीसठाणे, जिल्हापरिषद, यांना विश्वासात घेऊन येणाऱ्या प्रकल्पबद्दल पूर्ण माहिती देऊन तो प्रकल्प येथे किती उपयोगाचा आहे, त्यातून मिळणारा रोजगार, मिळणाऱ्या नोकऱ्या, आणि आजू बाजूच्या परिसराचा होणारा विकास या बद्दल जनतेला माहिती देवून तो समजावून देणे आवश्यक असते आणि बारसु येथील रिफायनरी प्रकल्पबद्दल माहिती शासनाने परिसरातील जनतेला दिली असेलच. बारसु परिसरात १४ गावांचा संबंध या प्रकल्पाt येणार आहे. मात्र ग्लोबल वॉर्मिंगच्या जमान्यात प्रदुषणकारी रिफायनरी प्रकल्प कोकणात आणायचे आणि ' ग्रीन रिफायनरी ' संबोधण्याचे प्रयत्न तर चालू नाहित ना. जर या प्रकल्पमुळे खरोखरच जनतेच्या दैनंदिन जीवनावर परिणाम होत असेल तर जनतेचा होणारा विरोध हा रास्त आहे. बारसु परिसरात गावांमध्ये प्रस्तावित असलेल्या या रिफायनरी प्रकल्पात कच्च्या खनिज तेलावर प्रक्रिया झाल्यावर पेट्रोल, डिझेल, एलपीजी,



डांबर, आदी उत्पादने मिळतील. ती तयार झालेली सर्व उत्पादने पुन्हा खाडी-समुद्रातून पाईपलाईनद्वारे निर्यात करावी लागतील.

याठिकाणी फक्त तेल शुद्धीकरणाचाच प्रकल्प उभारण्यात येणार नसून त्यासोबत पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्स बनवून त्यात रासायनिक द्रव्ये व प्लास्टिक बनवण्याचे अधिक धोकादायक उद्योग असतील. विरोध होतो म्हणजे तेथील राहिवाश्याना व शेतकऱ्यांना हा प्रकल्प नक्कीच मान्य नसावा. जर शासनाने अगोदरच सर्वांना समजवले असेल तर मग विरोध का ? कि हा विरोध कुठच्यातरी राजकीय पक्षांच्या दबावाखाली तर होत नसेल ना. विरोधी पक्षांनी विरोधासाठी विरोध करू नये. जर जनतेच्या फायद्याचा उपयुक्त प्रकल्प येत असेल तर उगाच विरोध कामाचा नाही. तसेच या रिफायनरीला व पेट्रोकेमिकल कॉम्प्लेक्सला औष्णिक ऊर्जा प्रकल्प उभारावा लागेल. त्यामुळे वीज निर्माण करण्याकरिता मोठ्याप्रमाणात कोळसा लागेल तो जाळल्यानंतर सभोवतालच्या परिसरात राखेचे साम्राज्य पसरेल. त्यामुळे श्वसनाचे व त्वचेचे विकार होतील. औष्णिक प्रकल्पासाठी प्रचंड प्रमाणात कोळसा जाळल्यामुळे कार्बन डायऑकसाईडचे वातावरणात उत्सर्जन होईल. त्याच वेळी रिफायनरीतून सल्फर डायऑकसाईड, नायट्रोजन ऑकसाईड व कार्बन मोनाक्साईड हे विषारी वायु हवेत सोडले जातील. ऑक्सिजनचा पुरवठा कमी होऊन आरोग्यावर हानिकारक परिणाम होतील. आंबा, काजु बागायतीच्या मोहरावर परिणाम होऊ शकतो. वरील प्रकार घडणार नाहीत हे जनतेला पटवून द्यावे लागेल. त्यानंतर लोकांचा विरोध कमी होऊ शकतो. तसेच रिफायनरी सभोवतालचा परिसर विस्थापित करणे व विस्थापितांचे पुनर्वसन करणे संबंधित कंपनीला शक्य झाले नाही तर जनतेचे मोठे नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ग्रीन रिफायनरी प्रकल्पाला सर्वात मोठा धोका त्याच्याच शेजारी असणाऱ्या जैतापुरच्या अणुऊर्जा प्रकल्पापासून आहे. आज केवळ वीजच खेडेगावातून येते असे नाही तर शहरांना लागणारी प्रत्येक गोष्ट खेड्यातूनच येते. अन्न, पाणी, वीज, सिमेंट, लाकूड, खडी, वाळू, रेती, लोखंड आणि विविध खनिजे खेड्यातूनच येतात. खेडी ही निर्मिती केंद्रे असायला हवीत आणि शहरे ही व्यापारी केंद्रे असायला हवीत.

**दत्ताराम भगवान दळवी**
**लालबाग, मो. ९८२०५२७८५५**

# भ्रष्टाचाराचा वाढता आजार चिंताजनक



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**भारतात भ्रष्टाचाराचा आजार वाढत आहे.असे एकही क्षेत्र उरले नाही जिथे भ्रष्टाचाराच्या राक्षसाने आपले पंजे खणले नाहीत. भारत हे नैतिक मूल्यांचे आणि आदर्शांचे स्मशान बनले आहे. देशातील सर्वात लहान घटक पंचायतीपासून ते उच्चस्तरीय कार्यालयांपर्यंत आणि लिपिकापासून ते मोठ्या अधिकाऱ्यापर्यंत आज लाच घेतल्याशिवाय सरकारी फाइल पुढे सरकत नाही.है धढधढीत वास्तव आहे.सरकारी कार्यालये भ्ष्टाचाराचे अड्डे बनले आहेत. आजच्या काळात प्रामाणिकपणा हा केवळ कागदाचा तुकडा झाला आहे. जोपर्यंत प्रत्येक भागात खिशातून हिरव्या नोटांचा मारा दिसत नाही तोपर्यंत प्रत्येक काम गोगलगायीच्या गतीने सुरू असते.कागदावर वजन ठेवल की फाईल पुढं सरकायला फारसा वेळ लागत नाही.**

भ्रष्टाचाराची ही वळवी आपली संपूर्ण व्यवस्था पोकळ करत आहे. एकेकाळी सोन्याचा पक्षी म्हणून भारताचा उल्लेख केला जात होता मात्र आज भारत भ्रष्टाचाराच्या दलदलीत बुडाला आहे. आपली नैतिक मूल्ये आणि आदर्श सर्वांचा त्याग केला जात आहे. सरकारी कार्यालयांना लागलेली लाचखोरीची कीड कमी होण्याऐवजी वाढतच चालली असून गलेगठ्ठ पगार असतानाही लाचेच्या माध्यमातून सरकारी कर्मचारी 'वरकमाई' करत असल्याचे दिसून येत आहे. भ्रष्टाचाराने गंभीर स्वरूप धारण केले आहे.टेबलाखालून पैसे दिल्याशिवाय कोणतेही सरकारी काम होत नाही, असा प्रत्यय नागरिकांना वेळोवेळी येतो. यामुळे भ्रष्टाचार वाढू लागला आहे.

भ्रष्टाचार रोखण्यासाठी प्रशासनातील लाचखोरीला आळा बसावा, म्हणून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यरत आहे; परंतु लाचखोरी कमी होण्याऐवजी ती वाढत चालली आहे. बहुसंख्य सरकारी अधिकारी व कर्मचारी लाच घेतल्याशिवाय काम करीत नसल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते. तसेच अनेक जण त्वरित शासकीय काम करून घेण्यासाठी संबंधित लोकसेवकाला लाच देऊन मोकळे होतात, यामुळेही भ्रष्टाचार वाढत चालला आहे. सर्वसामान्यांना हक्काच्या कामासाठी अधिकाऱ्यांना लाच द्यावी लागते.पैसे दिल्याशिवाय काम होत नाही.गेल्या साडेचार महिन्यांमध्ये ३३४ सापळा कारवाई करण्यात आला. यामध्ये ४७५ आरोपींचा सहभाग आहे. सर्वाधिक भ्रष्टाचाराच्या प्रकरणांमध्ये महसूल,भूमी अभिलेख नोंदणी,पोलीस या विभागाचा सर्वाधिक समावेश आहे.

राज्यात लाच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या संकेत स्थळावर दिलेल्या सांखिकी अहवालानुसार सन २०१४ ते २०२३ या कालावधीत आकडेवारी पाहता गुन्ह्यांची संख्या वाढत असल्याचे दिसून येत असून भ्रष्ट अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई होत आहे.

अलिकडच्या शतकांमध्ये भारताने जगातील तीन सर्वात भ्रष्ट देशांमध्ये स्थान मिळवले आहे. भारतातील भ्रष्टाचार हा नोकरशाही, राजकारण आणि गुन्हेगार यांच्यातील संगनमताचा परिणाम आहे. भारताला आता सॉफ्ट स्टेट मानले जात नाही. हे आता एक विचार



राज्य बनले आहे जिथे एका विचारासाठी सर्वकाही होऊ शकते. आज एकीकडे सरळ प्रतिमा असलेल्या मंत्र्यांची संख्या मोजता येईल. एकेकाळी चुकीची कामे करण्यासाठी लाच दिली जात होती, परंतु आता योग्य कामे योग्य वेळी करण्यासाठी लाच दिली जाते. भ्रष्टाचार हा एक कॅन्सर आहे ज्यावर उपचार करण्यासाठी प्रत्येक भारतीयाने प्रयत्न केले पाहिजेत. सत्तेवर आलेले अनेक नवे नेते भ्रष्टाचार संपवण्याचा त्यांचा निर्धार जाहीर करतात, पण लवकरच ते स्वतः भ्रष्ट होऊन प्रचंड संपत्ती कमवू लागतात.

भ्रष्टाचाराबाबत अनेक गैरसमज आहेत, ज्याचा जर खरोखरच सामना करायचा असेल तर त्याचा स्फोट व्हायला हवा. यातील काही मिथक आहेतः भ्रष्टाचार हा जीवनाचा एक मार्ग आहे आणि त्याबद्दल काहीही केले जाऊ शकत नाही. अविकसित किंवा विकसनशील देशांतील लोकच भ्रष्टाचाराला बळी पडतात. भ्रष्टाचाराशी लढा देण्यासाठी उपाय योजताना आपल्याला हे सर्व कच्च्या तेलाचे संकट टाळावे लागेल.

सामाजिक-आर्थिक परिस्थिती सुधारून भ्रष्टाचाराला मारणे किंवा दूर करणे शक्य नाही. कारण आपल्या सर्वांना माहित आहे की, भ्रष्टाचार करणारे बहुतेक लोक आर्थिक किंवा सामाजिकदृष्ट्या मागासलेले नसतात, अर्थातच त्यांचा सामाजिक दर्जा उल्लेखनीय असला पाहिजे.

# आई..

आधुनिक केसरी

**दुपारी पेन्शनसाठी बँकेत आलेल्या कॉलनीतल्या सुमाकाकूंचं सारं बोलणं ऐकून मुकुंदचं कामावरचं पूर्णतः लक्षच उडालं.मग त्यानं अर्धी रजा टाकली आणि अस्वस्थ मनानं तो बँकेबाहेर पडला.सकाळी सोबत आणलेला टिफीनही न घेता तो स्वतःच्या तंद्रीतच स्कूटी जवळ आला आणि स्कूटी स्टार्ट करुन ऊनातच घराकडे निघाला .... दोघी सासू-सुनांची नेहमी घरात धुसफूस सुरु आहे म्हणे गेल्या चार-पाच महिण्यांपासून नि काल तर त्या दोघींनी अगदी कळसच गाठला म्हणे ! ... त्याला सुमाकाकूंचे मघाचे शब्द आठवू लागले... काल अमृता आईला भांडता भांडता चक्क ' लेकीला शेताचे अर्धे पैसे द्यावे वाटले तर आता बसावं ना मग जाऊन कायमचं लेकीकडं ! ' असं म्हणाली म्हणे ! किती कमाल झाली म्हणायची तिची ! .. तो विचारात पडला... ताईडीला शेताची अर्धी रक्कम द्यायच्या वेळेस आपण सारं काही तिला नीट समजून सांगितलं होतं तरी पुन्हा तिच्या तोंडाला असं काही बोलणं यावं ?**

... त्यानं कष्टी होऊन एक सुस्कारा सोडला .... आज सकाळी तर ती पपांचं दुखत आहे म्हणून सोनूला घेऊन गेलीही औरंगाबादला, म्हणजे दोघींची चांगलीच ' तू मी ' झालेली दिसतेय काल नि पपांचंही काही दुखत=बिखत नाहीये,तर ती खोटं बोलून रागे रागे गेलीय ... मुकुंदला तिच्या सकाळच्या अचानक जाण्याचा उलगडा झाला... आईही कशी आहे म्हणा ! इतक्या दिवसानं घरात सारं सुरु आहे तर,तिनं तरी आपल्याला सांगायचं ना की बाळा,अश्यानं असं आहे म्हणून ! पण तीही गप्पच राहिली नि सांगितलं नाही कधी आपल्याला काही ...त्याच्या मनात आलं आणि त्यानं आवंढा गिळला... नाहीतर आईला वाटलं असेल,कशाला बाळाला घरातलं असलं काही सांगत बसायचंय आपण ? तसं म्हणावं तर अमृताही कधी काही बोलली नाही म्हणा ! का कुणास ठाऊक पण त्या दोघीही अगदी गप्पच आहेत ? .... त्याला प्रश्न पडला.मग डोक्याला ताण देऊन घरातलं रोजचं वातावरण तो आठवू लागला आणि गेल्या काही दिवसांपासून त्या दोघींमध्ये पहिल्यासारखं बोलणं होत नसल्याचं त्याच्या ध्यानात येताच त्याच्या काळजाचा ठोका चुकला. तो जड मनानं कॉलनीत घरासमोर आला.त्यानं स्कूटी बंद केली आणि कपाळावरचा घाम पुसत बेल वाजवली.' आले s s ' म्हणीत आतून आई आली आणि तिनं बैठकीचं दार उघडलं.समोर मुकुंद उभा दिसताच तिनं मुकुंदला काळजीनं विचारलं, बाळा, तू या वेळी ? तुझी तब्येत तर ठीक आहे ना ? तो काहीएक न बोलता त्राण संपल्यागत समोर सोफ्यावर विसावला आणि आईकडं टक लावून बघू लागला.त्याच्या मनात आपण अपराधी असल्याची भावना उफाळून आली आणि पुढच्याच क्षणी तिच्या कुशीत शिरुन तिची क्षमा याचना करण्याची त्याला अनावर इच्छा झाली पण त्यानं स्वतःला सावरलं.तिच्यापासून स्वतःचे पाणावलेले डोळे लपवण्यासाठी तो म्हणाला, आई,पाणी घे बरं .. " आईनं किचनमधून ग्लासभर पाणी आणून टीपॉयवर ठेवलं आणि घाबरुन त्याच्या बाजूलाच ती शांत उभी राहिली.त्यानं पाणी पिताच आईनं त्याच्या कपाळावर हात ठेवत विचारलं, " डोकं दुखतंय का तुझं, बाळा ? आई, बस बरं तू सोफ्यावर " तो आईचा हात धरीत म्हणाला.आई मग काहीएक न म्हणता त्याच्यासमोर सोफ्यावर बसली आणि त्याच्याकडं गोंधळून बघू लागली.लगेच मुकुंदानं विचारलं, आई,काल कशासाठी भांडणं झाली तुमची ? .. त्याचा असा अगदी अनपेक्षित प्रश्न ऐकून आई चमकलीच ! गोंधळून तिनं विचारलं, कसली भांडणं ? कुणासोबत ? " आई,सारं काही मला सुमाकाकूंनी सांगितलंय ...तू फक्त सांग काल काय झालं होतं ते, " निर्वाणीचं बोलल्यासारखं तो म्हणाला. ..आईच्या मनात एकच गोंधळ उडाला आणि ती विचारात पडली.काय बोलावं नि काय नाही,हा तिला प्रश्न पडला आणि वाचा गेल्यागत ती बराच वेळ अगदी तशीच बसून राहिली.ती आता काहीच बोलणार नाही,असं लक्षात येताच मुकुंद विनवणी करीत म्हणाला, आई,बोल ना ! अमृता काल बोलताना तुला ' आता तुम्ही तायडीकडंच का जाऊन राहत नाहीत ?' असं म्हणाली का ? " .. त्यानं थेट असा प्रश्न विचारताच आईनं गोंधळून त्याच्याकडं एकदा पाहिलं आणि निःश्वास सोडून ती समोर



शुन्यवतपणे बघत राहिली,पण तिच्या मनात मात्र प्रचंड खळबळ माजली. बराच वेळ ती तशीच मूक बसून राहिली. मग सारा ताण असहय्य होऊन मुकुंदानंच विचारलं, " आई,बोल ना गं,तुमची धुसफूस गेल्या चार महिण्यांपासून सुरुय म्हणे .. " .. आईनं मनातली सारी खळबळ थोपवली आणि त्याच्या नजरेला नजर देत ती निर्धाराने गंभीर आवाजात म्हणाली, बाळा,ताईडीला शेतीचे अर्धे पैसे देण्याचा आपल्या दोघांचा तो निर्णय अमृताला पटलेला असला तरीही आवडलेला नाहीय,हे माझ्या लक्षात आलंय.ती आजच्या पिढीची मुलगी असल्यानं कोणत्याही निर्णयात तिचा सहभाग असावा,असं तिला वाटणं साहजिकच आहे म्हणा ! पण आपण तेव्हा तिला काहीही विचारलं नाही... नि तिच्याही हे लक्षात यायला पाह्यजे की,आपला बंगला झालाय, नवऱ्याची नोकरी सुरुय नि सोबतच सासूबाईंची पेन्शनही आहे.थोडक्यात देवकृपेनं माणसाला स्वतःकडं जे काही हवं असतं, ते सारं काही आपल्याकडं आहे.पण माणसाचा स्वभाव आड येतो ना ! तुला सांगते,हव्यास, लोभ सुटत नाही माणसाचा नि हेच त्याच्या दुःखाचं कारण ठरतं मग... नि आमचे काही एवढे भांडणं झालेले नाहीत.तुला सांगते,घरात भांड्यापाशी भांडं आलं की थोडासा आवाज होतच असतो ना, त्याकडं लक्ष द्यायचं नसतं.नि मला एक सांग तू ,तिची स्वतःचीही आयुष्याविषयी काही स्वप्नं,मतं,विचार असतीलच की ..तर बाळा एक लक्षात ठेव,आपण दोघंही तिच्याहून मोठे आहोत म्हणून आपण दोघांनीही तिला नीट समजून घेतलं पाह्यजे नि तिला कसला त्रास होईल वा वेदना होईल,असं काहीही नाही करायचं आपण.बाळा,आलं ना तुझ्या लक्षात सारं काही ?" आई अगदी एका दमात एवढं बोलली आणि उत्तराच्या अपेक्षेनं बघू लागली. .. तिचं हे सारं बोलणं ऐकून मुकुंदच्या मनात आईविषयीचा आदरभाव दुणावला.त्याचा उर अभिमानानं अगदी भरुन आला आणि भारावल्या मनःस्थितीमध्ये तो म्हणाला, ' आई... ' पुढं मात्र तो काही बोलू शकला नाही,कारण त्याचा कंठ दाटून आला होता...

**उमेश मोहिते,**
**कालिकानगर, माजलगाव**


# चला निसर्गाशी बोलू थोडे



आधुनिक केसरी

पृथ्वी उद्यान ( सिडको एन-४ ) मध्ये बहरला बालमखिरा वृक्ष ( किगेला ट्री ) . फुल वर्गीय या वृक्षाला बहरलेली झुंबरा सारखी फुले व काकडी सारखी फळे येतात आणि दिसायला ते फार सुंदर दिसतात. हे या परिसरातील नागरिकांसाठी एक वेगळे आकर्षण ठरले आहे. सध्या ही फुले वाटसरुचे लक्ष वेधुन घेतात व थोडावेळ थांबून त्याचे सौंदर्य पहावे असे वाटल्या शिवाय रहावत नाही. आता थोडे या वृक्षा विषयी जाणून घेऊया. हा वृक्ष किगेलिया आफ्रिकाना आफ्रिके मध्ये आढळणारी प्रजातीतील असून या वृक्षाला sausage tree असे हि संबोधिले जाते. या वृक्षाला विषारी फळे येतात. हि फळे दिसावयास काकडी सारखी असून दोन फूट लांबी पर्यंत वाढततात व वजन साधारण सात किलो पर्यंत होते. यास प्रथम पानांच्या बाजूने एक तार निघते. या तारेला हळूहळू कळ्या येतात. या तारेच्या वाढीनुसार कळ्यांचा गुच्छ टप्प्याटप्प्याने जमीनीच्या दिशेने येण्यास सुरुवात होते. पुढील टप्प्यात या कळ्यांना झुंबरा सारखी थोडीसी रेडीश कलरची मनमोहक फुले लागतात. बालमखिरा हे फळ विषारी कॅटेगरिचे आहे. सेंट्रल केनिया या प्रदेशात, हे फळ वाळवल्या नंतर याचा उपयोग "अल्कोहोलीक ब्रेव्हरेज" तयार करण्यासाठी होतो. या वृक्षाची ट्रॉपिकल रिजन मध्ये अर्नामेंटल ट्री व असाधारण फळासाठी विशेष लागवड केली जाते. तर हे असे एक आगळे वेगळे झाड परिसरातील लोकांचे आकर्षण झाले आहे.

**अरविंद कुलकर्णी, सिडको, एन-४**










# ती



वैशाली महाडिक
संपर्क क्र. 9767437923

आधुनिक केसरी

**..आणि विचारांच्या तंद्रीत चिमणीचे त्या खिडकीच्या दोन पडद्याच्या मधून सहज समोर लक्ष गेले.त्या उगव तीच्या दिशेला दूरवर विसावलेल्या ऑफिसच्या प्रांगणातल्या झाडांच्या सावल्या हळूवार जमिनीवरून सरकत चालल्या होत्या. तस तर तिचे नि उन्हाचे नाते जुनेच, पण आज त्यांचे ते निराळे जग निराळी भाषा चिमणीला काहीतरी खुणावत होती.तिच्या तंद्रीला मोडत ऑफिस मधली ती खुर्ची कर्र...कर्रर्र...करून उगीचच शांततेचा भंग करीत होती. चला काम आवरायला हवयं." (स्वतः शीच पुटपुटत) हातात पेन घेऊन लिखा पडी करत फायली चाळायला सुरुवात केली.**

काम संपता संपता एक एक फाईल व्यवस्थित लावता , स्टॉपर खाली ठेवलेला तो कागद वाऱ्याने हलून लक्ष वेधून घेत होता. आणि चिमणी तो कागद हातात घेऊन वाचू लागली. अभिमानाने नाकपुड्या फुगवत तिची कॉलर ताठ झाली. मनाचा सुर भावनेत मिसळला. नि ते दोन थेंब गालावरून ओघळून कौतुक सोहळा शब्दांवर पाझरले. हातातल्या रुमालाने ते टिपता टिपता , डोळ्यासमोरून कृषी विद्यापी ठाच्या शेतातील ते हिरवगार गवत पाईप लाईन क्षणात डोळ्यासमोरून गेले. ( हुंदका आवरता आवरता ) विचाराच्या तंद्रीत... दारावर टकटक झाली. "मॅडम सहा वाजून गेले. आ, हो हो, "इथलं, जरा दहा पंधरा मिनिटात आवरते, आणि निघते." "मॅडम ?"( स्वतःशी पुटपुटत ) हरवून गेली.पाच दहा मिनिटात पुन्हा फायलीची इकडे तिकडे आवरा आवर करत ती दाराबाहेर आली. विचाराच्या तंद्रीत तिने गाडीला किक मारली. बघता बघता वाऱ्याच्या गतीने चाके फिरू लागली. आकाशात घराच्या ओढीने जाणारे ते थवे भुर्रकन डोक्यावरून उडून चालले होते. साकवाच्या दिशेने वाटचाल करणारी चाके आणि चाका बरोबर हळू हळू डोंगरा आड चाललेला रविराज निषेच्या मांडीवर विसावला होता. साकवा वरून चालताना एका क्षणाला सोबत असणारा सूर्य नकळत गायब झाला. नदीच्या पाण्याला आणि दूर... डोंगरातल्या झाडांना काळोखाची आलेली ती सितलाई म्हणजे एक अपूर्व असा संगम च होता जणू... एका खूप मोठ्या संघर्षानंतर च जणू विसावलेला. गिरीराजाच्या कडेला आलेली लाली, रविराजाच्या संधी कालात बुडून लुप्त होऊ पहात होती.निशा ने आपले पंख पसरून, धरती माय वर काळी शाल पांघरली.त्या शालीला उगवतीच्या दारातून येणाऱ्या रजनिशच्या शितलतेची किनार उमटली. घटकाभरानंतर जमीन मागे सरकत सरकत पावलांना खेचनारी ती ओढ आणि समोर दिसणारी गावाची ती वेस नजरेच्या टप्प्यात येवू लागली. पण एवढ्यात ... .... चाळीस पंचेचाळीसच्या स्पीडने रस्त्यावरून चालणारी ती चाके त्या आवाजाने तीस चाळीसच्या स्पीडने चालू लागली.नव्हे नव्हे जवळ जवळ थांबलीच, गावाबाहेरच्या त्या वस्तीवर दोन काठीच्या साहाय्याने साडीने बांधलेल्या झोपाळ्यातल्या रडणाऱ्या त्या बाळाच्या आवाजाने, ...आणि माहित नाही का ?जवळ जावून पाहू लागले, दुपट्याच्या आड गेलेला तो चंद्र दिसेनासा झाल्यामुळे इवल्याशा डोळ्यात पाणी तरळले.पण काही क्षणात तोंडवर चे कापड बाजूला सरकून आकाशातला तो चंद्र चांदण्या सार सार इवल्याशा डोळ्यात सामावून गेलं. एक नवी चमक त्याच्यात जाणवू लागली होती. त्याचे ते इवले इवले हात त्याला जणू धरू पहात होते.

एवढ्यात त्या चटचटच्या आवाजाने लक्ष वेधले गेले. चुलीतल्या धुराबरोबर हवेत उडणारी ती ठिणगी आणि तापलेल्या तव्याच्या तळाला चिकटलेली ती काजळी चमकून जणू हसत होती. ( एक समज बरं का !तव्याची काजळी हसू लागली की काहीतरी चांगले होते. कधीतरी कुठेतरी ऐकले होते. )आणि एवढ्यात कुठूनतरी डोळ्यासमोर निवडुंगाच्या गच्च भरलेल्या काट्यातून लालभडक फुललेले ते फुल, आणि कित्येक दिवसाच्या क्षुधे नंतर वाळवंटातल्या त्या हापासीच्या तोंडातून ठिपकनारा तो थेंब डोळ्यासमोर येऊन काही तरी सांगू पाहत होता . ...आणि तिथेच बाजूच्याच शेतात पाचट जळताना..नकळत तोंडून किती विरोधाभास ना! वाऱ्याच्या गतीने फिरणारी ती चाके जणू मनाच्या चक्राला ही वाऱ्याच्या गतीने फिरवू लागली.आणि वाऱ्याच्या गतीने वाहणारे मन भूतकाळातल्या त्या दहा अकरा वर्षा पूर्वीच्या दुपार वर विसावले. का कोण जाणे! तेव्हा .. त्या दिवशी उन्हाच्या जळत्या वेळी....ते भगभगनारे ऊन डोळ्यांना बघवत नव्हते. आई गं ! स्स.. स्स...डोळे गच्च मिटून....पायात रुतलेल्या सडांब्याची धसाडी काढताना... काय माहित ? कुठून ती अचानक डोळ्यासमोर आली.आणि.. त्या अकरा बारा वर्षांच्या मुलीच्या डोळ्यावरच्या त्या बटा ना सरकवत.. तो हात, तिच्या डोळ्यातली ती चमक खूप काही सांगू पाहत होती. त्या डोळ्यातली ती उर्मी... जणू..! उत्कंठे ची अपूर्वाईच होती ..अवचित येऊन हरवलेल्या त्या सावल्यात अचानक डोळ्यासमोर येऊन उभी राहिली आणि.. "भेटला तर म्हणायचं तुला आज वेळ."
"खर तर रागवलेच होते ग तुझ्यावर!" "आणि काय हे.. ?"
ही बैलगाडी हे झोक्यातल बाळ, बाजूला असलेले तांबूस भूर्या केस आणि अर्धवट कपड्यातल हे बाळ,ह्या रापलेल्या बांगड्या , आणि त्याचा तो बुळंबुळीत आवाज ..काळजी म्हणावी की.. ? ममत्व "
"पण ह्या सर्वाती 'ती ' कुठे गेली ग ?" " शाळेतील मॅडमला, मी मॅडम होणार म्हणणारी." "काय माहित ?" "कुठेतरी हरवली बहुतेक !" ..का ? काय ?कुठे ?कसे ? सार सार कस अगदी चिमणी सुद्धा निःशब्द पण...काहीतरी होते म्हणूनच की काय! नेमक्या तेवढ्याच वेळात दूरवरच्या ओढ्यातून येणारा तो कुहूऱ्र कुहूऱ्र कोकिळेचा तो कर्णमधुर आवाज तिच्या कानाजवळ घुमू लागला. नकळत तोंडून शब्द बाहेर पडले , पक्षांची शाळा...
कल्पनेतलं ते हरीण कधी कधी कधी किती सुसाट सुटतं ना!

त्या जळत्या वेळी चुरगळलेल्या पाचटीची त्याच दिवशी कडूशाला राख झाली होती, पण त्याच धुमसणाऱ्या राखेखाली एका ठिकाणी खोडव्याला फुटलेला गारासलेला तो अंकुर नव्या पालवीतून फुटू पहात होता. साखर शाळा चालतात,किंवा नाही.त्यामागची कारणे अडचणी असतील नसतील,आणि अस बरचसं खूप काही त्यावरुन मनाची झालेली घालमेलं. समस्या चे समाधान कि समाधानाची समस्या ? ही वाट किती दूर जाते काय माहित ? समाधान होईपर्यंत काही न करता झालेली ती सुरुवात त्यादिवशी खूप काही करून गेली. कुठल्याशा त्या हळव्या कोपऱ्यात तेव्हा तिला काहितरी जाणवले की काय ...! काय माहित खूप गाठी बसलेल्या त्या जाळ्याची एक एक गाठ सोडवता सोडवता प्रयत्नाने..कदाचित साऱ्या गाठी सुटून झालेला गुंता सुटून कदाचित संपूर्ण जाळे मोकळे होऊ शकते... सर्रकन वेळ सरकावी, आणि पहिल्या ठिपक्यापासून



सुरु झालेली रांगोळी पुन्हा त्याच ठिपक्या भोवती यावी ...! त्या जळत्या उन्हातला तो संवाद, पुन्हा एकदा नकळत...
शुल्लक कारणासाठी हळवी होणारी तू तू राहिली नाहीस. तू तू कोणीतरी वेगळी होणार होतीस ना ? आठवतेय का चिमणी तुला, तुझ्या गावी असताना वर्गात तुला बाईंनी तुम्ही कोण कोण होणार असा प्रश्न विचारला होता. तेव्हा तू काय म्हणाली होतीस. "मी मॅडम होणार." आणि त्याच्यानंतर काही दिवसानंतरच तुला आईबाबा बरोबर इकडे यायचे होते. तेव्हाही तू किती रडली होतीस. तुला शाळा सोडून यायचे नव्हते तेव्हा. आणि त्याच्यानंतर हे मागच्या एक दोन वर्षात काय ग! हे हे चार पाच महिन्याचे हे बाळ,हे दुसरे एक दीड वर्षाचे बाळ हे काय आहे ग! तू कोणीतरी वेगळी होतीस आणि आजही आहेस. "चिमणी" "अम्म्" हो" मनमोकळे पणाच्या वेलीला लागलेली संवादाची कळी दडपणातून हळूवार उमलू लागली. "पण मी तरी काय करू ग!" "माझ्याकडे दुसरा मार्ग नाही ग." "का ? का मार्ग नाही.मार्ग आहे." तो शोधला तर सापडेल. हे छोटे बाळ सांभाळायला लागते.ते दुसर बाळाला खाऊ वगैरे असे कितीतरी प्रश्न,आणि मग त्याच्या उत्तराच्या बदल्यात मिळालेली काही अपेक्षित तर काही अनपेक्षित उत्तरे, तुला हे सगळ सोडून दे असं म्हणतच नाही जबाबदारीची जाणीव आहेच ग! "पण " तरीही तू वेगळी आहेस हे कायम लक्षात ठेव , तू काहीतरी प्रयत्न तर करून बघ. आणि कधीही अगदी काळ्या रात्री सुद्धा कधीही मागे वळुन पाहिलेस ना तर कायम मी तुझ्यासोबत असणार आहे. एवढं लक्षात ठेव. ..आणि तेव्हाच अचानक समोरच्या रस्त्यावर पांढरी शुभ्र गाडी अचानक थांबली काय. बिघडलेली ती गाडी तिने लहान मूल सोबत असताना ही प्रयत्नाने दुरुस्त केली काय. त्या दोन टारगट मुलांना स्वतःच्या चतुराईने बोलती बंद करून स्वाभिमान धाडसानेआणि प्रयत्नाने सगळे शक्य असते ,आणि त्यातून जगण्याचा एक नवा अनुभव देवून गेली. प्रत्येकाच्या त काहीतरी वेगळे असतेच ग. तो प्रसंग घडताना चिमणीच्या हाताच्या घट्ट मुठी त्याचे प्रतीक होत्या. गाडीतल्या त्या बाईने त्या दोन मुलांची चतुराईने पॅम्म चर झालेली गाडी तिच्या अंगावर असलेली ती सफेद साडी आणि त्यावर असलेला तो काळा कोट तिच्यात नवी उमेद भरून गेली. आणि ते एक वाक्य माझी मदत करण्यापेक्षा तुम्हाला कोण मदत करते का ते आधी पहा. नाहीतर या आड रानात तुमची काय हालत होईल,या एका वाक्यातून नी कृतीतून चिमणीच्या आतली कमकुवत चिमणी केव्हा भुर्र..झाली ते तिचे तिला सुद्धा कळले नाही.

त्या बाई सहज बोलता बोलता गाडीत बसून एखादा पक्षी भुर्रकन उडून जावा, तशी निघून गेली.आणि ती मुले.... पश्चिमेच्या क्षितिजाकडे चाललेला तो तळपता सूर्य स्वतःचे मार्गक्रमण करत पुढे चालला होता. "किती छान!" म्हणजे आपणही हे करूच शकतो.कोणतीच गोष्ट अवघड नाही. "पाहिलेस चिमणी" "आज स्त्रिया मुली कुठे पोचल्यात ते. बोलण्या बोलण्यातून जाणवलेला तो आशेचा एक किरण.. "किती चांगलं मी ही हे करणारच.. " मॅडम मी होणारच" नकळत तोंडून शब्द बाहेर पडले. "जमेल तुला!" "तू करून तर बघ जमेल तुला!" "जमेलच ग!" "पण ?" म्हणता म्हणता "ठीक आहे." म्हणून चिमणीआजूबाजूला पाहू लागली.पण ?...पण एका दिशेला तिला दिसली फक्त दूरवर उडालेली ती पाठमोरी चिमणी! पाऊस आल्यावर एखाद्या गरुडा ने उंच आकाशात झेप घ्यावी, तशी चिमणीच्या मनाने उंच झेप घेतलीआणि... ध्येयासक्ती ने पछाडलेल्या मनाला कुठे भान असते. आणि त्याला इच्छा शक्तीची जोड मिळण्याचाच फक्त अवकाश. कुठून काय म्हणजे इच्छा तिथे मार्ग असेच काहीसे व्हावे.आणि मग.. ? किती तरी अडचणी असताना ना शाळा ना वही ना पुस्तके पण... तेव्हा आणि त्या एका सायंकाळी ध्येयाने प्रेरित झालेल्या चिमणीच्या मनाला कोणीही थांबवू शकत नव्हते, **क्रमशः**

# राष्ट्रीय स्पर्धा परीक्षेत मराठी मुलं मागे का ?




डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**नुकतेच यू पी एस सी चे निकाल जाहीर झालेत.त्यात सविस्तर राज्य स्तरावरील टक्केवारी जाहीर झाली नसली तरी पहिल्या पाच मध्ये चार मुली आहेत. यात आपल्या राज्यातील एकही नाही. तसेही सरकार अशा स्पर्धा परीक्षेच्या तयारी साठी विविध वर्गातील मुलांना सवलती, मदत देत असले तरी त्याचे दृश्य, उल्लेखनीय परिणाम दिसत नाहीत. अशा परीक्षे साठी जी तयारी करावी लागते ती एखाद्या तपश्चऱ्ये सारखी असते. खोलवर अभ्यासाची गरज असते. प्रश्न समजून घेणे,परिक्षकाला नेमके काय अपेक्षित आहे याचा विचार करून,नेमक्या शब्दात, हवे तेच, तसेच उत्तर लिहिणे, लिहिताना वेळेचे भान असणे, हे सारे विचारात घ्यावे लागते.**

यासाठी अनेक जण क्लासला जातात.तिथली तयारी कोण कसे शिकवतो यावर अवलंबून असते.अनेक जण यासाठी दिल्ली ला जाऊन राहतात.अन् कित्येक महिने तयारी करतात.आता तर यू ट्यूब वर देखील विषयानुसार लेक्चर्स उपलब्ध आहेत. यापैकी डॉ विकास दिव्यकिर्ती यांची व्याख्याने मी स्वतः ऐकली,बघितली आहेत.जी अतिशय उत्कृष्ठ आहेत. या परीक्षे साठी स्टडी मटेरियल देखील सहज उपलब्ध असते आजकाल. विषयाची निवड देखील तितकीच महत्त्वाची असते.या परीक्षे ला डॉक्टर इंजिनिअर,अशा कोणत्याही विषयाचे पदवीधर बसू शकतात. वेगवेगळ्या पदवीधराचा दर्जा, त्यांची क्षमता अर्थातच वेगळी असते. कोणत्याही प्रश्नाकडे बघण्याचा तुमचा स्वतःचा दृष्टिकोन किती तार्किक,वैचारिक, वैशिष्ट्य पूर्ण आहे हे देखील तितकेच महत्वाचे. उत्तरे लिहिण्याची भाषा देखील तितकीच महत्वाची. अनेकांना उत्तर माहिती असते. पण नेमक्या वेळात,नेमक्या शब्दात,मुद्देसूद पद्धतीने व्यक्त होणे त्यांना जमत नाही.परीक्षेच्या तीन तासात तुमची मनस्थिती, प्रसंगावधान राखून, विवेकाचा पूर्ण उपयोग करून विचारलेल्या प्रश्नाला न्याय देणे, यातच खरी कसोटी असते.इथे क्याजुअल अप्रोच चालत नाही.सरकारी फायदे,सवलती घेणारे या परीक्षा,त्या संबंधित तयारी हे सारे किती गांभीर्याने घेतात हा देखील संशोधनाचा विषय आहे! केवळ शिष्यवृत्ती मिळते, हॉस्टेल मध्ये फुकट राहायला मिळते म्हणून लाभ घेणारेविद्यार्थी जास्त असतात. अनेकांना तर न्यूनगंड देखील असतो. पण या उलट जे तयारी, अभ्यास गांभीर्याने घेतात, सचोटीने करतात ते यशस्वी होतात. अनेक ग्रामीण भागातले विद्यार्थी विपरित परिस्थिती शी सामना करून घवघवित यश मिळविल्या च्या बातम्या आपण वाचतो. आता तर मातृ भाषेतून, हिंदीतून देखील उत्तरे लिहिण्याची



सोय, सवलत असल्याने, इंग्रजी येत नाही या न्यूनगंडाची भीतीबाळगण्याचे देखील कारण नाही. लेखी परीक्षे इतकेच इथेमुलाखती लादेखीलमहत्व असते.इथे तुमचे एकूण व्यक्तिमत्व तपासले जाते. तुम्ही मुलाखतीच्या रूम मध्ये प्रवेश घेतल्या पासून तुमच्या देह बोलीकडे, वागण्या बोलण्याकडे तज्ञांचे बारकाईने लक्ष असते. हे अधिकाराचे पद महत्वाचे असल्यानं,तुमचे सामान्य ज्ञान, सामाजिक भान, संविधान,कायदे याविषयीची जागरूकता, नीती, अनीती, सत्याची चाड, आंतर राष्ट्रीय प्रश्ना विषयीची मते तपासली जातात.. इथे इतरा पासूनचे तुमचे वेगळे कौशल्य, धैर्य, प्रसंगावधान फार महत्वाचे असते. गाफील राहून चालत नाही. तुम्ही समस्येला सर्वांना बरोबर घेऊन कसे सामोरे जाता, चुका करत कसे नवनवे शिकत जाता याला महत्व असते.

आजकाल सिव्हिल सर्व्हिस म्हणजे मान,प्रतिष्ठा, सरकार दरबारात, समाजात वजन, पदाबरोबर मिळणाऱ्या सोयी सुविधा यालाच महत्व दिले जाते. हे पद म्हणजे वर कमाई,कोणतेही काम करून घेण्याचा अधिकार, असेच या पदाकदे बघितले जाते. देशसेवा,समाजसेवा वगैरे दुय्यम! त्यामुळे मुळातच उद्दिष्ट चुकीचे असल्याने तयारी देखील त्याच मनोवृत्तीतून केली जाते. आपली मुलं मागे पडतात त्याचे हेही एक कारण आहे. यंदाच्या यू पी एस सी निकालातआपल्याराज्यातीलयशस्वी उमेदवाराचा आकडा कमी आहे. पहिल्या शंभर मध्ये महाराष्ट्र राज्यातले प्रमाण घटले आहे. राज्यातली पहिली देशात २५व्या क्रमांकावर आहे.हे निकाल बघता आपले विद्यार्थी, पालक, कोचिंग संचालक सर्वांनीच या सर्व्हिसेस कडे अधिक गांभीर्याने बघणे गरजेचे आहे. चलता है मनोवृत्ती बदलायला हवी. ही सरकारी सेवा आहे. यात हाती असलेल्या अधिकाराचा उपयोग करून समाजात अनेक चांगले बदल घडविता येणे शक्य आहे. सृजनात्मक काम करण्याचीहीछान सुवर्ण संधी आहे. तिचा आपल्या भविष्या साठी, अवती भवती च्या समाजाच्या भल्यासाठी, पर्यायाने देशासाठी कसा उपयोग करून घ्यायचा हे इच्छुक उमेदवारांच्याच हातात आहे. पूर्वी डॉक्टर इंजिनिअर ही क्रेझ होती. मग सिव्हिल सर्व्हिसेस ला नको तितके महत्व आले. पण या व्यतिरिक्त अनेक उत्तमोत्तम संधी नव्या तंत्र युगात उपलब्ध आहेत. इंजिनियर असलेला महेश काळे संगीत क्षेत्रात नाव कमावतो. बी.टेक, एम.बी.ए. झालेला चेतन भगत कादंबऱ्या अन् सिनेमाचे स्क्रिप्ट लिहितो. इंजिनियर गौर गोपाळ दास आध्यात्मिक गुरू आहेत, समाज प्रबोधन करताहेत. ही मोजकी उदाहरणे आपल्याला काय हवे, आपला आनंद कशात आहे याचा शोध घेण्याच्या दृष्टीने बोलकी आहेत. आपल्याला नेमके काय हवे हे आधी स्पष्ट हवे. चौरस्त्यावर एकीकडे खूप गर्दी जात असते.तर दुसरी वाट अनोळखी, सूनसान असते. अशा अनोख्या वाटेवर जाणाऱ्यांना यश, समाधान,आनंद सारे काही मिळते. कोणती वाट निवडायची हे ज्याचे त्याने ठरवायचे असते.

# तुका म्हणे जोडे केल्याविन कर्म

तुकारामनीती
भाग -55



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**सृजनांचे सृजनत्व त्याच्या विचारांनी समाजात नित्य रुजवले जाते. एखादा लेखक-कवी आपल्या लेखणीला का झिजवत असतो? काही लोकच का लिहित असतील? अक्षर निर्मितीच मुळात माणसांच्या उत्कट भावनांना वाट करून देण्याबरोबर समाजात सार्वकालिक जीवनमूल्ये रुजावी यासाठी झाली असावी. लिहायला-बोलायला अवघड, किचकट असणारी व्यंजने-स्वर हे बाराखडीत सुद्धा शेवटी आहेत. याचे बारकाईने अवलोकन केले असता आपल्या लक्षात येते की, लोकांना सोप्याकडून अवघडाकडे नेणे आवश्यक आहे. क पासून ज्ञ आणि अ पासून ऋ पर्यंतचा प्रवास हा याच तत्वांवर निर्माण झाला असावा. जगद्गुरू तुकोबाराय कसे अभंग लिहिते झाले असावेत? त्यांची प्रेरणा काय असावी? अशा अनेक प्रश्नांवर चिंतन मंथन अनेक विचारवंत धुरिणांनी आत्तापर्यंत केले आहे आणि ते नित्याने होत राहील.**

कोणत्याही वैश्विक लेखनाची निर्मितीच्या अंगाने सातत्याने चर्चा होणे हे त्या निर्मितीमागील महत्वाचे गमक आहे असे म्हणल्यास वावगे ठरू नये. संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत चोखोबा, संत सावतोबा, संत गोरोबा, संत जनाबाई, संत मुक्ताई, संत बहिणाबाई, संत एकनाथ आदि संतांनी निर्माण केलेले अनमोल शब्दधन तुकोबांसाठी पथदर्शी होते. आपणही आपल्या घरातील वारकरी सांप्रदायाची पताका पुढे अशीच फडकत ठेवतांना काही तरी निर्मिती करावी असा विचार तुकोबांना स्पर्शून गेला आणि सुरु झाला हा पुढील आनंददायी लेखन प्रवास! तुकाराम महाराजांचा लेखन आणि जीवन प्रवास मोठा स्पृहणीय आहे. अत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धार हे अविनाशी विचारतत्व सोबत घेऊन जातांना तुकोबाराय नित्य मार्गदर्शन करत राहिले आहेत. पाप-पुण्य, योग्य-अयोग्य, बरे-वाईट, सुष्ट-दुष्ट आदि संदर्भाने तूकोबांनी अनेकवेळा अभंग लेखन केले आहे. त्यापैकीच हा एक अभंग.

**केले पाप जेणे दिले अनुमोदन ।दोघासी पतन सारिखेचि ॥१ ॥विष नवनीता विष करी संगे । दुर्जनाच्या त्यागे सर्व हित ॥धृ ॥ देखिले ओढाळ निघालिया शेता ।टाळावे निमित्ता थैक म्हूण ॥३ ॥तुका म्हणे जोडे केल्याविण कर्म ।देखता तो श्रम न मानिता ॥४ ॥ (शा.अ.गा.अ.क्र.११२०)**

एखादा वाईट कर्म म्हणजेच पाप कर्म करत असेल आणि त्याला पाप करायला एखादा अनुमोदन देत असेल किंवा सहकार्य करत असेल तर दोघेही सारखेच दोषी आहेत. एखाद्याने गाय शोधायला आलेल्या कसायला गाय कुणीकडे गेली याचा रस्ता जरी दाखवला तरी गाय कापणारा कसाई आणि रस्ता दाखवणारा माणूस दोघेही समान दोषी आहेत. समान पापी आहेत. ज्याप्रमाणे दुधात किंवा लोण्यात विष घातले तर त्या संपूर्ण दुधाचे किंवा लोण्याचे विष होते. याच्या जोडीने दुर्जनाच्या सोबत राहून सज्जन माणूस सुद्धा दुर्जन होऊन जातो. त्यामुळे शेताला जातांना एखादा ओढाळ म्हणजे दुष्ट-वाईट विचारांचा माणूस भेटला तर त्याला काहीतरी निमित्त करून टाळावे. आपण पुढे व्हा, मी नंतर येतो म्हणून त्याच्या सोबत जायचे टाळावे. त्यामुळे आपण एखादे प्रसंगी एखाद्या सोबत राहून कर्म करतांना अनेकवेळा विचार करून रहावे. कधी कधी आपल्याकडून अनवधानाने एखादे दुष्कर्म घडून येते आणि त्याचे फळ मात्र आपल्यालाच भोगावे लागते. तुकाराम नीती लिहितांना संत तुकाराम महाराजांनी अनंतवेळा लोकांना जागे करण्याचे प्रयत्न केले आहेत. पाप करू नका. सत्कर्म करा. हे सांगत असतांना अनेक सोपी सोपी जीवन तत्वे लोकांच्या मनीमानसी उतरवण्यासाठी वेगवेगळ्या उदाहरणांच्या सहाय्याने तूकोबांनी आपल्या भजन-कीर्तनातून उपदेश केला आहे. तुकाराम महाराजांच्या लोक कवितेचे हे सर्वात महत्वपूर्ण वैशिष्ट्ये असून लोककल्याण हे सर्वोच्च साध्य त्यांच्या समोर होते हे लक्षात येते. कोणताही विचारवंत-कवी-लेखक-प्रज्ञावंत-समाजसुधारक एखादे कार्य करत असतांना आपल्या समोर लोकोद्धार हे एकमेव ध्येय्य ठेवूनच आपले कार्य करत असतो. आत्तापर्यंत अनेकवेळा वाईट लोकांसोबत चांगल्या माणसांचे अधःपतन झाले आहे. दुर्योधनासोबत गुरुवर्य द्रोणाचार्य, पितामह गंगाभीष्म, कर्णासारख्या महायोध्याला आपले अनमोल जीवन कवडीमोल करावे लागले. मंथरेचा उपदेश ऐकून कैकयी सर्वकाळ उपेक्षा-लांच्छनास्पद विषय होऊन बसली. अशी अनंत उदाहरणे आपल्यासमोर रोजच घडत असतात. दुर्दैवाने हे उलट होणे अपेक्षित आहे, परंतु वाईट व्यक्तीच्या दुर्गुणांची शक्ती जास्त भरते आणि सद्गुणी माणूस वाईट होतो. याच्या उलट परिणाम कमी होतात हे निदर्शनास आले असल्यामुळे आजही या अभंगांची नितांत आवश्यकता वाटते. वर्तमान काळ मोठा खडतर आहे. लोकसंख्येच्या बाबतीत भारत एक क्रमांकाला आला असून सर्वत्र माणसांची गर्दी वाढत असतांना माणसामाणसांमधील अंतर वाढतांना पाहून मात्र मन विषन्न होते. सज्जन कोण आणि दुर्जन कोण ? ओळखणे मोठे कठीण झाले आहे. षडविकारांचे प्रभुत्व वाढत आहे. व्यसनाधीनता, असहिष्णुता, उतावीळपणा, आत्मकेंद्रीवृत्ती मोठ्या प्रमाणात वृद्धिंगत होत आहे. अशा काळात तमाम मानव जातीला योग्य मार्गावर आणण्यासाठी सातत्याने सद्विचाराची पेरणी करत राहणे अत्यावश्यक आहे. महापुरुषांचे विचार नित्याने लोकांमध्ये पेरत राहवे लागतील. असे होणे म्हणजेच वाम मार्गावरील लोकांना सन्मार्गावर आणण्यासाठीचा हा छोटासा प्रयत्न असेल. आज आपण सर्वांनीच कर्म सिद्धांताची अमलबजावणी करणे गरजेचे आहे. सत्कर्म करत रहावे लागेल. तेंव्हा सगळीकडे कल्याणकारी विचारांची सर्वकाळ पेरणी करत राहिल्यास दुष्ट विचारांचा प्रभाव हळूहळू मावळू लागेल. सर्वत्र विश्वकल्याणाचा विचार प्रसारित होईल. माणसामाणसामधील अंतर कमी होत राहील. सगळीकडे वस्तूंची रेलचेल असतांना त्याच्यातून आनंद, समाधान, शांतता, सहकार्य, सौहार्द्र, प्रेम, आपुलकी आदि सद्गुणांची पेरणी होत राहिल्यास माणसं खऱ्या अर्थाने सुखी होतील. माणसं जवळ येतील. संत-ग्रंथ-वारकरी पंथाचे खऱ्या अर्थाने चीज होईल. पाप-पुण्य संकल्पना कालबाह्य होतील. असे होणे म्हणजे खऱ्या अर्थाने तुकाराम नीतीचे सार्थक होणे होय. जय तुकोबाराय!

# ज्ञानाचा अर्थ विचारांशी सुसंगत काढणे यथार्थ होत नाही



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**ज्ञानाचा तत्वज्ञानाचा यथार्थ समजला तर आयुष्याच कल्याण झाल्याशिवाय राहत नाही.पण आपण यथार्थ शोधण्याच्या भानगडीत पडत नाहीत हेच दुर्दैव आहे. आपल्याला हवा तसा सोयीचा होईल तो अर्थ बोध काढण्यात मात्र आपण तरबेज असतो .पण हाच तरबेज पणा आपल्या स्वतःच्या अथवा समाजाच्या पण कामी येत नाही.दिशाहिन अर्थ कोणती नवी आणि योग्य दिशा देवू शकेल. प्रत्येक विषयाशी संबंधित निगडित ज्ञान तत्वज्ञान हे मुळ स्वरूपात सुसंगत असतं.पण आपण जेव्हा त्या क्षेत्रातील ज्ञानाचा अर्थ काढण्याचा प्रयत्न करतो तेव्हा मुळ अर्थ सापडला अथवा शोधता आला तर उपयोग असतो. अन्यथा फक्त मानसिक समाधाना पलिकडे फार काही उल्लेखनीय साध्य होत नाही.**

कारण आपल्या सोईच ज्ञान आणि मुळ ज्ञान यामध्ये जमिन असमानाच अंतर असतं .मुळ ज्ञानाचा वास्तव अर्थ म्हणजे यथार्थ आपल्याला शोधता आलाच तरच हे जमिन असमानाच अंतर संपुष्टात येईल. ज्ञान हे सृष्टीच्या कल्याणार्थ असतं मुळ ज्ञान तत्वज्ञान हे सर्वसामान्य माणसाला समजलं पाहिजे ते समजण गरजेचं आहे.हेच ज्ञान सोप्या भाषेत सांगताना अथवा लोकांना समजविण्यासाठी आज वेगवेगळ्या क्षेत्रात मोठी फौज निर्माण होत आहे.अशी फौज निर्माण होणं हे जरी कौतुकास्पद असलं तरी सुद्धा मुळ ज्ञानाचा यथार्थ लोकांना समजावणं हे खुप महत्वाचे आहे. अन्यथा मुळ ज्ञान दुर रहिल आणि त्याचा फारसा उपयोग पण होणार नाही. म्हणजे मुळ वास्तविक अर्थ जो ज्ञानाला अपेक्षित असतो .पण अर्थ काढणारा आपल्या सोयीनुसार काढतो . मग मुळ गुणवत्ता तर संपुष्टात येईलच आणि उलट निर्माण झालेल ताकलादू ज्ञान जे अर्धवट अथवा दिशाहिन असेल ते उपयोगी कसे पडेल . ज्ञानाचा यथार्थ काढलं तर ते ज्ञान आपल्यासाठी अमृत ठरेल आणि इतरांसाठी देखिल ते अमृत म्हणून कामी येईल पण आपण खरंच असं करतो का ?आपण खरंच यथार्थ शोधतो का तर नाही शोधताना आपल्याला मुळात यथार्थ अपेक्षित नसतोच मुळी म्हणून आपण आपल्या जसा वाटतो तसाच अर्थ बोध काढतो . म्हणजेच आपल्या विचारांनाशी मिळत जुळत अनुकूल अशा पद्धतीने मोडुन तोंडुन आपल्या जिथे अपेक्षित होतं तिथेच मुळ अर्थ घेऊन येतो.पण हाच अर्थ हा आपल्यासाठी तसंच इतरांसाठी देखिल गुणकारी नसतो . मुळ ज्ञान तत्वज्ञान काय सांगत आहे त्याचा मतीत अर्थ काय आहे याच्याशी आपल्याला फार काही देणंघेणं नसतं आपण ज्या पद्धतीने विचार करतोय त्याच पद्धतीने ते ज्ञान त्या पठडीत कसं बसवता येईल आणि ते इतरांवर कस बिंबवता येईल हाच आपला उपक्रम असतो. म्हणून आपण काढलेला अर्थ अगोदर स्वतः वर व नंतर इतरांवर बिबंविण्याचा प्रयत्न करत असतो .हिच बाब गोष्ट बहुतांश अनेकांच्या बाबतीत घडतेय त्या मुळे मुळ ज्ञान तत्वज्ञान फार दुर राहुन गेलं आहे . आणि आपण त्याची तोड फोड करून त्या मुळ ज्ञानाच पार भंगार केलं आहे.मग समाज असो वा समाज व्यवस्था भगांरातुन काय बोध घेईल.

# सोन्याचे वाढते दर पाहून वधूपिता चिंताग्रस्त !



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**आजकाल बघितले तर...जिकडे,तिकडे कोणत्या ना, कोणत्या गोष्टींवरुन हाहाकार माजलेला बघायला मिळत असतो एवढेच नाही तर..त्या सोबतीने महागाईने सुद्धा शिखर गाठलेले बघायला मिळत असतात सर्वच मालाचे, वस्तूंचे भाव वाढलेले बघायला मिळत आहेत तरीही समाजात राहणाऱे गोर,गरीब,सर्व सामान्य लोक कसे, बसे जीवन जगताना दिसत आहेत पण,प्रश्न एका गोष्टीचा आहे की, सर्वच वस्तू महाग झाले आहेत तेवढेच भाव सोन्याचे सुद्धा वाढले आहेत सोन्याचे वाढलेले भाव बघून माणूस क्षणभर अस्वस्थ होऊन जातो. अशा प्रकारची आजची परिस्थिती निर्माण झालेली आहे.**

सोन्याच्या वाढत्या दरामुळे सर्व सामान्य लोक, गोर,गरीब,बळीराजा, विधवा भगिणी,दिव्यांग बांधव, कामगार या सर्वासाठी एक प्रकारची अडचण निर्माण झालेली आहे सोबत त्यांच्या मनात चिंता सुद्धा निर्माण झाली आहे असे, म्हणायला काहीच हरकत नाही. इथे खरा प्रश्न ह्या सर्व लोकांच्या विषयी आहे कारण, ह्या लोकांचे जीवन इतरांपेक्षा जरा वेगळ्या प्रकारचे आहेत काही लोकांचे जगणे तर एवढे अवघड आहेत व काहींच्या बाबतीत बघायला गेले तर..ते कसे जगतात कशाप्रकारे दिवस काढतात अनेक प्रश्न त्यांच्या बाबतीत पडताना दिसत असतात व जिवंत उदाहरणे आजही बघायला मिळत असतात. मग ते लोक खरंच सोने घेऊ शकतील का...? एकीकडे बघितले तर श्रीमंताच्या ही घरी मुली आहेत तसेच याच समाजात राहणाऱ्या गोर,गरीब लोकांच्या घरी सुध्दा मुली लग्नाच्या आहेत आणि ज्या,घरी मुलगी लग्नाची झाली असते तिच्या बापाला सर्वात आधी जास्त चिंता असते. आजही बरेच ठिकाणी वराकडून लग्नात सोन्याची मांग केली जाते पण,ज्या, वधू पित्याची जरी परिस्थितीच इतकी वाईट असेल तर. .त्याने कुठून सोने घेऊन द्यावे...? हा सर्वांत मोठा भारी प्रश्न आहे. प्रत्येक आई,वडिलांना वाटते की, लग्नाच्या वेळी मुलीला थोडेतरी सोने करावे व तिच्या अंगावर टाकावे पण,सोन्याच्या वाढत्या दरामुळे मुलीचे आईवडील चिंतीत असतात कारण जास्त नाही पण थोडसंही सोनं घ्यायला त्यांच्याकडे पैसे नसतात. ऐन अशाच वेळी काही ठिकाणी हुंड्यासाठी व सोन्यासाठी त्या मुलीचा छळ केला जातो आपल्या माहेराहून एवढे सोने व पैसे घेऊन ये तेव्हा, घरात तुला जागा मिळेल अशा प्रकारची विचारसरणी असलेल्या माणसांमुळे कित्येक मुलींचे संसार उदवस्थ झालेले आहेत सोबत सासरहुन होणारा भयंकर मानसिक त्रास सहन करावा लागत आहे या सर्व गोष्टींत त्या मुलीचा काय दोष...? तीला आपल्या बापाची परिस्थिती कशी आहे पूर्णपणे माहीत असते लग्न कशाप्रकारे पार पडले तेही तिला माहीत असते पण,ह्या सर्व गोष्टींविषयी जाणून न घेता उलट तिला त्रास दिल्या जाते आजही



काही ठिकाणी अशा घडणाऱ्या बऱ्याच घटना ऐकायला किंवा वाचायला सुद्धा मिळत असतात. सोन्याची वाढत असलेली लालच, व मोहामुळे तीला नाहकच छळ सहन करावा लागतो यामुळेच वधूपिता चिंताग्रस्त आहे त्यालाही कधी, कधी वाटतो की,आज जर..माझी परिस्थिती बरी राहीली असती तर..मुलीसाठी सोनं केलं असतं पण,हातात पैसे नसल्यामुळे तो,स्वतः किती दुःखात बुडालेला आहे याकडे मात्र कोणाचेही लक्ष जात नाही. आजकाल च्या या वाढत्या महागाईमुळे,व्यर्थ अपेक्षांमुळे आधीच त्याच्या पीकाला पाहिजे तो भाव न मिळाल्याने, हाताला काम न मिळाल्याने व घरात अठराविश्व दारिद्रय असल्याने तो, सोने घेऊ शकत नाही अशी असलेली भंयकर परिस्थिती ज्याचे त्यालाच माहीत असते असे अनेकदा, अनेकांच्या बाबतीत बघायला मिळत असते सोन्याच्या वाढत्या दरामुळे त्यांना चिंता तर..वाढली असते पण,पुढे मुलीच्या वैवाहिक जीवनात संकटे तर येणार नाहीत ना. ..? या,बाबतीत सुद्धा बाप विचार करत असतो. म्हणून सोन्याच्या मोहात पडण्यापेक्षा किंवा व्यर्थ लालच ठेवण्यापेक्षा ज्या मुलीला आपल्या मुलासाठी मागणी घातले त्याला जास्त महत्व द्यावे. सोने मागितल्याने किंवा हुंडा मागितल्याने जन्मभर पुरत नाही.

# गुणवत्तेऐवजी स्वत:मधील सिद्धता ओळखा

आधुनिक केसरी

**पालकांनो आपलं मूल म्हणजे मशिनरी नाहीये, त्याला लातूरला दोन वर्षे क्लासेसच्या माध्यमातून सर्विसिंग केली म्हणजे डॉक्टर इंजिनिअर होईल. पूर्वी शिकवणी शाळेत अभ्यासामध्ये गणितात किंवा इंग्रजी विषयात कच्चे असणारे किंवा ज्यांना एकदा शिकवलेले समजत नाही. अशा मुलांसाठी त्या-त्या विषयाची,अभ्यासाची उजळणी होण्यासाठी पालकांकडून मुलांना शिकवणी साठी पाठवले जायचे. आपला मुलगा शाळेत 'ढ' न राहता किमान परीक्षेत पास होण्यापुरती शिकवणी लावायची पद्धत होती. कारण काही वर्षांपूर्वी मुलांना शाळेत नापास करण्याची पद्धत होती.! आता बदलत्या शिक्षण व्यवस्थेमुळे मुलांना नापास करणे ही बंद झाल आहे. एकीकडे बारावी नंतर नीट,सीईटी,जेईई तयारीसाठी पालकांकडूनच ग्रामीण व शहरी कॉलेज कमालीची साशंकता आहे.**

सचिन कोरडे, धाराशिव

म्हणूनच पुढे इंजिनीअरिंग कॉलेजसाठी किंवा वैद्यकीय क्षेत्रात करिअरसाठी आठवीपासूनच मुलांना शहराच्या ठिकाणी शिकवण्यासाठी पाठविले आहे. ज्यांची आर्थिक परिस्थिती चांगली आणि एखादा दुसरा मुलगा अशी कुटुंबे तर लाखोच्या-लाखो रुपये वर्षाला खर्च करून मुलांना त्या जीवघेण्या स्पर्धेत ढकलू लागली. भरगच्च पगारदार, व्यावसायिक राजकारणी, सदन कुटुंब यामुळेच आपोआपच शिक्षण महाग झालं.

याचा फटका मात्र मध्यमवर्गीय कुटुंबाला चांगलाच बसला आहे. कारण ग्रामीण भागातील जेमतेम परिस्थिती असणाऱ्या कुटुंबाला ह्या महागड्या शिक्षणाचा कर्जाचा डोंगर डोईजड होत आहे. कारण सामान्य कुटुंबातील ज्यांची मुलं शाळेत शिक्षणात अव्वल असतात. मुलांचे शिक्षण खूपच जिकरीचे झाले आहे. कारण शेजारच्या नोकरदार कुटुंबाने आपला पाल्य शिक्षणात अव्वल नसताना शिक्षणासाठी व क्लासेसला शहरात ठेवला आहे. मग आपल तर मुल वर्गात अव्वल येतं,म्हणून मग आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी आपण कमी पडायचे नाही. असंच काहीसं ठरवून सामान्य वर्गातील कुटुंब महागड्या झालेल्या शिक्षण प्रणालीमध्ये गुरफटून जाऊ लागली आहेत. आता कॉलेजला करायची गरज नाही,फक्त प्रवेशासाठी कॉलेजचा वापर करा, असे सांगत क्लासेस वाल्यांकडून कोचिंग क्लासच्या स्वतःच्या नोट्स, सराव परीक्षा, त्यांचे वेगळे पैसे, उन्हाळी वर्ग, शॉर्ट टर्म कोर्सेस, विविध सुविधांनी सजवलेले महागडे होस्टेल,जेवणासाठी मेस, सुसज्ज असं वाचनालय अकरावीनंतर बारावीचे फक्त व्हेकेशन, सीईटी प्रवेश परीक्षा क्लास यातून विद्यार्थी बाहेर जाऊ न देता."विद्यार्थी म्हणजे एखादी मशनरी समजुन,"त्याला सकाळी सहा ते रात्री दहा सारे वर्ग चालू ठेवले जातात . स्वतःच्या अद्ययावत अभ्यासिका त्यांनी निर्माण केल्या. अशा शैक्षणिक सुविधा व शिक्षण करोडोंचे अनुदान घेणाऱ्या कॉलेजांना का जमू नये ? असाच काहीसा प्रश्न आर्थिक परिस्थिती जेमतेम असणाऱ्या व क्लासेसमध्ये मुलाला ठेवू न शकणाऱ्या पालकांना सतत भेडसावत आहे.





# अर्चना राजपूत यांनी मुख्याधिकारी बनून केले आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** नगरदेवळा येथील पाचोरा डेपोचे वाहक तथा संचालक संदीप राजपूत यांची मुलगी चाणक्य मंडलची विद्यार्थीनी अर्चना संदीप राजपूत राज्यसेवा २०२१ च्या परीक्षेत घवघवीत यश संपादन करून आपल्या आई वडील संदीप राजपूत यांचे मुख्याधिकारी ( CO )वर्ग -2 एमपीएससी परिक्षा उत्तीर्ण होऊन त्यांचे व नगरदेवळा गावाचे नाव स्वप्न पूर्ण करुन नाव उज्ज्वल केले.कु.आर्चना राजपूत हिचे शालेय शिक्षण येथील सरदार एस के पवार विद्यालय नगरदेवळा अर्चना राजपूत चे इयत्ता आठवी पासूनच मोठे अधिकारी होण्याचे स्वप्न होते.आणि त्या पद्धतीने आधीपासूनच स्पर्धा परिक्षेची वाटचाल सुरू केली कु.अर्चनाने शाळेतच अतिशय हुशार व वक्तव्य आणि वादविवाद स्पर्धा मध्ये राज्यपातळीवर सहभाग नोंदवून जिवनाचे स्वप्न पूर्ण केले.कु.अर्चनाचे पुढील शिक्षण महाविद्यालयीन शिक्षण प्रताप महाविद्यालय अमळनेर पूर्ण केले व नंतर चाणक्य मंडळ सेवा परिवारची विद्यार्थ्यांनी अर्चना संदिप राजपूत ही एम.पी. एस.सी.२०२१ च्या परीक्षेत घवघवीत यश मिळवित त्यांची मुख्याधिकारी वर्ग-२ पदी निवड झाली.या शुभ प्रसंगी पर्यटन मंत्री जयकुमार भाऊ रावळ यांनी अर्चना राजपूत मुख्याधिकारी यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला आणि पुढील वाटचालीच्या भरभरून शुभेच्छा दिल्या.त्यांच्या निवडीचे एस के पवार विद्यालय चेअरमन, सेक्रेटरी, संचालक मंडळ, ग्रामस्थांतर्फे कौतुक करुन अभिनंदनचा कु.अर्चना संदीप राजपूत वर वर्षाव होत आहे.

**मला अधिकारी व्हायचे होते :** मी जेव्हा परीक्षा पास झाले तेव्हा माझ्या घरचे आई व वडील मला म्हणाले "तू आम्हाला परत मिळालीस,गेली तीन चार वर्षे आम्ही तुला खूप मिस केलं .तू असून नसल्यासारखी होतीस . तु घरीच असायचीस मात्र तुझं लक्ष नेहमी दुसरीकडे असायचं "एमपीएससीची परीक्षा पास होऊन मुख्याधिकारी ( सिओ ) वर्ग या पदाचे शिक्षण घेऊन मी पास झाली मी मनापासून माझ्या आई,वडील आणि माझे गुरू यांचे आभार मानते .
**कु .अर्चना संदीप राजपूत, नगरदेवळा, ता . पाचोरा**

# पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त कार्यकारिणी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांच्या 298 व्या जयंतीनिमित्त 2023 कार्यकारिणी जय मल्हार मित्र मंडळ विजयनगर, मल्हार चौक पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या 298 व्या जयंतीनिमित्त 2023 कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.. कार्यकारणी अध्यक्ष प्रमोद खाडे, उपाध्यक्ष ईश्वर शिंदे, सचिव शिवाजी ढेपले( राज्य कार्यकारिणी संचालक महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटना ), सल्लागार भगवानराव शिंदे, कार्याध्यक्ष चंद्रकांत वडकते, कार्यवाहक सखाराम भोजने, बाळकृष्ण शेवंते यांची निवड समिती मार्फत करण्यात आली. तसेच सुरेश वैद्य, समीर चोरमले, कृष्णा शेळके, समीर चोरमले, निलेश माने ,परमेश्वर शिंदे, महेश भोजने यांची कार्यक्रम सदस्य म्हणून कार्यकारिणीत निवड झाली व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीची आढाव बैठक संपन्न झाली.



# साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज बाजार सावंगीचा 98.12 टक्के निकाल

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** फेब्रुवारी मार्च 2023 मध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षेमध्ये साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मधील कला शाखेतील दहा विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते त्यापैकी नव विद्यार्थी उत्तीर्ण झाले कला शाखेचा निकाल ९० टक्के लागला तर वाणिज्य शाखेला 11 विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी 11 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन वाणिज्य शाखेचा शंभर टक्के निकाल लागला. तर विज्ञान शाखेसाठी 245 विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झालेले होते, त्यापैकी 241 विद्यार्थी उत्तीर्ण होऊन 98.36% विज्ञान शाखेचा निकाल लागला. तर एकूण कॉलेजचा निकाल 98.12 टक्के लागला. विज्ञान शाखेतून माधवी नरोडे हिने 79 % टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक , प्रीती वहाटूळे हिने 78.33 % द्वितीय क्रमांक तसेच सानिया रावळे हिने 76.50 % गुण मिळवून तृतीय क्रमांक क्रमांक मिळाला. वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक तेजल दिनकर वाघ 81% , द्वितीय जयवीरसिंग राजपूत 76.33% , तृतीय क्रमांक प्रथम पखे 73.67 % याने मिळवला कला शाखा प्रथम अर्चना ईधाटे 68.33% द्वितीय क्रमांक रूपाली गांगोर्डे 65.33 % तृतीय क्रमांक प्रियांका कांबळे 64.17 % गुण मिळवले. उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे कॉलेजचे अध्यक्ष किशोर नलावडे प्राचार्य गोपाल अधाने उपप्राचार्य गिरधर जाधव शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# डॉ. सौ. इंदिराबाई पाठक महाविद्यालयाची बारावी निकालाची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फ नुकताच बारावीचा निकाल जाहीर झाला असून डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. सर्व गुणवतांचा सत्कार आज महाविद्यालयातील मल्टीपर्पज हॉलमध्ये प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई, पर्यवेक्षक डॉ प्रभाकर गायकवाड, प्रा. मंगल मोरे यांच्या हस्ते करण्यात आला. विज्ञान शाखेचा 92.59 टक्के, कला शाखा 72.58, वाणिज्य 77.19,एच एस व्ही सी 83.33 याप्रमाणे निकाल लागला आहे. कला शाखेतुन सर्वप्रथम गार्गी पदे, द्वितीय प्रतीक्षा लिम्बारे, तृतीय संज्ञा खळीकर विज्ञान शाखेतून सर्वप्रथम भंडारे अंकिता, द्वितीय-भालेराव यश, तृतीय पूजा बनसोडे, वाणिज्य शाखेतून सर्व प्रथम आर्या खुंटे, द्वितीय - अब्दुल अन्सारी अर्हम मोहम्मद, तृतीय स्वयंभू सिंघवी तर एच एस व्हि सी शाखेतुन प्रांजल शर्मा, द्वितीय - अनन्या बोर्ड, तृतीय -दिव्या वाघमारे तसेच अनेक विद्यार्थी 90 टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झाले आहेत. साक्षी जैस्वाल, सृष्टि घुम्बरे यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. तसेच सर्व गुणवंत विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केले. पालकांमधून शरद बनसोडे मनोगत व्यक्त केले तर शिक्षकांमधून प्रा.मंगल मोरे, प्रा. माधूरी भावसार. प्राचार्य डॉ. सुनिता बाजपाई यांनी अध्यक्षीय समारोप केला. मराठवाडा लिगल ऍण्ड जनरल एज्युकेशन सोसायटी च्या सचिव ऍड. डॉ.कल्पलता पाटिल भारस्ववाडकर, अध्यक्ष ऍड.जे. के. वासडीकर , ओ. एस. अर्चना कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभाकर गायकवाड, सूत्रसंचालन प्रा. प्राची कापसे तर आभार प्रदर्शन डॉ शोभा हनवते यांनी मानले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# भर उन्हाळ्यात ३० ते ४० फूट उंच कारंजे उडाले!

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जीवन प्राधिकरणच्या अमृत पाणीपुरवठा योजनेने शहराची चाळणी केली असून, नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. शुक्रवारी दुपारी सव्वातीन वाजताच्या सुमारास येथील दत्त चौकात जीवन प्राधिकरणची मुख्य पाईपलाईन फुटल्याने ३० ते ४० फूट उंच कारंजे उडाले. पाण्याच्या या फवाऱ्याने परिसरातील अनेक दुकानदारांचे मोठे नुकसान झाले. ही पाईपलाईन शहराला पाणीपुरवठा करणारी अमृत पाणीपुरवठा योजनेची नवीन पाईपलाईन आहे की जुनी, याबाबत अद्याप माहिती मिळाली नाही. मात्र १५ दिवसांपूर्वीच जीवन प्राधिकरणने या पाईपलाईनची डागडूजी केली होती. त्याच ठिकाणी पाईपलाईन फुटल्याने लाखो लिटर पाणी वाया गेले. सुदैवाने या घटनेत कोणाला दुखापत झाली नाही. मात्र पाण्याचे फवारे परिसरात उडाल्याने व्यावसायिकांचे नुकसान झाले. तीन महिन्यांपूर्वी शहरात माइंदे चौकात भूगर्भात पाईपलाईन फुटून स्फोट झाल्याने मोठा खड्डा पडला होता व एक तरुणी जखमी झाली होती. चर्चरोड परिसरात आणि पीकेव्ही मार्गावर पाईपलाईनसाठी खोदलेल्या खड्ड्यात पडून दोघांचा मृत्यू झाला होता. दोन दिवसांपूर्वीही वाघापूर-पिंपळगाव मार्गावर मजीप्राने खोदून ठेवलेल्या खड्ड्याचा अंदाज न आल्याने वाहनाचा अपघात झाला होता.





# राज ठाकरेंनी घेतला महापालिकेचा आढावा

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाच्या जिल्हा अध्यक्षांची बैठक शिवतीर्थ येथे आयोजित केली होती, छत्रपती संभाजीनगर महानगर पालिका निवडणूक,पक्षाची सद्या स्थिती ठाकेरेंनी जाणून घेतली. छत्रपती संभाजीनगरची महानगर पालिका पक्ष ताकदीने लढवणार असून त्याबाबतच्या सूचना ठाकरेंनी दिल्या आहेत. जून महिन्यात त्यांचा संभाजीनगर जिल्हा दौरा असून ह्या वेळी पक्ष पदाधिकारी बैठक- मेळावा,नागरिकांशी संवाद,पदाधिकाऱ्यांचा अहवाल तपासण्यात येणार आहे अश्या सर्वच कार्यक्रमांची आखणी करण्यात येणार आहे.

# धर्माबाद तालुक्यातील जलजीवन मिशन योजनेच्या चौकशीचे काय झाले?

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीला ७५ वर्ष झाली तरी अद्यापही ग्रामीण भागात अजूनही पाण्याची समस्या संपुष्टात आली नाही. त्यामुळे केंद्र शासनाने जलजीवन मिशन योजना हाती घेतली आहे. हर घर नल, हर घर जल ही घोषणा देत गावागावात विहीर खोदून,पाण्याच्या टाकी बांधून नळाद्वारे घरोघरी पाणी पोहचवीण्याचे उद्दिष्टे ठेवले आहे. या योजने अंतर्गत धर्माबाद तालुक्यातील पन्नास गावामध्ये २४ कोटी २६ लक्ष रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. अनेक गावात नळजोडणीच्या नावाखाली पक्के रस्ते तोडण्यात आले आहेत.खड्डे खोदण्यात आले मात्र पावसाळा तोंडावर येऊनही काम अपूर्ण राहिल्यामुळे आणि निकृष्ट कामामुळे ह्या योजनेचा बोजवरा उडत असल्याचे चित्र आहे.



राज्यातील जनतेचे पाण्यावाचून हाल होऊ नयेत, त्यांना बारा महिने शुद्ध पाणी मिळावे. त्यासाठी एका गावाला एक ते सव्वा कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यात आला आहे. नायगाव मतदार संघाचे आमदार राजेश पवार यांनीही धर्माबाद तालुक्यासाठी २४ कोटी २६ लक्ष रुपयांचा निधी मिळाल्याचे राणाभीम थाटात घोषणा केली होती.

मात्र या कामाची निविदा, कामाचा दर्जा,संथ गतीने होणारे काम,खोदलेले खड्डे, फोडलेले पक्के रस्ते यामुळे पावसाळ्यात त्रास होण्याची शक्यता गृहीत धरून अनेक गावातून या कामाची चौकशी व्हावी यासाठी अनेकांनी तक्रारी केल्या आहेत.एवढेच नाही तर एकेवेळी आमदारांनी ही या कामात गैरव्यवहार झाल्यास, किंवा निकृष्ट कामे झाल्यास त्यांची चौकशी करण्याचा इशारा दिला होता.मात्र ह्या चौकशीचे काय झाले या विषयी चर्चा रंगत आहेत. मात्र वस्तुस्थिती ही आहे की ह्या योजने अंतर्गत होणारी कामे निकृष्ट दर्जाची होत आहेत.व कामाना विलंब होत आहे. या कामाची चौकशी होणार का? या योजनेत गैरव्यवहार करणाऱ्यावर कारवाई होणार का? हे बघावे लागेल.

धर्माबाद तालुक्यात जल जीवन मिशन योजने अंतर्गत अनेक गावात कामे चालू आहेत . मात्र या कामांचा दर्जा बेसुमार असून ही योजना कंत्राटदारांसाठी कुरण ठरत आहे .योजना चांगली असली तरी भ्रष्ट लोकांमुळे ती फसण्याची शक्यता आहे . प्रशासनाने या भ्रष्ट लोकांना पाठीशी घालू नये अन्यथा आम्ही लोक घेऊन रस्त्यावर उतरू .
**गणेश गिरी**
**उप जिल्हाप्रमुख, शिवसेना ( ठाकरे गट )**

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

आधुनिक केसरी न्यूज

हवाई सफर मधून होणार आता जेजुरीचे जयाद्री दर्शन, भूमिपुत्र काकडे यांची गगनभरारी भारतीय लोकदैवत असलेल्या जयाद्री डोंगर माथ्यावरील इतिहास प्रसिद्ध अशा जयाद्री डोंगर रांगतील पर्यटन दृष्ट्या महत्वाच्या ठरलेल्या जेजुरी परिसरातील स्थळ्यांचे आता पर्यटक भाविकांना आकाशतूनही अगदी सहज सुरक्षितपणे दर्शन घेता यावे म्हणून पुरंदरचे भूमिपुत्र असलेले कर्नल प्रशांत काकडे आणि चैतन्य ढोमसे यांनी फ्लयिंग रहिनो मोटोरिंग या अनोख्या प्रोजक्ट द्वारे नव्या उद्योग क्षेत्रात उतरले असून स्पेन मधून आयात केलेल्या अत्याधुनिक अशा पॅरा मोटरिंग उपकरना द्वारे हवाई फेरी चा आनंद सर्वसामान्य ते भविक पर्यटकांना घेता यावा म्हणून हा प्रकल्प सूरू केला असून या हवाई सफरचा आनंद अबाल वृद्ध ते युवा बाल वर्गही घेताना दिसून येत आहें या करिता अनुभवी अशा आर्मी कमांडो याचे तंत्र कोशल्य वापरण्यात येत आहें आकाशातून दिसणारे बाराव्या शतकातील उत्तम स्थापतंय बांधकामतील अस्टकोणी गड दर्शनाचे विहंगम दर्शन घेता येते या बाबतच्या सर्व अधिकृत परवाने दिल्ली येथून घेण्यात आल्याचे प्रशांत काकडे यांनी सांगितले.







# जादादराने रासायनिक खते, बी-बियाणे विकाल तर थेट होणार गुन्हा दाखल

## कृषी अधिकारी एस. जी. वाघ यांचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील व सोयगाव तालुक्यात यंदा  खरीप हंगामात शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाची व जास्त दराने खते विक्री करणाऱ्या दुकानदारांवर करडी नजर ठेवण्यासाठी सोयगाव कृषी विभागाने भरारी पथके तयार केली आहेत. सोयगाव तालुक्यातील बियाणे व खत विक्रेत्यांवर अचानक घाड टाकून, शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांना चाप लावला जाणार असल्याची माहिती तालुका कृषी अधिकारी एस जी वाघ व मंडळ अधिकारी आर.जी.गुंडिले यांनी दिली.शेतकऱ्यांमधून खरिपातील पेरणीपूर्व कामे उरकण्याची लगबग सुरू आहे. उन्हाळ्यातील शेतीची मशागतीची कामे केल्यानंतर णात फसवणूक होते अशा प्रकारास पायबंद घालण्याबरोबर तसेच पावसाळ्यातील चांगल्या पावसानंतर जमिनीत खरिपातील पिकाची पेरणी केली जाते. तालुक्यात सुमारे ६० हजार हेक्टर क्षेत्रावर खरिपातील पिकांची लागवड होते. यामध्ये कापूस नका ज्वारी बाजरी मूग उडीद तूर भुईमूग सोयाबीन मिरची अद्रक यांसारख्या पिकांना सोयगाव तालुक्यातील व सावळदबारा परिसरातील शेतकरी प्राधान्य देतात. पेरणी केलेल्या पिकांना आवश्यक असणाऱ्या निविष्ठा खरेदी करण्यासाठी शेतकऱ्याची विक्रेत्या दुकानांकडे धावपळ सुरू होते. शेतकऱ्यांची खतांची गरज लक्षात घेऊन, अनेकदा खत विक्रेत्यांकडून निकृष्ट दजचि अथवा जास्त दराने खतांची विक्री आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक लुटीचा सामना करावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्याची मोठ्या प्रम शेतकऱ्याची आर्थिक लुट थांबविण्याच्या हेतूने सोयगाव तालुकास्तरावर भरारी पथके स्थापन करण्यात आली आहे.





सोयगाव कृषी विभागाच्या माध्यमातून भरारी पथके तैनात करण्यात आली असून सोयगाव तालुक्यात कृषी सेवा केंद्र चालकांवर अंकुश ठेवण्यासाठी सातत्याने दुकाने तपासणी केली जाणार आहे .यात दोषी आढळल्यास कृषी सेवा केंद्र चालकांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे .त्यामुळे सर्व सोयगाव तालुक्यातील कृषी सेवा केंद्र चालकांनी आपापली कागदपत्रे अद्द्यावत करून नियमानुसार १ जून नंतर बियाणे विक्री करावे . **एस .जी .वाघ , तालुका कृषी अधिकारी सोयगाव**

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# कमलेश्वरी मंदिरातील दागिने, रोख पळविली

आधुनिक केसरी न्यूज

**वाशीम :** मालेगाव तालुक्यातील किन्हीराजा येथील माता कमलेश्वरी मंदिराचे कुलूप तोडून चोरट्यांनी मूर्तीवरील ५० हजार रुपये किंमतीचे दागिणे व दानपेटीतील रोख रक्कम, असा अंदाजे १ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात अवैध व्यवसाय फोफावले आहेत. चोऱ्या व दिवसाढवळ्या हत्येच्या घटना घडत आहेत. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था ढासळत चालली असून आता चोरट्यांना देवाचीही भीती उरली नसल्याचे दिसून येत आहे.
माता कमलेश्वरी मंदिरात चोरी झाल्याचे शनिवारी सकाळी पुजारी व विश्वस्त दर्शनासाठी मंदिरात गेले असता उघडकीस आले. संस्थानचे अध्यक्ष उद्धव पाटील गोडे यांनी याबाबतची माहिती पोलीसांना दीली. किन्हीराजा येथे यापूर्वीदेखील चोरीच्या घटना घडल्या होत्या. त्याचा अद्यापही उलगडा झालेला नाही. त्यातच मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्यांना शोधण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे. दरम्यान, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा लवकरात लवकर शोध घेऊ, असे ठाणेदार राठोड यांनी सांगितले.



# शेतकऱ्यांनो निसर्गाला घाबरू नका : पंजाबराव डख

आधुनिक केसरी न्यूज

**सागर शेरे**

**उमरखेड :** शेतकऱ्यांनो निसर्गाला घाबरू नका निसर्गाच्या हालचालींची वेळोवेळी माहिती देऊन मी तुम्हाला सतर्क करेन , असे प्रतिपादन प्रसिद्ध हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी केले .

उमरखेड येथील स्थानिक गो सी गावंडे महाविद्यालयात दि . 26 मे रोजी दैनिक वृत्तपत्र वार्ताहर संघाच्या वतिने संपन्न झालेल्या शेतकरी मार्गदर्शन व चर्चासत्र या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन करतांना ते बोलत होते . या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी यवतमाळ जिल्हा अखिल कुणबी समाजाचे अध्यक्ष राम देवसरकर होते तर स्वच्छता दूत माधवराव शेळगावकर यांचेसह आमदार नामदेवराव ससाने स्वागताध्यक्ष साहेबराव कांबळे, माजी आमदार राजेंद्र नजरधने, विजयराव खडसे, काँग्रेस कमिटीचे प्रदेश सरचिटणीस तातू जी देशमुख, भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन भुतडा, काँग्रेस शहराध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, डॉक्टर अंकुश देवसरकर, एकनाथ पाटील जाधव, प्रा पाटील नांदेड कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती बाळासाहेब चंद्रे पाटील खवी संघ अध्यक्ष विजय नरवाडे तहसीलदार आनंद देऊळगावकर ठाणेदार अमोल माळवे महिला शेतकरी लक्ष्मीबाई पारवेकर अविनाश खंदारे सह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते पुढे म्हणाले की ,येत्या 10 दिवसात शेती मशागतीची कामे आटोपून घ्या , 8 जून रोजी मान्सुनचे जोरदार आगमन होणार आहे . भविष्यात यवतमाळ जिल्ह्यात दुष्काळ पडणार नाही असा विश्वास त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिला . भविष्यात शेताच्या बाजूला चर खोदून पिकांचे संरक्षण करण्याची पाळी येईल . शाळेत 8 वी मध्ये शिकत असतांना मी हवामान अंदाज वर्तविण्यास सुरुवात केली असे सांगून जि . प शाळेत अंशकालीन कर्मचारी होतो परतू अल्पशः पगारामुळे ती नोकरी सोडली व घरची 10 एकर शेती करण्यास




सुरुवात केली त्यातील उत्पन्नाने मी समाधानी असल्याचे डख यांनी म्हटले आहे . भारत हा कृषी प्रधान देश आहे कोरोना काळात सर्व कंपन्या बंद पडल्या परंतु अन्न बनविणारी शेतकऱ्यांची शेती कंपनी सुरुच होती. वृक्षतोडीमुळे जंगले नष्ट होत चालल्याने निसर्ग रुसलेला आहे. त्यामुळे प्रत्येकाने झाडे लावणे गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी आवाहन केले. महाराष्ट्रातील जनतेला हवामान अंदाज सांगणे सोयीस्कर व्हावे यासाठी 250 व्हॉट्स ॲप गृप तयार करून शेतकऱ्यांना वेळोवेळी माहिती पुरविण्याचे काम सातत्याने सुरु असल्याचे त्यांनी सांगीतले. त्यासह मुंबईच्या दिशेने आलेला पाऊस हा आपल्या भागात अल्प प्रमाणात पडतो तर पुर्वेकडुन आलेला पाऊस हा समाधानकारक पडतो, पावसाने दिशा बदलल्यामुळे यंदा समाधानकारक पावसाचे भाकित त्यांनी वर्तविले. पावसाच्या आगमनाची चाहुल लागण्याची लक्षणे त्यांनी यावेळी सांगीतली त्यात विमानाचा आवाज, उभे वारे वाहु लागणे, चिमण्या धुळीत घोळणे, चिंचेचा बहार, आंब्यांचा बहार, बिब्याच्या झाडांचा बहार, कडूलिंबांच्या लिंबोळीचा बहार' जांभळीचा बहार, सुर्य उगवतानाची अवस्था, सुर्य मावळतांनाची अवस्था , ऑगस्ट महिन्यातील लाकडी दरवाजाचा आवाज अशी लक्षणे सोप्या भाषेत शेतकऱ्यांना त्यांनी समजाऊन सांगितली. तर गारपिट व विजेपासून संरक्षण कसे करावे ही महत्वपूर्ण माहिती त्यांनी उपस्थित हजारो शेतकऱ्यांपुढे विषद केली. यावेळी शेतकरी नेते माधवराव पाटील शेळगावकर, आमदार नामदेव ससाणे, कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष साहेबराव कांबळे यांनी अभ्यास पूर्ण मार्गदर्शन केले. प्रास्तविक साहेबराव धात्रक यांनी केले तर सुत्रसंचलन बाळासाहेब ओझलवार यांनी तर आभार लक्ष्मीकांत नंदनवार यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे अध्यक्ष निळकंठ धोबे, कार्याध्यक्ष वसंत देशमुख, उपाध्यक्ष अंकुश पानपट्टे, प्रसिद्धीप्रमुख शैलेश ताजवे, कोषाध्यक्ष अजय कानडे, प्रशांत भागवत, अझर उल्लाखान, अविनाश मुन्नरवार, डॉ . विशाल माने डॉ . शिवचरण हिंगमिरे व्यंकटेश पेन्शनवार, रवि भोयर, सागर शेरे, संजय देशमुख, प्रा.डॉ. प्रदीप इंगोले गजानन भारती 'ताहेर मिर्झा' अरुण बेले आदिंनी अथक परिश्रम घेतले.

# छोरीया महाविद्यालयाची निकालाची परंपरा कायम

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जा :** नुकताच ऑनलाईन जाहीर करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता बारावीच्या मंडळ परीक्षेमध्ये स्थानिक केला आणि छोरीया सहकार विद्या मंदिर व कला, वाणिज्य, आणि विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन करून उत्कृष्ट निकालाची परंपरा याही वर्षी कायम राखली आहे.

यामध्ये इंग्रजी वाणिज्य शाखे चा निकाल शंभर टक्के लागला असून विज्ञान शाखेचा निकाल ९४.११ तर कला शाखेचा निकाल 77.50 आणि वाणिज्य मराठी शाखेचा निकाल हा 96.42 एवढा लागला आहे. यामध्ये इंग्रजी वाणिज्य शाखेचे कु. माधुरी गणेश खंडेराव 91.33, कु. भक्ती शिवहरी पाटील 91.17, प्रगुन ईश्वर गुप्ता 90.83 तसेच कु. ममता गोपाल गुजर ९०.६७ हे विद्यार्थी अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय व चतुर्थ क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. त्याचप्रमाणे विज्ञान शाखेमधून अनुक्रमे अभिषेक दत्तू ताडे 66.33, वैष्णवी सुभाष इंगळे 65.50 कनिष्ठ महाविद्यालयामधून प्रथम व द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. याचसोबत कला शाखेतून अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणारे विद्यार्थी कपिल झग्ड्या सस्त्या 72 टक्के, रोशन भाऊराव धुंदाले ळे 65.17 आणि विलास जयराम जमरा 62.83 याप्रमाणे उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य मराठी माध्यम शाखेमधून कुमारी मोनिका हरिदास चंदनकर या विद्यार्थिनीने सर्वाधिक 92.67 टक्के गुण घेऊन प्रथम तर द्वितीय शितल गणेश राऊत 86 टक्के आणि तृतीय ऐश्वर्या शेषराव घुले 85.17 याप्रमाणे कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ. किशोर केला शाळेच्या मुख्य संयोजिका डॉ. स्वाती केला, प्राचार्य विनायकराव उमाळे ,प्रा. विनोद ईश्वरे,राजेश राठी, गजानन खरात व सर्वांनी मनापासून अभिनंदन केले आहे.




# नांदेड बसस्थानकात ३० जणांना दिले बुस्टर डोस

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** आरोग्य विभाग नांदेड व मराठवाडा ग्रामिण विकास संस्थेच्या वतीने नांदेड बसस्थानता ६० वर्षावरील नागरीकासाठी बुस्टर डोस देन्यासाठी दिनांक २६ मे रोजी लसीकरण शिबीराचे आयोजन करन्यात आले होते. यामध्ये ३० जणांचे लसीकरण करन्यात आले. नांदेड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.निळकंठ भोसीकर यांच्या मार्गदर्शनात ६० वर्षावरील नागरीकासाठी बुस्टर डोस देन्यासाठी नांदेड बसस्थानकात USAID,M-RITE Project, आरोग्य विभाग नांदेड व मराठवाडा ग्रामिण विकास संस्थेच्या वतीने शिबीराचे आयोजित करन्यात आले होते . या लसिकरनाची जनजामृती करन्यासाठी शिवकन्या कैलवाड ने बसस्थानकातीन ध्वनीक्षेपकाव्दारे बसस्थानकातील प्रवांशांना या लसिकरनाचे काय फायदे आहेत व बुस्टर डोस का घ्यावा याची माहिती देवुन प्रवासांना बुस्टर डोस घेन्याची विंनती केली तर संगीता भालेरावने जेष्ठ नागरीका सोबत बैठक घेऊन त्यांच्या मनातील शंका कुशंका दुर केल्या यामुळे मोठया प्रमाणास नागरीकांनी प्रतिसाद देत बुस्टर डोस घेतला. सदरील लसिकरण शिबीर यशस्वी करन्यासाठी चंद्रभागा शिंदे, शिवकन्या कैलवाड, संगीता भालेराव, जिल्हा बाहय संपर्क अधिकारी हनुमत पाटील,जिल्हा रुग्णालयाच्या सिस्टर जयश्री वाघ , बसस्थानक प्रमुख यासिन खान हमीद खान यांच्या सहकार्यामधून व कर्मचारी यांनी लसीकरण पूर्ण केले.

# राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नांदेडचे जिल्हाध्यक्ष बदलून लोहा तालुकाध्यक्षपदी करण्यात आलेली निवड तत्काळ रद्द करावी

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे माजी पं. स. सदस्य चांदणे यांनी केली मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष हे कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता मनमानीपणे नवख्या व अनधिकृत व्यावसायिकास पार्टीच्या तालुका प्रमुख पदी नियुक्ती दिली आहे. त्यामुळे राष्ट्रवादी पक्षाचे नाव खराब होत असून पक्ष वाढ व बळकटीस बाधा पोहचत आहे. नांदेड जिल्ह्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष यांना तत्काळ बदलण्यात यावे आणि पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदी करण्यात आलेली निवड तत्काळ रद्द करावी अशी मागणी माजी पंचायत समिती सदस्य माधव चांदणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पुढे निवेदनात चांदणे यांनी असेही नमुद केले आहे की, लोहा तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे हंगामी अध्यक्ष हे मटका चालक व अवैध धंदे चालवित असुन त्यांचे अध्यक्ष पद तात्काळ रद्द करण्यात यावे. पक्षाचे जिल्हाध्यक्ष यांनी लोहा तालुक्यातील कार्यकर्त्यांना विचारात न घेता पक्षाच्या तालुकाध्यक्ष पदाची निवड केल्यामुळे कार्यकर्त्यामध्ये प्रचंड नाराजी असुन सदरील निवड तात्काळ रद्द करून कार्यकर्त्यांना न्याय द्यावा. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा स्वाभीमानी पक्ष आहे. जिल्ह्याचे अध्यक्ष हे कार्यक्षम नसुन ते सतत आजारी असल्याने ते कार्यकर्त्यांना वेळ देत नसल्याने पक्ष वाढ वाढत नाही. जिल्हाध्यक्ष गतिमान असला पाहिजे असा त्यासाठी तात्काळ कर्तव्यतत्पर जिल्हाध्यक्ष निवड करावा. तसेच जिल्हाध्यक्ष आजारी असल्यामुळे त्यांच्या अध्यक्ष पदाचा पुर्ण कारभार त्यांचा मुलगा पाहत असून कार्यकर्त्यामध्ये प्रचंड नाराजी आहे. विशेष म्हणजे माजी आ. शंकर अण्णा धोंडगे व त्यांचे समर्थक कार्यकर्ते यांनी बीआरएस पक्षाची वाट धरली याची पुर्व कल्पना जिल्हाध्यक्ष भोसीकर यांना होती. तसे त्यांनी वरिष्ठांना कोणीतीही माहिती दिली नाही. कारण सदरील जुनी राष्ट्रवादी ची मंडळी निघुन गेल्यास आपल्याला पक्षांतर्गत जिल्ह्यात संधी मिळेल. याच कारणामुळे कंधार लोहा तालुक्यात पक्षाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्हाध्यक्ष तात्काळ बदलण्यात यावा. तसेच लोहा तालुकाध्यक्ष पदाची निवड तत्काळ रद्द करावी. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते माजी पं. स. सदस्य माधव चांदणे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनावर चांदणे यांची स्वाक्षरी आहे.

# कोथिंबीरीची सोप्पी वडी

आधुनिक केसरी



लय भारी
सुगरण
सौ. स्नेहा मुसरीफ , पुणे.
संपर्क क्र. 9503434424

**साहित्य :**
1 कोथिंबीरीची मध्यम जुडी, 1 वाटी बेसन ,पाव वाटी तांदुळाचे पीठ, 2 चमचे रवा , पाव वाटी तीळ, हिंग , हळद , तिखट , मीठ, 1 चमचा ओवा, तेल, 1 चमचा जिरे , 1 चमचा मोहरी. **कृती :** प्रथम कोथिंबीर निवडून, स्वच्छ धुवून चिरुन 2 वाट्या घ्यावी. मोठ्या बाऊल मध्ये बेसन, तांदुळाचे पीठ, शक्यतो बारीक रवा, ओवा 1चमचा हळद, तिखट व मीठ प्रत्येकाच्या आवडी प्रमाणे घालून 1 वाटी पाणी घालून सर्व छान एकत्र होईपर्यंत फेतून घ्यावे. मग कढईत 3..4 चमचे तेल गरम करून मोहरी, जिरे, हिंग घालून मस्त फोडणी करून त्यात कोथिंबीर घालून थोडी परतून घ्यावी .मग त्यात तयार केलेले मिश्रण घालून घट्ट गोळा होईपर्यंत छान परतावे . एका ताटाला तेल लावून त्यावर थोडे तीळ पसरून वडीचा गोळा त्यावर घालून हाताला प्लास्टिक लावून हलकेंच पसरावा पसरताना थोडे थोडे तीळ घालत माध्यम जाड पसरावा . थंड झाला की चौकोनी आकाराच्या वड्या कापून तेलात गुलाबी रंगावर खुसखुशीत तळून सर्व्ह कराव्यात . **वैशिष्ट्य :** ह्या वडीला घट्ट भिजवून गोळा बनवून तो वाफवून कट करून तळायची अशी किचकट प्रोसेस नाही .आणि जास्त भांडे ही लागत नाहीत त्यामुळे पसारा ,खराब भांडी धुण्याचा वेळ आणि श्रम सुद्धा वाचतात.



# रौप्य महोत्सवी रक्तदान करुन, केला निश्चय नि:स्वार्थी भावनेनं 'रक्तदान' करण्याचा

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** माझा रक्तगट AB - शुक्रवारी दि. २६ मे रोजी मला छत्रपती संभाजीनगर तेथील स्व. दत्ताजी भाले रक्तपेढीमधुन दुपारी ०२.३६ वाजता इमर्जन्सी फोन आला, सिडको येथील एम. जी. एम. हॉस्पिटलमध्ये ऍडमिट असलेल्या कु. प्रज्वल दिपक मते या एक वर्षीय लहान बालकाला थॅलेसीमिया हा आजार असल्यामुळे त्याला सर्जरीसाठी तात्काळ AB- रक्त हवे होते. मी क्षनाचाही विचार न करता CSMSS प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुखसर यांना भेटून लगेच तात्काळ २० मिनिटांत स्व. दत्ताजी भाले रक्तपेढीला पोहचलो आणि २५ व्या वेळी तात्काळ रक्तदान केले....

प्रज्वलच्या पालकांच्या चेहऱ्यावरील स्मितहास्य मनाला तर सुखावून गेलचं पण आपण समाजातील गरजू व्यक्तींना कामाला आलो, याचा मनस्वी खूप आनंद झाला. मित्रहो, रक्तदान हे आपलं सामाजिक कर्तव्य आहे. रक्तदान हे निःस्वार्थ भावनेनं केलं पाहिजे. कारण आपण केलेल्या एका रक्तदानातून कुणाला तरी जीवनदान मिळणार आहे. एक रक्तदाता म्हणून मला सांगायला आवडेल, की रक्तदानासंबंधी जी काही जणांच्या मनात भीती असते. ते तुम्ही प्रत्यक्ष रक्तदान केल्यावरच जाऊ शकते. रक्तदानासारखं कोणतंही 'श्रेष्ठ दान' नाही. त्याचा आनंद प्रत्येकानं घ्यायला हवा. थॅलेसेमिया' या आजाराने ग्रस्त असणाऱ्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस झपाट्यानं वाढत असून या रुग्णांमध्ये लहान बालकांचे प्रमाण जास्त आहे. सध्या संपूर्ण देशात असे किमान पाच कोटी 'थॅलेसेमिया' वाहक आढळल्याचा दावा वैद्यकीय क्षेत्रातील जाणकारांनी केला आहे. त्यामुळे तरुणांनी लग्न करण्यापूर्वी अथवा पालकांनी मूल होण्यापूर्वी ते 'थॅलेसेमिया' वाहक आहेत की नाहीत. हे तपासून घेणे आवश्यक ठरते. 'थॅलेसेमिया' हा अनुवांशिक प्रकारातील आजार आहे. माता-पिता यांच्यामधील एका व्यक्तीला जर 'थॅलेसेमिया' असेल तर बाळाला 'थॅलेसेमिया' होण्याचे शक्यता २५ टक्के असते. दोघांना 'थॅलेसेमिया' असेल तर हे प्रमाण ५० टक्के एवढे असते.



# आ. प्रदीप जैस्वाल यांच्या हस्ते सिमेंट कॉँक्रीट रोडचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** स्मार्ट सिटी अंतर्गत माननीय आमदार प्रदीपजी जैस्वाल साहेब यांच्या विशेष प्रयत्नातून तसेच हडको व्यापारी संघटना आणि सर्व नागरिकांच्या मागणीनुसार 1 ) पार्श्वनाथ चौक ( अर्बन बाजार मेडिकल ) ते मृत्युंजय चौक 2 ) महानगरपालिका शाळा ते प्रजापती ब्रम्हाकुमारी ॐ शांति केंद्र ते पुष्कर टी हाउस 3 ) बळीराम पाटील विद्यालय ते मनपा शाळा या नवीन सिमेंट कॉँक्रीट रोडचे भूमिपूजन दिनांक 25 मे गुरुवार रोजी दुपारी 12 वाजता आमदार प्रदीपजी जैस्वाल यांच्या शुभहस्ते करण्यात आले. एक महिन्यापूर्वीच हडको व्यापारी संघनटने तर्फे आमदार प्रदीप जयस्वाल यांना निवेदन देण्यात आले होते. यातील संभाजी पुतळ्या जवळील जिजाऊ चौक ते जैस्वाल हॉल या रस्त्यावरील डिव्हायडरचे काम सुरू करण्यात आले आहे,फक्त यातील सुलभ शौचालयाचे काम अजून बाकी आहे . आज सिमेंट रोडच्या कामाचे उद्घाटन आमदार जयस्वाल यांनी केल्यामुळे नागरिकात समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे, आज या उद्घाटन प्रसंगी नितीन चित्ते, ॲड. माधुरी अदवंत,अनंत बोरकर, अंबादास सोनवणे, डॉ. शैलेश चांदीवाल, ॲड. सतीश पाटील, श्रीचंद जाधव, रवी राजपूत, जीवकपाल हिवराळे, विकास पाटील, राहुल पाटनी आदी नागरिक उपस्थित होते.



# ज्ञानपोई कवितासंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण साहित्यिक तथा कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या ज्ञानपोई या बालकविता संग्रहाच्या दुसऱ्या आवृतीचे प्रकाशन नुकतेच बिडकीन येथे जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक रंगनाथ अप्पा हिवाळे आणि राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्ष तमीजोद्दीन इनामदार यांच्या हस्ते थाटात करण्यात आले. यावेळी तमीजोद्दीन इनामदार यांनी कवितासंग्रहावर भाष्य करतांना सांगितले की, हल्ली दर्जेदार व आशयघन बाल साहित्य लेखन हे दुर्मिळ झाले आहे. परंतु कवी अय्युब पठाण लोहगांवकर यांच्या ज्ञानपोई कविता संग्रहातील बालकविता ह्या बालकांच्या आणि वाचकांच्या मनाला भिडणाऱ्या आहेत. या प्रकाशन सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नवाब - महंमद टाकळीकर हे होते. तसेच शेख इलियास, प्रतिनिधी फेरोज मिर्झा, राजू शेख, मधूकर शिंदे, जफरखान टेलर आदी उपस्थितीत होते.




नक्षत्रवाडी येथील गट क्र. 8/1, समर्थ एलक्लेव्हमध्ये पहिल्या मजल्यावरील 2 बीएचके फ्लॅट अर्जंट विकणे आहे. एकूण क्षेत्रफळ 910 स्क्वेअर फूट, क्लिअर टायटल, सीएसएमएसएस कॉलेजपासून पाच ते सात मिनिटांच्या अंतरावर, रम्य वातावरणात, मेन रोडच्या अगदी जवळ,
संपर्क : मो. 7588818406

# जवळे गावासाठी ४ कोटी ९२ लाखांची योजना मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** जलजीवन मिशन योजनेअंतर्गत सांगोला तालुक्यातील जवळा नळ पाणी पुरवठा योजनेस मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,पुणे प्रादेशिक विभाग पुणे, यांचेकडून ४.९२ कोटी च्या कामास तत्वता मंजूरी मिळालेली आहे. आज सकाळी मुख्य अभियंता यांनी सादरीकरणाचे अवलोकन करून या योजनेस तात्काळ मंजूरी दिली आहे.

जलजीवन मिशन योजनेअंतर्गत जवळा नळ पाणीपुरवठा योजना मंजूरीकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रापापु उपविभाग सांगोला चे उपअभियंता सुरेश कमळे, व प्रभारी कार्यकारी अभियंता सुनील कटकधोंड यांनी विशेष परिश्रम घेतले. आमदार शहाजीबापू पाटील व माजी आमदार दीपकआबा साळुंखेपाटील यांनी दिलीप स्वामी, सुरेश कमळे व सुनील कटकधोंड यांचे विशेष कौतुक केले आहे.

या जलजीवन मिशन योजनेचा फायदा जवळे गाव, धुमाळवाडी ,बर्वे वस्ती, अंबिका नगर, मेटकरी वस्ती यासह इतर पाच वस्त्यांना या योजनेचा फायदा होणार आहे सदरच्या योजनेस तत्वतः मंजुरी मिळाल्यामुळे जवळा गावासह इतर वाडी वस्तीवरील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीस वर्षा पर्यंत मिटणार आहे, त्यामुळे लोकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झालेले आहे.

# गौतमी पाटील यांना सतर्कतेचा इशारा : दराडे

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** आपल्या नृत्याप्रमाणेच त्यातून उद्भवणाऱ्या वादांसाठी गौतमी पाटील गेल्या काही महिन्यांपासून प्रसिद्धीच्या झोतात आलेली गौतमी पाटील हिला आता छोटा पुढारी म्हणून प्रसिद्ध झालेल्या घनश्याम दरोडेने जाहीर इशारा दिला आहे. गौतमी पाटीलच्या नृत्यावर अश्लीलतेचा आक्षेप घेणाऱ्यांकडून 'महाराष्ट्राचा बिहार होत आहे', अशी भूमिका मांडली जात आहे. या पार्श्वभूमीवर घनश्याम दरोडेनेही तशीच भूमिका मांडली होती. आता तर घनश्यामने गौतमी पाटीलला थेट सतर्कतेचा इशारा दिला आहे. तसेच, अश्लील हावभाव करून मोठे होऊ नका, असा सल्लाही घनश्यामने दिला आहे.

घनश्याम दरोडे लहानपणापासूनच त्याच्या बोलण्याच्या लकबीमुळे प्रचंड चर्चेत आला होता. राजकीय वर्तुळातूनही त्याच्या या बोलण्याच्या स्टाईलचे कौतुक करण्यात आले होते. आता घनश्याम दरोडेनं मुसंडीच्या निमित्तानं अभिनय क्षेत्रातही पदार्पण केले. मुलाखतीत गौतमी पाटील वादावर आपल्या हटके स्टाईलमध्ये भूमिका मांडली आहे. गौतमीताई महाराष्ट्राचा बिहार करतायत. आज गौतमी पाटील स्टार आहेत. पण हे वातावरण किती काळ चालेल ? गौतमीताई जेव्हा डाऊन होतील, तेव्हा हे वातावरण बिघडवून डाऊन होतील. गौतमीताईंना मी एक सांगेन, तुम्ही हे चुकीचं करताय. गौतमीताईंनी खूप स्ट्रगल केलाय. मला मान्य आहे. पण गौतमीताईंचा एक तरी कार्यक्रम सुखरुप झालाय का ? कुठे दंगल झाली, कुठे दंगा झाला. गौतमीताई स्टेजवर गेल्या आणि सुखरुपपणे बाहेर आल्यात असे कधी झाले का ?" असा प्रश्न घनश्याम दरोडेने उपस्थित केला.

**गौतमी पाटील यांनी त्यांच्या अदा बदलाव्यात :** "पूर्वीच्या कलाकारांचा गौतमी ताईंनी इतिहास पाहावा . सुरेखाताई पुणेकर, मंगलाताई बनसोडे यांची उदाहरणे आहेत . तमाशा ही शेतकऱ्यांसाठी करमणूक आहे . पण गौतमीताईंनी त्याचा अभ्यास केला नाही . त्यांनी कला सादर करावी, नृत्य करावे . पण गौतमी पाटील यांनी महाराष्ट्राचा बिहार करून मोठे होऊ नये . गौतमीताईंनी त्यांच्या अदा बदलाव्यात", असा जाहीर सल्लाच घनश्याम दरोडेनं दिलाय .

